रायगड, नवी मुंबई, ठाणे, रत्नागिरी, सिंधुदुर्ग | आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७ | वर्ष ८९ | अंक २६५ | पृष्ठे ८ | RGD/016/2026-28 www.krushival.in

## अपघातात दोघे जागीच ठार

**पनवेल :** जुना मुंबई-पुणे महामार्गावर भरधाव स्कुटीने ट्रेलरला दिलेल्या जोरदार धडकेत दोन तरुणांचा दुर्दैवी मृत्यू झाला. या भीषण अपघाताची नोंद पनवेल तालुका पोलीस ठाणे येथे करण्यात आली आहे. २८ फेब्रुवारी रोजी दुपारी साडेतीनच्या सुमारास असद मेनन समशद (१९, रा. सेक्टर २०, सीवूड) आणि मुस्कान संजय सिंग (२०, रा. नेरूळ पूर्व) हे स्कुटी (एमएच ०३ ईसी ७६४१) वरून पुण्याकडून पनवेलकडे येत होते. जुना मुंबई-पुणे महामार्ग पनवेल लेनवर, कोन बीट पोलीस चौकीसमोर, अशोक पान २ वर



# कृषीवल

रायगड, गुरुवार, दि. ५ मार्च २०२६

किंमत ४ ₹



## घोणसे घाटात भीषण अपघात

**म्हसळा :** घोणसे घाट येथे भीषण अपघात झाला असून सुदैवाने मोठी जीवितहानी टळली आहे. एफ ७५३ जळगाव-पुणे-दिघी राष्ट्रीय महामार्गावरून म्हसळ्याकडे येत असताना केळेवाडी येथील तीव्र उतारावर भरधाव वेगाने येणारी एमएच १८ बीआर १२७५ क्रमांकाची चारचाकी मोटार दरीत कोसळून पलटी झाली. चालकाचा वाहनावरील ताबा सुटल्याने हा अपघात घडला. ही घटना सायंकाळी साडेसहा वाजण्याच्या सुमारास घडली. अपघाताच्या वेळी मोटारीत एकूण सात प्रवासी होते. केवळ दैव बलवत्तर असल्याने सर्वजण पान २ वर

# कमळ कोमजले




| अलिबाग | विशेष प्रतिनिधी |

**महाराष्ट्रातील सात राज्यसभा जागांसाठी भाजपने उमेदवारांची यादी जाहीर करताच कोकणात राजकीय भूकंपाचे धक्के बसले आहेत. चर्चेत असलेले खासदार धैर्यशील पाटील यांचे नाव यादीतून गायब झाल्याने पेण-सुधागडमधील भाजप कार्यकर्त्यांचा उत्साह एका क्षणात मावळला. परिणामी, ''कमळ कोमजले'' अशीच प्रतिक्रिया सर्वसामान्यांतून उमटताना दिसत आहे.**

कोकणातून राज्यसभेत प्रतिनिधित्व मिळेल, अशी अपेक्षा निर्माण झालेल्या धैर्यशील पाटलांचे नाव वगळण्यात आल्याने राजकीय वर्तुळात अनेक तर्क-वितर्कांना उधाण आले आहे. या निर्णयामागे

**महाराष्ट्रातील राज्यसभेसाठी होणाऱ्या सात जागांच्या निवडणुकीसाठी भाजपच्या उमेदवारांची यादी जाहीर झाली आहे. तावडे, आठवलेंसह चौघांच्या नावावर शिक्कामोर्तब झाले असून, भाजपच्या धक्कातंत्राची मोठी चर्चा सुरू झाली आहे.**

**महाराष्ट्रातील सात राज्यसभा जागांसाठी भाजपने उमेदवारांची यादी जाहीर करत धक्कातंत्राचा वापर केला. कोकणातील चर्चेत असलेले खासदार धैर्यशील पाटील यांचे नाव यादीतून वगळण्यात आल्याने पेण-सुधागडमधील भाजपच्या कार्यकर्त्यांचा हिरमोड झाला असल्याचे चित्र दिसून आले.**

**भाजपकडून**
- **रामदास आठवले,**
- **विनोद तावडे,**
- **माया चिंतामण इवनाते,**
- **रामराव वडकुते**

**यांना उमेदवारी**

## धैर्यशील पाटलांना राज्यसभेतून डच्चू

## पत्नीचा पराभव ठरला सेटबॅक

## तटकरेंच्या 'पॉवर'ची चर्चा रंगली; मातब्बर नेत्यांची लॉबिंग

स्थानिक समीकरणे विशेषतः तटकरे यांचा जिल्हा परिषद निवडणुकीतील कमबॅक आणि धैर्यशील पाटील यांच्या पत्नीचा पराभव कारणीभूत असल्याची चर्चा राजकीय गल्लीबोळात रंगली आहे.

१६ मार्चला होणाऱ्या निवडणुकीपूर्वीच राजकीय डावपेचांना वेग आला आहे. मातब्बर नेत्यांनी उमेदवारीसाठी पक्षश्रेष्ठींकडे लॉबिंग केल्याची चर्चा होती; मात्र अंतिम यादीने सर्वच समीकरणे धुळीस मिळवली. पेण-सुधागडमधील कार्यकर्त्यांमध्ये निराशा असून, दोन वर्षांचीच खासदारकी ठरली का? असा प्रश्न उपस्थित केला जात आहे. स्थानिक पातळीवर नेतृत्वाला बळ देण्याऐवजी बाहेरच्या चेहऱ्यांना प्राधान्य दिल्याची भावना कार्यकर्त्यांतून व्यक्त होत आहे. दरम्यान, या निर्णयामुळे कोकणातील राजकीय पान २ वर

## शरद पवारांना राज्यसभेची उमदेवारी



**मुंबई :** महाविकास आघाडीकडून राज्यसभा निवडणुकीसाठी शरद पवार यांच्या नावावर शिक्कामोर्तब झालं आहे. याबद्दलची घोषणा काँग्रेस नेत्यांच्या उपस्थितीत शरद पवार यांच्या कन्या आणि राष्ट्रवादी काँग्रेस शपच्या खासदार सुप्रिया सुळे यांनी केली. यावेळी त्यांनी महाविकास आघाडीतील तिन्ही पक्षांचे आभार मानले. राज्यसभा निवडणुकीसाठी अर्ज भरण्याचा उद्या शेवटचा दिवस आहे. शरद पवार रिंगणात उतरल्यानं राज्यसभेची निवडणूक बिनविरोध होण्याची दाट शक्यता आहे. काँग्रेस नेत्यांच्या उपस्थितीत खासदार सुप्रिया सुळेंनी शरद पवारांच्या नावाची घोषणा केली. शरद पवारांच्या संसदीय कारकीर्दीला ५९ वर्षे पूर्ण झाली आहेत. या कालावधीत ते विधानसभा, लोकसभा, राज्यसभेवर अनेकदा निवडून गेले आहेत. विशेष म्हणजे या कालावधीत ते एकही निवडणूक हरलेले नाहीत. ते दोनदा राज्यसभेवर गेले आहेत. दोन्ही वेळा त्यांची निवड बिनविरोध झालेली आहे. त्यामुळे यंदाही पवार हाच ट्रॅक रेकॉर्ड कायम राखणार का, याची उत्सुकता आहे.

## वेधक

### दागिनेचोर अटकेत

**खोपोली :** खालापूर तालुक्यातील चौककर्जत मार्गावरील खैराट गावाजवळील एका रिसॉर्टमध्ये विवाह समारंभासाठी आलेल्या पाहुण्यांच्या लॉकरमधील सोन्याचे व हिऱ्यांचे दागिने चोरी करणाऱ्या तिघांना खालापूर पोलिसांनी अटक केली आहे. चोरीस गेलेला सुमारे १८ लाख ७६ हजार ५०० रुपयांचा मुद्देमाल हस्तगत करण्यात आला आहे. २५ फेब्रुवारी रोजी हैदराबाद येथील फिर्यादी आपल्या पत्नीसमवेत नातेवाईकांच्या लग्नासाठी रिसॉर्टमध्ये थांबले होते. त्यांनी खोलीतील लॉकरमध्ये पान २ वर

### इराणच्या युद्धनौकेवर हल्ला

**नवी दिल्ली :** श्रीलंकेच्या दक्षिण किनारपट्टीवर व भारताच्या किनारपट्टीच्या जवळ एका इराणी युद्धनौकेवर अमेरिकेच्या पाणबुडीने हल्ला झाल्याची धक्कादायक घटना समोर आली आहे. या हल्ल्यात इराणची आयआरआयएस देना ही युद्धनौका समुद्रात बुडाली असून, प्राथमिक माहितीनुसार ८० हून अधिक जण यात ठार झाले आहेत. तर, १०० हून अधिक जण बेपत्ता आहेत. दि. ४ मार्च रोजी पहाटेच्या सुमारास ही घटना घडली.

### जाधव-कल्याणशेट्टी यांच्यात खडाजंगी

**मुंबई :** अर्थसंकल्पीय अधिवेशनादरम्यान विधान भवनाच्या लॉबीत गुरुवारी आमदारांमध्ये शाब्दिक बाचाबाची झाल्याची घटना समोर आली आहे. भास्कर जाधव (उद्धवसेना) आणि सचिन कल्याणशेट्टी (भाजप) यांच्यात स्वाक्षरीच्या ठिकाणी झालेल्या गर्दीतून वाद निर्माण झाला. सभागृहात प्रवेश करताना कराव्या लागणाऱ्या स्वाक्षरीवरून दोघांमध्ये तीव्र शब्दांत खडाजंगी झाल्याचे दिसून आले.

### अज्ञातांकडून झाडांची कत्तल

**पनवेल :** खारघर येथील सेक्टर ३४ सीमधील पालिकेच्या भूखंड क्रमांक ३७ वर अज्ञात व्यक्तीने पाच झाडांची बेकायदा कत्तल केल्याची घटना उघडकीस आली आहे. या प्रकारामुळे संताप व्यक्त होत आहे. याबाबत स्थानिक रहिवासी अ‍ॅड. संदीप खाकसे यांनी पालिकेच्या वृक्षप्राधिकरण विभागाकडे तक्रार करत संबंधितांवर गुन्हा दाखल करण्याची मागणी केली आहे. उपायुक्त स्वरूप खरगे यांनी वृक्षप्राधिकरण विभागाचे प्रमुख संदीप पवार यांना तातडीने पाहणी करण्याच्या सूचना दिल्या.

## जिल्ह्यातील वीस नागरिक अडकले

- **जिल्हाधिकारी किशन जावळे यांची माहिती**
- **सर्वजण सुखरूप असल्याचे प्रशासनकडून जाहीर**



| रायगड | जिल्हा प्रतिनिधी |

इस्त्रायल-इराण संघर्षामुळे मध्य पूर्व आशियन देशात रायगड जिल्ह्यातील वीस नागरिक अडकल्याची माहिती जिल्हाधिकारी किशन जावळे यांनी दिली. हे सर्व नागरिक सुखरूप असल्याचे त्यांनी सांगितले आहे. पाली, उरणसह पोलादपूरमधील नागरिकांचा सहभाग असल्याचे सांगण्यात आले आहे.

सध्या इस्त्रायल आणि इराण या देशांमध्ये एकमेकांविरोधात संघर्ष सुरु आहे. युद्धसदृश्य परिस्थिती निर्माण झाली आहे. युद्धामुळे विमाने उड्डाण रद्द करण्यात आली आहेत. विमान रद्द झाल्याने प्रवासी अडचणीत सापडले आहेत. रायगड जिल्ह्यातील वीस नागरिक मध्य पूर्व आशियन देशात अडकले आहेत. यातील पालीमधील उत्कर्ष मपारा हे दुबई येथे शिक्षणासाठी गेले आहेत. ते त्यांच्या आई, वडिलांच्या संपर्कात असून, सुरक्षित आहेत.

उरण तालुक्यातील जसखार येथील कविश घरत, प्रांजली घरत हे दुबई येथे लग्नाच्या वाढदिवसानिमित्त पर्यटनासाठी गेले आहेत. ते दुबई येथे एका हॉटेलमध्ये सुखरूप आहेत. पोलादपूरमधील सवाद येथील सर्फराज तार्लेकर, अख्तर तार्लेकर, अजीम तार्लेकर, महम्मद तार्लेकर, असलम तार्लेकर, मैनुद्दीन तार्लेकर हे सौदी अरेबिया येथे नोकरीसाठी वास्तव्यास आहेत. पान २ वर

## लोकनेते अ‍ॅड. दत्ता पाटील यांना अभिवादन

### अलिबागसह संपूर्ण जिल्ह्यात ठिकठिकाणी जयंती साजरी



| रायगड | जिल्हा प्रतिनिधी |

शेतकरी कामगार पक्षाचे झुंजार नेते, विधानसभेतील जनसामन्यांचा आवाज, दलित, पीडित, शोषित, कामगार आणि शेतकऱ्यांचे कैवारी, छत्रपती शिवाजी महाराज, फुले, शाहू, आंबेडकरांचा विचार खऱ्या अर्थाने जपणारे, ५० वर्षांहून अधिक काळ फौजदारी वकील म्हणून काम केलेले निष्णांत ज्येष्ठ वकील स्व. अ‍ॅड. दत्ता पाटील उर्फ दादांची १०० वी जयंती अलिबागसह संपूर्ण जिल्ह्यात साजरी करण्यात आली. त्यांच्या पुतळ्यासह प्रतिमेला पुष्पहार घालून अभिवादन करण्यात आले.

रायगड जिल्हा व अलिबाग बार असोसिएशनच्यावतीने अलिबागमधील न्यायालयात स्व. अ‍ॅड. दत्ता पाटील यांच्या प्रतिमेला पुष्पहार घालून अभिवादन करण्यात आले. अलिबाग बार असोसिएशनचे अध्यक्ष अ‍ॅड. प्रसाद पाटील यांच्या प्रमुख उपस्थितीत कार्यक्रम घेण्यात आला. यावेळी उपाध्यक्ष अनंत पाटील, सचिव अ‍ॅड. अमित देशमुख, खजिनदार राजेंद्र माळी, अलिबागच्या उपनगराध्यक्षा अ‍ॅड. मानसी म्हात्रे, अ‍ॅड. गौतम पाटील, अ‍ॅड. अमित देशमुख, अ‍ॅड. जयेश जोशी, अ‍ॅड. किशोर हजारे, अ‍ॅड. सुयोग बारटक्के, अ‍ॅड. के.डी. पाटील, अ‍ॅड. समाधान पाटील आदी वकील मंडळी उपस्थित होते. यावेळी अ‍ॅड. गौतम पाटील, अ‍ॅड. प्रसाद पाटील, अ‍ॅड. मानसी म्हात्रे, अ‍ॅड. के.डी. पाटील, अ‍ॅड. जयेश जोशी यांनी स्व. दत्ता पाटील यांच्या कार्याची महती सांगत असताना अनेक जुन्या आठवणींना उजाळा दिला.

अलिबागमधील शेतकरी भवन येथील सभागृहात स्व. अ‍ॅड. दत्ता पाटील यांच्या प्रतिमेला पुष्पहार घालून अभिवादन करण्यात आले. यावेळी शेकापच्या पान २ वर

## पत्नीची दगडाने ठेचून हत्या

| म्हसळा | प्रतिनिधी |

कोकणमध्ये शिमगा अर्थात होळी उत्सवाचा जल्लोष सुरू असताना म्हसळा तालुका हादरवून सोडणारी घटना समोर आली आहे. तालुक्यातील मौजे दगडघूम गावाच्या हद्दीत असलेल्या धेनू चव्हाण यांच्या चिरा दगड खाणीत काम करणाऱ्या एका कामगाराने आपल्या नवविवाहित पत्नीची दगडाने ठेचून हत्या केल्याचे उघड झाले आहे.



मिळालेल्या माहितीनुसार, मूळचे बीजापूर येथील सतीश चव्हाण आणि त्याची पत्नी निकिता यांचा सात महिन्यांपूर्वी विवाह झाला होता. सतीश हा दगडघूम येथील चिरा दगड खाणीत मजुरीचे काम करत होता. पती-पत्नीमध्ये काही कारणावरून वाद झाल्याने संतापाच्या भरात सतीशने निकिताला खाणीशेजारील परिसरात नेले. तेथे तिच्या डोक्यात लाकूड मारून तसेच चेहऱ्यावर दगड घालून तिची हत्या केल्याचे प्राथमिक तपासात निष्पन्न झाले आहे.

घटनेनंतर पत्नी जंगलात निघून गेल्याचे खोटे सांगून सतीशने खाण मालकाची दिशाभूल करण्याचा प्रयत्न केला. मात्र, हा प्रकार संशयास्पद वाटल्याने खाण मालकाने म्हसळा पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली. पोलिसांनी सतीशची चौकशी केली असता त्याने विसंगत उत्तरे दिल्याने त्याला ताब्यात घेण्यात आले. अधिक चौकशीत त्याने गुन्ह्याची कबुली दिली. याप्रकरणी गुन्हा दाखल करण्यात आला असून, पोलीस निरीक्षक रविंद्र पारखे यांच्या मार्गदर्शनाखाली तपास सुरू आहे.

## टंचाईच्या भीतीने पेट्रोल पंपावर रांगा




| कोर्लई | प्रतिनिधी |

अमेरिका-इस्रायल-इराण यांच्यातील युद्धस्थितीमुळे इंधनटंचाई निर्माण होईल की काय, या भीतीने मुरुड तालुका येथील विहूर गावातील पेट्रोल पंपावर वाहनांच्या लांबच लांब रांगा लागल्याचे चित्र पाहायला मिळाले.

याबाबत आमच्या प्रतिनिधीने माहिती घेतली असता, प्रत्यक्षात इंधनाचा तुटवडा नसून, केवळ भीतीपोटी वाहनचालक पेट्रोल भरण्यासाठी गर्दी करत असल्याचे समोर आले. संबंधित सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, विहूर येथील पेट्रोल पंपावर पेट्रोलचा पुरेसा साठा उपलब्ध असून, नागरिकांनी अफवांवर विश्वास ठेवू नये, असे आवाहन करण्यात आले आहे.

## कांद्याचे ५०० कंटेनर्स अडकले



| उरण | प्रतिनिधी |

अमेरिका-इराण-इस्रायलदरम्यान वाढलेल्या तणावाचे थेट परिणाम आता महाराष्ट्रातील शेतकरी आणि निर्यातदारांवर दिसू लागले आहेत. नाशिक, पुणे तसेच इतर जिल्ह्यांतील सुमारे ५०० हून अधिक कंटेनरमध्ये भरलेला कांदा निर्यात न झाल्याने अडकून पडला आहे. त्याचबरोबर द्राक्षे, केळी, समुद्रातील मासे व इतर कृषीमालही बंदर परिसरात थांबलेला आहे.

हा सर्व माल प्रामुख्याने जवाहरलाल नेहरू पोर्ट प्राधिकरण (जेएनपीए) येथून दुबईमार्गे आखाती देशांकडे निर्यात केला जातो. मात्र, सध्याच्या युद्धजन्य परिस्थितीमुळे दुबईतील बाजारपेठ ठप्प झाली असून बंदरात माल स्वीकारला जात नाही. परिणामी, सुमारे १६ हजार टन कांदा कंटेनरमध्ये अडकला असून त्याची किंमत अंदाजे ३६ कोटी रुपये असल्याचे सांगितले जात आहे. परिस्थिती अशीच राहिल्यास हा नाशवंत माल सडण्याची भीती व्यक्त केली जात आहे. पान २ वर

**सुरेश खैरे यांच्याकडून अभिनंदन | उरण पंचायत समितीमध्ये वर्चस्व**

## गटनेतेपदी शेकापचे महेश म्हात्रे



| रायगड | जिल्हा प्रतिनिधी |

उरण पंचायत समितीमध्ये शेतकरी कामगार पक्षाचे (शेकाप) वर्चस्व कायम राखत गटनेतेपदी महेश महादेव म्हात्रे यांची अधिकृत निवड करण्यात आली आहे. पंचायत समितीवर शेकापचे चार सदस्य बहुमताने निवडून आल्यानंतर गटनेतेपदाबाबतचा निर्णय घेण्यात आला होता. त्यानुसार महेश म्हात्रे यांच्यावर गटनेतेपदाची जबाबदारी सोपवण्यात आली. या निवडीबाबत शेकापच्या वतीने बुधवारी (दि. ४) जिल्हाधिकारी कार्यालयात जाऊन अधिकृत पत्र सादर करण्यात आले. उपजिल्हाधिकारी रवींद्र शेळके यांनी जिल्हाधिकाऱ्यांच्या वतीने हे पत्र स्वीकारले.

गटनेतेपदी निवड झाल्यानंतर शेकाप जिल्हा चिटणीस सुरेश खैरे यांनी महेश म्हात्रे तसेच पंचायत समिती सदस्य निर्मला नरेश घरत, अविनाश गावंड आणि प्रियांका अविनाश गावंड यांचे पुष्पगुच्छ देऊन अभिनंदन केले. यावेळी तालुका चिटणीस रवि घरत, विधानसभा मतदारसंघ अध्यक्ष रमाकांत पाटील, माजी सभापती नरेश घरत, माजी सरपंच अनंत घरत, माजी सभापती अ‍ॅड. सागर कडू, दीपक मढवी, सुरेश पाटील, सिताराम नाखवा, वैशाली पाटील, जासईचे सरपंच संतोष घरत, धीरज घरत आदी पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

उरण पंचायत पान २ वर

## आरोपीला सहा वर्षांची सक्तमजुरी

| माणगाव | प्रतिनिधी |

अल्पवयीन मुलीवर काचेच्या फुटलेल्या बाटलीने जीवघेणा हल्ला केल्याप्रकरणी माणगाव येथील अतिरिक्त सत्र न्यायालयाने आरोपीस सहा वर्षांची सक्तमजुरीची शिक्षा सुनावली. हा निर्णय महिलांच्या सुरक्षेबाबत कठोर संदेश देणारा ठरला आहे. २८ नोव्हेंबर २०२२ रोजी मुंबई-गोवा महामार्गावरील आंबेडकर कॉलेजसमोरील पुलावर ही घटना घडली होती. सारळ उर्फ सॅरल सुनील शिंदे (रा. दहिवाड, ता. महाड) याने अल्पवयीन मुलीवर संबंध ठेवण्याचा दबाव टाकत वारंवार फोन करून त्रास दिला होता. घटनेच्या दिवशी त्याने मुलीचा रस्ता अडवून धक्काबुक्की केली आणि जीवे पान २ वर

## बोगस ३१६ दिव्यांग अधिकारी निलंबित

**बनावट दिव्यांग प्रमाणपत्र सादर केल्याने कारवाई**

| मुंबई | प्रतिनिधी |

बनावट दिव्यांग प्रमाणपत्र सादर करून शासकीय सेवेत कार्यरत असलेल्या ३१६ अधिकारी व कर्मचाऱ्यांवर निलंबनाची कारवाई करण्यात आली आहे. ४० टक्क्यांपेक्षा कमी दिव्यांगत्व असणे, प्रमाणपत्र नसणे किंवा बनावट प्रमाणपत्र सादर करणे अशा कारणांमुळे ही कारवाई करण्यात आल्याची माहिती मंत्री अतुल सावे यांनी दिली. आ. श्रीकांत भारतीय यांनी लेखी प्रश्नाद्वारे हा मुद्दा उपस्थित केला होता.

राज्यातील २८ जिल्हा परिषदांमध्ये एकूण १० हजार ९२२ दिव्यांग अधिकारी नोंदवले गेले असून, त्यापैकी ६ हजार २१८ जणांची पडताळणी पूर्ण झाली आहे. उर्वरित अधिकाऱ्यांची तपासणी सुरू आहे. दरम्यान, दिव्यांग कल्याण विभागाने सर्व ३४ जिल्हा परिषदांना व्यापक पडताळणीचे आदेश दिले आहेत. सचिव तुकाराम मुंढे यांनी शिक्षण, आरोग्य, बांधकाम आदी सर्व विभागांतील अधिकारी व कर्मचाऱ्यांची तपासणी करण्याचे निर्देश दिले आहेत. बनावट प्रमाणपत्र आढळल्यास दोन वर्षांपर्यंत कारावास किंवा एक लाख रुपयांपर्यंत दंड, अथवा दोन्ही शिक्षा होऊ शकतात.

## निर्भया पथकाची गाडी मद्यधुंद तरुणाने पळवली

| पनवेल | प्रतिनिधी |

महिलांच्या सुरक्षेसाठी कार्यरत असलेल्या नवी मुंबई पोलीस दलाच्या 'निर्भया' पथकाची अधिकृत गाडी एका मद्यधुंद तरुणाने पळवल्याचा धक्कादायक प्रकार खारघर येथे उघडकीस आला आहे. या घटनेमुळे पोलीस प्रशासनाच्या सुरक्षा व्यवस्थेवर प्रश्नचिन्ह उपस्थित झाले आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, संबंधित तरुण हा पोलीस कर्मचारी नसून साहाय्यक पोलीस आयुक्त कार्यालयात साफसफाई व पाणी देण्याचे काम करणारा कर्मचारी आहे. २ मार्च रोजी रात्री साडेदहा ते अकराच्या सुमारास होळीच्या पार्श्वभूमीवर त्याने अतिप्रमाणात मद्यपान केले होते. पान २ वर

# चिरनेर गावाला पुराचा धोका

## पाणलोट क्षेत्रात भराव टाकत नाल्यांची संरक्षण भिंत तोडण्याचा आरोप

। उरण । प्रतिनिधी ।

चिरनेर गावातील पूरस्थितीवर नियंत्रण मिळवण्यासाठी उभारण्यात आलेली नाल्यांची संरक्षण भिंत तोडण्याचा गंभीर प्रकार समोर आला आहे. नाल्यांच्या काठावर उभारण्यात आलेल्या युनी स्टोअर वल्डहाऊसिंग प्रकल्पाच्या व्यवस्थापनाने खाडीच्या मुखाजवळील पाणलोट क्षेत्रात दगड-मातीचा भराव टाकत संरक्षक भिंतीला धक्का दिल्याचा आरोप स्थानिकांकडून करण्यात येत आहे. यामुळे पुन्हा एकदा चिरनेर गावावर पुराचा धोका ओढावण्याची भीती व्यक्त होत आहे.



चिरनेर गावात दरवर्षी पावसाळ्यात पूरस्थिती निर्माण होत होती. सुमारे २०० ते ३०० घरांमध्ये पाणी शिरून मोठी जीवित व वित्तहानी होत होती. या पार्श्वभूमीवर उरणचे आ. महेश बालदी यांच्या शिफारशीनुसार मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या मार्गदर्शनाखाली मुंबई महानगर क्षेत्र विकास प्राधिकरण (एमएमआरडीए) मार्फत सुमारे पाच कोटी रुपयांचा निधी मंजूर करण्यात आला. त्यानुसार सहा वर्षांपूर्वी नाल्यांच्या दोन्ही काठांवर मे. पी.पी. खारपाटील कंपनीमार्फत संरक्षण भिंत उभारण्यात आली होती.

या संरक्षण भिंतीमुळे पूराचे पाणी मूळ नाला पात्रात मर्यादित राहावे आणि गावात शिरू नये, हा उद्देश होता. मात्र, आता संबंधित वल्डहाऊसिंग प्रकल्पाने पाणलोट क्षेत्रातच भराव टाकत नाल्याच्या नैसर्गिक प्रवाहात हस्तक्षेप केल्याचे समोर आले आहे. संरक्षक भिंतीचा काही भाग तोडण्याचा प्रयत्न झाल्याने स्थानिकांमध्ये संताप व्यक्त होत आहे. पूरग्रस्त रहिवाशांच्या हिताचा विचार न करता प्रशासनाला न जुमानता हा प्रकार करण्यात आल्याचा आरोप होत आहे. खाडीच्या मुखाजवळील पाणलोट क्षेत्रात भराव टाकल्याने भविष्यात पावसाळ्यात पाण्याचा निचरा अडथळित होऊन गावात पुन्हा पूरस्थिती निर्माण होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

या गंभीर प्रकरणाकडे संबंधित प्रशासन व लोकप्रतिनिधी लक्ष देणार का, असा सवाल उपस्थित होत आहे. गावकऱ्यांच्या सुरक्षेसाठी उभारण्यात आलेल्या संरक्षण भिंतीचे नुकसान करणाऱ्यांवर तातडीने कारवाई करावी आणि पाणलोट क्षेत्रातील भराव हटवावा, अशी मागणी नागरिकांकडून जोर धरत आहे.

# केळकर विद्यालयात मराठी, विज्ञान प्रदर्शन

## मराठी भाषा गौरव आणि विज्ञान दिन उत्साहात

। रायगड । जिल्हा प्रतिनिधी ।

अलिबागमधील चिंतामणराव केळकर विद्यालयात मराठी भाषा गौरव दिन व विज्ञान दिन साजरा करण्यात आला. यानिमित्ताने दोन्ही विषयांवर अधारित प्रदर्शन भरविण्यात आले. या कार्यक्रमांच्या माध्यमातून मराठी भाषेसह विज्ञानाचे महत्त्व पटवून देण्याचा प्रयत्न करण्यात आला.



या कार्यक्रमांची सुरुवात ग्रंथदिंडीने करण्यात आली. शाळेचे पालक ए.ए. सानप यांच्या हस्ते प्रदर्शनाचे उद्‍घाटन करण्यात आले. या प्रदर्शनात पौराणिक, ऐतिहासिक, रहस्यमय, सामाजिक, विनोदी, दशावतारावर अधारित नाटकांचे विविध प्रकार प्रतिकृतींच्या रुपात मांडण्यात आले. वेगवेगळ्या नाटककारांची माहिती तक्ते रुपात सादर करण्यात आली. जुन्या मराठी कवितांचे स्मरण करून देणारा कवितांचा कोपरा तयार करण्यात आला. विद्यार्थ्यांच्या अंगी असणाऱ्या नाट्य व संगीत क्षेत्रातील कलागुणांना सादर करण्याची संधी देण्यात आली. शाळेच्या ग्रंथालयात असणाऱ्या पुस्तकांचेही प्रदर्शन मांडण्यात आले. या उपक्रमाच्या माध्यमातून मराठी भाषा गौरव दिन साजरा करण्यात आला. तसेच विज्ञान दिनानिमित्त प्रदर्शनाचे आयोजन करण्यात आले. रोबोट्स, डीएनए, बीट द बझ, सोलर सिस्टीम वॉर्निंग अलार्म, वॉश युवर हॅन्डस तसेच इतर प्रतिकृती आपली कल्पकता वापरून तयार करण्यात आल्या. गणित विषयातील मजेदार कोडी, खेळ विद्यार्थ्यांसह पालकांचे लक्ष वेधून घेत होते. अंतरिक्ष संदर्भात शनिची कडी गायब का होतात. चंद्राची रोजची बदलणारी स्थिती या विषयांवर विद्यार्थ्यांनी उत्तमप्रकारे माहिती सादर केली. अलिबाग शहराचा नकाशाही या प्रदर्शनात मांडण्यात आला होता. शहरातील महत्त्वाच्या ठिकाणांची, त्यांच्या प्रतिकृती व तक्त्यांच्या आधारे माहिती देण्यात आली. शाळेने भरविलेल्या या प्रदर्शनात उत्तम प्रतिसाद मिळाला.

# हिंद टर्मिनलची मुजोरी

। उरण । प्रतिनिधी ।

औद्योगिकीकरणाच्या नावाखाली शेतकऱ्यांच्या पोटावर पाय देण्याचा प्रकार चिरनेर गावात उघड झाला आहे. येथील हिंद टर्मिनल या माल हाताळणी प्रकल्पातून (कंटेनर यार्ड) जाणूनबुजून सांडपाणी भातशेतीत सोडले जात असल्याचा गंभीर आरोप समोर आला आहे. या दूषित पाण्यामुळे सुमारे सहा एकर भातशेती नापीक होण्याच्या मार्गावर असून शेतकऱ्यांमध्ये तीव्र संतापाची लाट उसळली आहे.



- सहा एकर भातशेती नापीक
- चिरनेरमध्ये शेतकऱ्यांचा संताप उसळला

चिरनेरगावातील शेतजमिनींमध्ये सांडपाण्याचे तवंग स्पष्ट दिसून येत असून, पिकांची वाढ खुंटली आहे. भात रोपांची पाने पिवळी पडून शेत ओसाड होत असल्याचे चित्र पाहायला मिळत आहे. यासंदर्भात शेतकऱ्यांनी चिरनेर ग्रामपंचायत तसेच तहसील कार्यालय उरण येथे वारंवार तक्रारी दाखल केल्या आहेत. मात्र, अद्याप संबंधित प्रकल्पाविरुद्ध कोणतीही ठोस कारवाई करण्यात आलेली नाही. त्यामुळे प्रशासनाच्या भूमिकेवर प्रश्नचिन्ह उपस्थित केले जात आहे.

उरण तालुक्यात वाढत्या औद्योगिकीकरणामुळे अनेक कंपन्या आणि कंटेनर यार्ड स्थायिक झाली आहेत. मात्र, शासनाच्या नियमांचे उल्लंघन करून नैसर्गिक पाणलोट क्षेत्रांवर भराव टाकणे, जलस्त्रोत बुजवणे आणि पर्यावरणीय अटींची पायमल्ली करणे, असे प्रकार वाढल्याची तक्रार स्थानिकांकडून होत आहे. चिरनेर व कळंबुसरे ग्रामपंचायत हद्दीत उभारण्यात आलेल्या हिंद टर्मिनल प्रकल्पाबाबतही असेच आरोप होत आहेत. स्थानिक शेतकरी विजय रामदास म्हात्रे व इतरांनी आपल्या शेतजमिनी प्रकल्पासाठी संपादित करून देण्यास नकार दिल्याने प्रकल्प व्यवस्थापनाने त्यांच्यावर दबाव टाकण्यास सुरुवात केल्याचा आरोप आहे. पारंपरिक रहदारीचा रस्ता बंद करणे, नैसर्गिक पाण्याचे प्रवाह अडवणे आणि अखेर यार्डमधील दूषित पाणी शेतात वळवणे, असे प्रकार जाणीवपूर्वक करण्यात येत असल्याचे शेतकऱ्यांचे म्हणणे आहे. आमच्या पिढ्यानपिढ्या कसलेल्या जमिनी उद्ध्वस्त करण्याचा डाव रचला जात आहे. सांडपाण्यामुळे भातशेती नापीक होत आहे. तक्रारी करूनही प्रशासन दखल घेत नाही, अशी व्यथा विजय म्हात्रे यांनी व्यक्त केली. दूषित पाण्यामुळे जमिनीची सुपीकता नष्ट होत आहे.

# सुट्टीतही सरकारी कार्यालयात विजेची होळी

। श्रीवर्धन । प्रतिनिधी ।

शासनाकडून ‘वीज वाचवा’ मोहिमेद्वारे जनजागृती केली जात असताना, प्रत्यक्षात सरकारी कार्यालयातच विजेचा उघड अपव्यय होत असल्याचे चित्र श्रीवर्धनमध्ये समोर आले आहे. येथील सार्वजनिक बांधकाम विभागाच्या कार्यालयात सलग चार दिवस शासकीय सुट्टी असल्याने कामकाज पूर्णपणे बंद होते. मात्र, तरीही कार्यालय परिसरातील बाहेरील दिवे दिवस-रात्र सुरूच ठेवण्यात आल्याचे निदर्शनास आले आहे.

माहितीनुसार, सुट्टीच्या कालावधीत कार्यालयात कोणतेही प्रशासकीय काम सुरू नव्हते. तरीही मुख्य प्रवेशद्वार, आवार तसेच इमारतीच्या बाहेरील भागातील विद्युत दिवे चोवीस तास सुरूच ठेवण्यात आले होते. सलग चार दिवस कोणीही हे दिवे बंद करण्याची तसदी न घेतल्याने मोठ्या प्रमाणावर विजेचा अपव्यय झाल्याची चर्चा नागरिकांमध्ये सुरू आहे.

स्थानिकांनी या प्रकारावर तीव्र नाराजी व्यक्त केली आहे. ‘‘सामान्य नागरिकांना वीज बचतीचे धडे देणारे प्रशासन स्वतः मात्र नियम पाळताना दिसत नाही,’’ अशी टीका नागरिकांकडून करण्यात येत आहे. वाढत्या वीजदरांच्या पार्श्वभूमीवर सरकारी कार्यालयातील हा निष्काळजीपणा अधिकच गंभीर मानला जात आहे. या घटनेमुळे शासनाच्या तिजोरीवर अनावश्यक आर्थिक भार पडत असल्याची भावना व्यक्त होत आहे. ऊर्जा बचतीबाबत स्पष्ट निर्देश असतानाही संबंधित अधिकाऱ्यांनी दुर्लक्ष केल्याचा आरोप स्थानिकांकडून करण्यात येत आहे. करदात्यांच्या पैशांतून चालणाऱ्या कार्यालयातच असा उघड अपव्यय होत असल्याने जबाबदारी निश्चित करण्याची मागणी आता जोर धरत आहे. या प्रकरणाची सखोल चौकशी करून संबंधित जबाबदारांवर योग्य ती कारवाई करावी तसेच भविष्यात अशा घटना टाळण्यासाठी स्पष्ट मार्गदर्शक तत्त्वे तयार करून जबाबदारी निश्चित करावी, अशी मागणी नागरिकांकडून होत आहे. ‘वीज बचत’चा संदेश केवळ कागदावर न राहता तो प्रत्यक्ष कृतीतून दिसला पाहिजे, अशी सर्वसामान्यांची अपेक्षा व्यक्त होत आहे.

- श्रीवर्धनमध्ये ‘वीज बचवा’चा संदेश कागदावरच
- सार्वजनिक बांधकाम विभागाकडून उधळपट्टी

# गाढेश्वर विभागातील जनजातीच्या मुलींना सायकलींचे वाटप

। पनवेल । प्रतिनिधी ।

गाढेश्वर येथील पदाजी ठाकूर स्मृती भवनात गाढेश्वर विभागातील जनजातीच्या मुलींना सायकलींचे वाटप करण्यात आलं. हा उपक्रम रोटरी मिलेनियम सिटी वाशी यांच्या प्रयत्नातून आणि प्रेम शांती ट्रस्ट व वनवासी कल्याण आश्रम कुलाबा यांच्या प्रयत्नातून साकार झाला.




या कार्यक्रमासाठी रोटी मिलेन सिटी वाशी याच्या अध्यक्ष अर्चना चोरारिया आणि प्रेमशांती विश्वस्त प्रेमचंद गोलिया आणि यशाची गोलिया उपस्थित होते. तसेच वनवासी कल्याण आश्रम कुलाबा जिल्ह्याचे अध्यक्ष अविनाश म्हात्रे आणि महिला प्रमुख अनुराधा वाघमारे व आश्रमाचे जिल्हा कार्यकर्ते विष्णू सपरा हे उपस्थित होते. क्लबचे कार्यकर्ते युवराज आणि गाडेश्वर मधील ग्रामस्थ गुरुनाथ ढोमणे, नारायण भगत, गणपत भगत, किरण ढोबळे आणि दिगंबर भगत उपस्थित होते. कार्यक्रमात १५ जनजाती मुलींना सायकलीचं वाटप करण्यात आलं. त्यावेळी मुलींच्या चेहऱ्यावरील आनंद द्विगुणीत करण्यात आला. मुलींना शाळेत जाण्यासाठी सायकलच वापर उत्तम होईल असे प्रेमचंद गोलिया यांनी नमूद केले. तर अर्चना चोरारिया यांनी आपण या सायकलिंगचा सदुपयोग करावा आणि उत्तम शिक्षण घ्यावे असे नमूद केले.

पान १ वरून

## घोणसे घाटात भीषण अपघात

बचावले, मात्र काही जण जखमी झाले. जखमींना तातडीने म्हसळा ग्रामीण रुग्णालय येथे दाखल करण्यात आले. तेथे डॉ. बेलकोने तसेच परिचारिका प्रणाली खुल्लम आणि अश्विनी धोत्रे यांनी प्राथमिक उपचार करून पुढील उपचारासाठी उपजिल्हा रुग्णालय माणगाव येथे हलविण्यात आले.

या अपघातात नरेंद्र महाजन (२६), अक्षय विजय पवार (३०), आदित्य विजय पवार (२३), सनी संजय बागुल (२६), दिनेश संजय बागुल (२८), निलेश संजय भागवत (२६), शुभम काशीनाथ म्हस्के (३०) हे जखमी झाले असून, सर्वजण धुळे येथील रहिवासी आहेत.

## दागिनेचोर अटकेत

सुमारे १८ लाख ७० हजार रुपये किमतीचे दागिने व ६५०० रुपये रोख ठेवले होते. हळदी समारंभासाठी बाहेर गेल्यानंतर अज्ञात आरोपींनी मास्टर पासवर्डचा वापर करून लॉकर उघडत दागिने व रोख रक्कम चोरून नेली. याप्रकरणी खालापूर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला.

तांत्रिक तपासाच्या आधारे पोलिसांनी रिसॉर्टमधील दोन सुरक्षा रक्षक व एका रूमबॉयला ताब्यात घेतले. चौकशीत त्यांनी गुन्ह्याची कबुली दिली. मयूर किसन आगिवले (२४), प्रवीण कृष्णा सगणे (२५) आणि ओमकार दत्ता सरोदे (२५), सर्व रा. कर्जत, यांना ३ मार्च रोजी अटक करण्यात आली.

पोलीस अधीक्षक आँचल दलाल, अपर पोलीस अधीक्षक अभिजित शिवथरे व उपविभागीय पोलीस अधिकारी डॉ. विशाल नेहूल यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक सचिन पवार यांच्या पथकाने ही कारवाई केली.

## कमळ कोमजले

समीकरणे बदलण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. तटकरेंच्या वाढत्या प्रभावामुळे भविष्यातील निवडणुकांवरही परिणाम होणार का, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे. राज्यसभेच्या निवडणुकीपूर्वीच राजकीय रणधुमाळीला सुरुवात झाली असून, खारेपाटातील कमळ पुन्हा उमलणार की कोमेजलेल्या अवस्थेतच राहणार, याची उत्सुकता वाढली आहे.

महाराष्ट्रातील सात जागांसाठी होणाऱ्या राज्यसभेच्या निवडणुकीसाठी भाजपने (दि.४) आपल्या उमेदवारांची यादी जाहीर केली. भाजपने अनुभवी दोन, तर दोन नव्या चेहऱ्यांना संधी दिली. राज्यसभेतून राज्यातील सात दिग्गज नेते निवृत्त होत असून, त्यांच्या जागांवर पुन्हा १६ मार्चला निवडणुका होणार आहेत. या निवडणुकीसाठी जोरदार मोर्चेबांधणीला वेग आला असून, महायुतीच्या वाट्याला चार जागा आल्या, तर महाविकास आघाडीच्या वाट्याला एक. या एका जागेसाठी ज्येष्ठ नेते शरद पवार यांचे नाव निश्चित झाले असून, महायुतीतील जागा वाटपातून भाजपला चार आणि शिवसेना, राष्ट्रवादी काँग्रेसला प्रत्येकी एक जागा आली आहे.

## लोकनेते ॲड. दत्ता पाटील यांना अभिवादन

राज्य महिला आघाडी प्रमुख, अलिबागच्या उपनगराध्यक्षा ॲड. मानसी म्हात्रे, जिल्हा चिटणीस मंडळाचे सदस्य अनिल पाटील, शेकाप तालुका चिटणीस सुरेश घरत, संदीप सारंग, आदी पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते. अलिबागमधील जिल्हा सार्वजनिक वाचनालय व ग्रंथालयामध्येदेखील दादांची जयंती साजरी करण्यात आली. गौरव प्रमोद पाटील यांच्या हस्ते दादांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. यावेळी वाचनालयाचे उपाध्यक्ष सतीश प्रधान, मयुरी पाटील, आर. के. घरत, हेमंत राऊत, शरद कोरडे, ग्रंथपाल रजिता माळवी, सहाय्यक ग्रंथपाल अमित धुमाळ, लेखनिक अपूर्वा वर्तक, अर्चना माळवी, अंकित म्हात्रे, अभिषेक भगत व इतर वाचक वर्ग उपस्थित होते. यावेळी गौरव पाटील यांनी दादांच्या आठवणींना उजाळा दिला.

## कांद्याचे ५०० कंटेनर्स अडकले

रमजान ईदच्या पार्श्वभूमीवर दुबई, ओमान, सौदी अरेबिया, बहरीन आणि कतार या देशांकडे मोठ्या प्रमाणात कांद्याची निर्यात करण्यात आली होती. मात्र, दुबई बंदर काही काळ बंद राहिल्याने आणि जहाज कंपन्यांनी बुकिंग थांबवल्याने नवीन माल पाठवणेही ठप्प झाले आहे. बंदरात आणि बंदराबाहेर अडकलेल्या मालावर होणारा अतिरिक्त खर्च कोण उचलणार, असा प्रश्न निर्यातदारांसमोर उभा राहिला आहे. सरकारकडून अर्थसहाय्य किंवा दिलासा मिळावा, अशी मागणी व्यापाऱ्यांकडून होत आहे. दरम्यान, युद्धस्थितीवर लवकर तोडगा निघावा, अशी अपेक्षा व्यक्त केली जात असली तरी नाशिक, पुणेसह इतर भागातील शेतकरी मात्र सध्या चिंतेत आहेत.

## निर्भया पथकाची गाडी मद्यधुंद तरुणाने पळवली

नशेत असताना त्याने कार्यालयातील ‘निर्भया’ पथकाची गाडी ताब्यात घेत रस्त्यावर आणली. यानंतर तो बेलपाडा परिसरात गाडी घेऊन गेला. तेथे एका रिक्षाचालकाशी त्याचा वाद झाला. वाद वाढताच त्याने गाडीतून उतरून काही नागरिकांना विनाकारण मारहाण केली. तसेच पोलीस वाहनाचा धाक दाखवत उपस्थितांना धमकावल्याचेही समोर आले आहे.

नागरिकांनी त्याच्या हालचाली संशयास्पद असल्याचे लक्षात येताच तातडीने पोलिसांना कळवले. पोलिसांनी घटनास्थळी धाव घेत संबंधित तरुणाला ताब्यात घेतले. याप्रकरणी खारघर पोलीस ठाणे येथे गुन्हा दाखल करण्यात आला आहे. महिलांच्या सुरक्षेसाठी वापरल्या जाणाऱ्या अधिकृत वाहनाची चावी बाहेरील व्यक्तीच्या हाती कशी लागली, याबाबत वरिष्ठ अधिकाऱ्यांकडून चौकशी सुरू आहे. दरम्यान, मद्यधुंद अवस्थेत ‘निर्भया’ पथकाची गाडी चालवतानाचा संबंधित तरुणाचा व्हिडिओ समाजमाध्यमांवर प्रसारित झाला असून, या प्रकारामुळे शहरात संतापाची लाट उसळली आहे.

## भीषण अपघातात दोन ठार

लेलँड कंपनीच्या ट्रेलरला (एमएच ४३ यू ६५६६) स्कुटीने समोरून उजव्या बाजूने जोरदार धडक दिली. धडक इतकी भीषण होती की, दोघेही गंभीर जखमी झाले. उपचारापूर्वीच दोघांचाही मृत्यू झाल्याची माहिती पोलिसांनी दिली. या अपघातामुळे परिसरात काही काळ वाहतूक कोंडी झाली होती. पोलीस अधिक तपास करत असून, अपघाताचे नेमके कारण शोधले जात आहे. या घटनेमुळे परिसरात हळहळ व्यक्त होत आहे.

## जिल्ह्यातील वीस नागरिक अडकले

परंतु, युद्धजन्य परिस्थितीमुळे मायदेशी परतण्यास इच्छुक आहेत. पोलादपूरमधील सवाद येथील जमीर तार्लेकर, जावेद तार्लेकर, सुवेल तार्लेकर, रतिक नैकवारे, अलताब पठाण, अल्तमश पठाण, आयान तार्लेकर हे कुवत येथे नोकरी-व्यवसायानिमित्त वास्तव्यस आहेत. शाहिद कादिरी, मुजाईद कादिरी, शाहिद तौलकर हे कतार येथे नोकरी व्यवसायानिमित्त वास्तव्यस आहेत. सज्जाद तार्लेकर हे दुबईला नोकरी-व्यवसायानिमित्त वास्तव्यास आहेत. या सर्वांना मायदेशी येण्याची इच्छा झाली आहे. ही सर्व मंडळी सुखरूप असल्याचे जिल्हा प्रशासनाकडून सांगण्यात आले आहे.

## आरोपीला सहा वर्षांची सक्तमजुरी

मारण्याच्या उद्देशाने फुटलेल्या काचेच्या बाटलीने मानेवर वार करून गंभीर जखमी केले. याप्रकरणी महाड शहर पोलीस ठाण्यात खून करण्याचा प्रयत्न, विनयभंग, धमकी तसेच पॉक्सो कायद्यान्वये गुन्हा दाखल करण्यात आला होता. तपास पूर्ण करून दोषारोपपत्र न्यायालयात सादर करण्यात आले. अतिरिक्त जिल्हा व सत्र न्यायाधीश एस.टी. भालेराव यांनी ४ मार्च रोजी निकाल देताना आरोपीस भारतीय दंड संहितेच्या कलम ३०७ अन्वये ६ वर्षे सक्तमजुरी व दंड, तसेच इतर कलमांखाली स्वतंत्र शिक्षा व दंड ठोठावला.

## गटनेतेपदी शेकापचे महेश म्हात्रे

समितीमध्ये शेकापचे चार सदस्य बहुमताने निवडून आल्यामुळे पक्षाची ताकद अधिक दृढ झाली आहे. गटनेतेपदी महेश म्हात्रे यांची निवड झाल्याने आगामी काळात पंचायत समितीतील विविध विकासकामांना गती मिळेल, असा विश्वास कार्यकर्त्यांनी व्यक्त केला.

# पनवेल परिसरात दोन ठिकाणी खून

। पनवेल । प्रतिनिधी ।

रंगपंचमीच्या दिवशी पनवेल परिसरात दोन वेगवेगळ्या ठिकाणी घडलेल्या हल्ल्यांत दोन जणांचा मृत्यू झाल्याने खळबळ उडाली आहे. कामोठे आणि तळोजा औद्योगिक वसाहतीत या घटना घडल्या. पहिली घटना कामोठे सेक्टर १४ येथील गावदेवी मंदिराजवळ घडली.

२३ वर्षीय राहुल बुमबक याचा क्षुल्लक कारणावरून गौरव पवार (१९) आणि प्रेम पेठकर यांच्यासोबत वाद झाला. रंगपंचमी संपल्यानंतर मंदिराजवळ उभ्या असलेल्या राहुलकडे पाहण्याच्या कारणावरून पुन्हा वाद झाला. प्रेमने राहुलला पकडून ठेवले असताना गौरवने चाकूने पोटात वार केले. गंभीर जखमी झालेल्या राहुलचा अतिरक्तस्रावाने मृत्यू झाला. कामोठे पोलिसांनी दोन्ही आरोपींना अटक केली आहे.

दुसरी घटना तळोजा औद्योगिक वसाहतीतील घोट ते नितळस मार्गावर घडली. आसाममधील मूळ रहिवासी आणि सध्या खैरणे येथे राहणारा २९ वर्षीय राजू बासूमतारी सायकलवरून जात असताना एका कंपनीच्या रखवालदाराने मद्यधुंद अवस्थेत लोखंडी पाईपने डोक्यात प्रहार केला. या हल्ल्यात राजूचा मृत्यू झाला. घटनेत आणखी एका तरुणालाही मारहाण करण्यात आली. तळोजा पोलिसांनी संबंधित रखवालदाराविरोधात गुन्हा दाखल केला आहे. दोन्ही घटनांमुळे पनवेल परिसरात तणावाचे वातावरण निर्माण झाले आहे.



### जाहीर नोटीस

सर्व लोकांना कळविण्यात येते की, आमचे अशिल श्री. मुस्तफा फखरी हासमवाला, यांनी खालील वर्णन केलेली बिनशेती प्लॉट मिळकत विद्यमान मालकांकडून कायम खरेदी करण्याचे ठरविलेले आहे. सदरहू मिळकतींचे वर्णन खालीलप्रमाणे

**बिनशेती मिळकतींचे वर्णन**
**मौजे-किरवली, तालुका-कर्जत, जिल्हा-रायगड**

| जमीन मालकाचे नाव | स.नं./प्लॉट नंबर | क्षेत्र चौ.मी. | आकार रू.पै. |
|---|---|---|---|
| प्रभाकर नथु शेळके | ५०/७/ब/४ | ३१५ चौ.मी. | ३१ रू ५० पैसे |
| प्रसाद प्रभाकर शेळके | ५०/७/ब/३ | ३१० चौ.मी. | ३१ रू ०० पैसे |
| भाग्यश्री प्रभाकर शेळके | ५०/७/अ/१ | ४४२ चौ.मी. | ४४ रू २० पैसे |

सदरहू वर नमूद केलेली बिनशेती प्लॉट मिळकत ही त्या मिळकतीचे विद्यमान मालक यांचे मालकीची स्वकष्टाची व ताबेकब्जा वहिवाटीची आहे असे ते सांगतात व विद्यमान ७/१२ उताऱ्यावरून तसेच दिसते. सदर बिनशेती प्लॉट मिळकत त्यांचेकडून आमचे अशिलांनी तदंगभूत सर्व हक्कांगासह कायमस्वरूपी खरेदीखताद्वारे विकत घेण्याचे ठरविले आहे. तरी सदर शेती मिळकतीत कोणाचा काही गहाण, दान, साठेकरार, बक्षिस, फरोक्तखत, लिज वगैरे प्रकारचा हक्क वा कुळहक्क, अन्न वस्त्र बोजा असल्यास त्याने ही नोटीस प्रसिद्ध झालेपासून १४ दिवसांचे आत खालील पत्त्यावर लेखी कळवावे. वरील मुदतीत कोणाची काहीही हरकत न आल्यास मिळकत निर्वेध असल्याचे समजून सदरहू खरेदीखताचा व्यवहार पूर्ण केला जाईल. व मागाहून येणारी कोणतीही तक्रार ऐकली जाणार नाही.

ता. ०४/०३/२०२६

सही/-
**ॲड. सतीश अर्जुन शेळके**
(बी.ए.एल.एल.बी.) मुंबई हायकोर्ट
ऑफिस पत्ता- नारायण देशमुख
हाऊस दगडे आळी कर्जत पूर्व
कर्जत-रायगड मो.नं. ९८८११३२२४८

### जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीने असे सुचित करण्यांत येते की :-

१) मौजे दहिवली तर्फे बोरेटी, ता. खालापुर, जि. रायगड येथील भूमापन क्रमांक ३३, क्षेत्रफळ २८८.००.०० आर. चौ.मी. १५५.७०.०० आर.चौ.मी. क्षेत्रफळाची मिळकत मे. शिव एमएफजी ट्युब्स प्रा. लि. तर्फे डायरेक्टर प्रज्ञा विनोद धुमाळ व वंदना विजय लोटेकर यांचेकडून आमचे अशिल खरेदी घेणेचे विचारात आहेत.

२) सबब सदर मिळकतीवर अगर तिच्या कोणत्याही भाग, अंश अगर हिश्यावर कोणाचाही गहाण, दान, बक्षिस, फरोक्त, पोटगी, चार्ज, संपादन, भाडेपट्टा, वहिवाट, साठेकरार, लिज, तबदील, ट्रस्ट, वारसा या प्रकारचा अगर अन्य कोणत्याही व कसल्याही प्रकारचा हक्कहितसंबंध असल्यास संबंधितानी आपापल्या हरकती अगर तक्रारी ही नोटीस प्रसिद्ध झालेपासुन चौदा (१४) दिवसांचे मुदतीत खाली सही करणार ॲडव्होकेट यांचेकडे सकृतदर्शनी लेखी पुराव्यासहीत पाठवाव्यात. याप्रमाणे कोणाचीही कसलीही हरकत अगर तक्रार आली नाही तर सदर मिळकत निर्वेध, बोजा रहीत व हस्तांतरीत करून घेणेस योग्य आहे असे समजुन आमचे अशिल सदरचा व्यवहार पुर्ण करतील व मागाहून येणाऱ्या तक्रारी अगर हरकती आमच्या अशिलांवर कोणत्याही व कसल्याही प्रकारे बंधनकारक रहाणार नाहीत व संबंधितांनी आपापल्या तथाकथित हरकती, तक्रारी कायमच्या सोडून दिल्या आहेत असे समजणेत येईल.

खोपोली
४/३/२०२६

सही/-
**(श्रीकांत परशुराम पाटणकर)**
ॲडव्होकेट
रा. गंगाधर स्मृती, दत्त मंदिरा जवळ,
पो. खोपोली, तालुका खालापुर, जि. रायगड
मोबाईल नंबर ९८२२८४०७८१

## निवडक



### पालीतील बाह्यवळण मार्ग लालफितीत

**सुधागड-पाली :** अष्टविनायकातील बल्लाळेश्वराच्या दर्शनासाठी दररोज हजारो भाविक पालीत येत असतात. मात्र, वाहतूक कोंडी आणि धुळीमुळे पालीकरांच्या आरोग्याचा प्रश्न अधिक गंभीर झाला आहे. शहरातील प्रत्येक चौकात वाहतूक कोंडी, रस्त्यांवर धुळ आणि प्रत्येक वळणावर अपघाताची भीती, अशी परिस्थिती निर्माण झाली आहे. पाली बाह्यवळण मार्गाचा प्रस्ताव २०१० साली मंजूर झाला होता. भूसंपादनासाठी कोटींचा निधीही जाहीर झाला. तरीही २०२६ मध्ये हा मार्ग अद्याप लालफितीत अडकलेला आहे. पाली शहरातून जाणारी अवजड वाहतूक हीच सर्वात मोठी समस्या ठरली आहे. ट्रक, डंपर आणि अवजड वाहने मंदिराच्या मार्गावरून जात असल्याने स्थानिक नागरिक, भाविक तसेच विद्यार्थी यांना वाहतूक कोंडी, धुळीचा त्रास आणि अपघाताचा धोका कायम आहे. त्यामुळे बाह्यवळण मार्ग हा फक्त रस्ता नसून शहराच्या श्वासाचा प्रश्न ठरला आहे. या बाबत लोकप्रतिनिधी मात्र दुर्लक्ष करताना दिसत आहेत. निवडणुकीच्या काळात विकासाच्या गप्पा रंगतात, आश्वासनांची आतषबाजी होते; परंतु, निवडणूक संपली की सगळे विषय गाठोड्यात बांधून पुढच्या निवडणुकीसाठी जपून ठेवले जातात.



### सुलभ शौचालयामुळे प्रवाशांना त्रास


**पनवेल :** सायन-पनवेल महामार्गावर कामोठे येथील के. एल. कॉलेज समोर असलेल्या बस स्टॉपच्या मागे सुलभ शौचालय उभारण्यात आले आहे. मात्र, हे शौचालय प्रवासी वर्गाला त्रासदायक ठरत आहे. या शौचालयातून मोठ्या प्रमाणावर दुर्गंधी पसरत असून बसची प्रतीक्षा करणाऱ्या प्रवाशांना नाक मुठीत धरून उभे राहावे लागत आहे. तसेच, बस स्टॉपलगत असलेल्या एस. टी. कर्मचाऱ्यांच्या छोट्या केबिनमध्ये काम करणाऱ्या कर्मचारी वर्गालाही या अस्वच्छतेचा फटका बसत आहे. त्यातच वरच्या पाण्याच्या टाकीत दोन ते तीन दिवस पाणी नसल्याने स्वच्छतेची समस्या अधिक गंभीर बनली आहे. प्रवासी व स्थानिक नागरिकांनी संबंधित प्रशासनाने तात्काळ स्वच्छता, नियमित पाणीपुरवठा आणि देखभाल करण्याची मागणी केली आहे. अन्यथा आरोग्याच्या दृष्टीने गंभीर परिणाम होण्याची भीती व्यक्त केली जात आहे.



### 'न्याय आपल्या दारी' उपक्रम

**रायगड :** 'न्याय आपल्या दारी' या उपक्रमांतर्गत रायगड जिल्ह्यात फिरते लोक अदालत व कायदेविषयक शिबिरांचे आयोजन करण्यात आले आहे. त्याचा शुभारंभ सोमवारी (दि.२) अलिबागमधील जिल्हा न्यायालयाच्या आवारात जिल्हा न्यायाधीश-२ एस.आर. तिवारी यांच्या हस्ते करण्यात आला. उद्घाटनप्रसंगी जिल्हा न्यायाधीश-३ एस.डी. भगत, न्यायाधीश तथा जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाचे सचिव तेजस्विनी निराळे, अलिबाग वकील संघटनेचे अध्यक्ष ॲड. प्रसाद पाटील, उपाध्यक्ष ए.डी.पाटील, सचिव अमित देशमुख, अधिकारी वर्ग व कर्मचारी वर्ग उपस्थित होते. हा उपक्रम मुंबई उच्च न्यायालय विधी सेवा समिती यांच्या निर्देशानुसार आणि जिल्हा व सत्र न्यायाधीश तथा जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाचे अध्यक्ष राजेंद्र सावंत, यांच्या मार्गदर्शनाखाली असून ३० मार्चपर्यंत जिल्ह्यात फिरते लोक अदालत असणार आहे. यादरम्यान, जिल्ह्यातील विविध तालुक्यांमध्ये प्रलंबित प्रकरणांचा तडजोडीने निपटारा केला जाणार आहे. तसेच, नागरिकांना कायदेविषयक मार्गदर्शन करण्यात येणार आहे. फिरत्या लोक अदालतीसाठी श्रीकांत उपाध्ये (निवृत्त न्यायाधीश) यांची कक्ष न्यायाधीश म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे.

## कोट्यवधीचा भूखंड हडपण्यासाठी
# नातेवाईकांचा कारनामा




**। उरण । प्रतिनिधी ।**

उरण व पनवेल तालुक्यात जमिनींना सोन्याचे भाव आले आहेत. त्यामुळे या ठिकाणी पैशाच्या हव्यास्यापोटी, स्वार्थासाठी जमीन बेकायदेशीर पणे विकण्याचे धंदे जोरात सुरु आहेत. उरण मध्येही असाच प्रकार घडल्याने एकच खळबळ उडाली आहे. सिडकोच्या संपादित जमिनीच्या मोबदल्यात मिळणारा कोट्यवधीचा भूखंड हडपण्यासाठी नातेवाईकांनीच चक्क मृताच्या टाळूवरचे लोणी खाण्याचा धक्कादायक प्रकार समोर आला आहे. त्यासाठी १२ वर्षांपूर्वी मयत झालेल्या आपल्या आत्याला कागदोपत्री जिवंत करून हक्कसोड पत्र बनविण्यात आले. त्यामुळे उरणमध्ये एकच खळबळ उडाली आहे.

चिर्ले येथील सुभाष नामदेव घरत (५६) यांची आई लहानुबाई उर्फ बानुबाई यांचे १ मार्च, २०१३ रोजी निधन झाले होते. सर्व नातेवाईक त्यांच्या अंत्यविधीला हजर होते. आजोबा रामा गमा मढवी यांच्या नावे चिर्ले येथे असलेल्या जमिनीवर डोळा ठेवून नातेवाईकांनीच कट रचला. ऑक्टोबर २०२४ मध्ये कृष्णा मढवी, मयूर मढवी आणि बाबू उर्फ बाबुराव मढवी यांनी सुभाष घरत यांची आई मयत झाली आहे, हे माहिती असतानाही केवळ नावातील साम्याचा फायदा घेत पनवेल-डेरवली येथील एका महिलेला रजिस्टर ऑफिसमध्ये लहानुबाई म्हणून उभे केले. तसेच, या महिलेचे फोटो, सही आणि अंगठा वापरुन विनामोबदला हक्कसोडपत्र पदरात पाडून घेतले. विशेष म्हणजे या बनावट हक्कसोडपत्राच्या आधारे त्यांनी १८ मार्च रोजी बांधकाम व्यवसायीक पार्थ गजोरा याच्या नावे जमिनीचे खरेदीखतही करुन घेतले. मूळ वारसदार सुभाष घरत यांना व इतर वारसदारांना कोणतीही कल्पना न देता हा सर्व व्यवहार पूर्ण करण्यात आला. दरम्यानच्या काळात सुभाष घरत यांनी तलाठी कार्यालयात वारसदार असलेल्या आपल्या आईची माहिती घेतल्यानंतर तिच्या नावाने हक्कसोडपत्र घेण्यात आल्याचे आढळुन आले. त्यानंतर त्यांनी अधिक माहिती घेतली असता बनावट महिलेच्या माध्यमातून हा सर्व प्रकार केल्याचे उरण पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली. त्यानुसार पोलिसांनी कृष्णा मढवी, मयूर मढवी, बाबुराव मढवी आणि संबंधित भुखंड खरेदी करणरा पार्थ गजोरा या चार जणांविरोधात फसवणूकीसह बनावट कागदपत्रे तयार केल्याप्रकरणी गुन्हा दाखल केला आहे.

## कंत्राटी कामगार संघाचे त्रैवार्षिक अधिवेशन



**। उरण । प्रतिनिधी ।**

महाराष्ट्र वीज कंत्राटी कामगार संघाचे ६वे त्रैवार्षिक अधिवेशन रविवारी (दि.१) कर्वेनगर-पुणे येथे संपन्न झाले. यावेळी मार्गदर्शन करताना एस. मल्लेशम यांनी सांगितले की, देशातील श्रमिक व कामगार सध्या आव्हानात्मक कालखंडातून जात आहेत. केंद्र सरकारने लागू केलेल्या ४ कामगार संहितांपैकी वेज कोड व सोशल सिक्युरिटी कोडचे भारतीय मजदूर संघाने स्वागत केले असून त्यांची त्वरित प्रभावी अंमलबजावणी करावी. तसेच, केंद्र सरकारने देशभर समान 'मिनिमम फ्लोअर वेज' जाहीर करावेत. पेन्शन फंडात वाढ व ई.एस.आय.सी. योजनेची पात्रता मर्यादा २१ हजारावरून ४२ हजार रुपये करावी, अशी मागणी करत २५ फेब्रुवारी रोजी देशभर 'सरकार जागव' आंदोलन करण्यात आल्याचे देखील सांगितले. खा. मेधा कुलकर्णी यांनी, कंत्राटी कामगारांना कायम करावे, या कोर्टाच्या निर्णयाचे स्वागत करून या निर्णयाची प्रभावी अंमलबजावणी करण्यासाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी पुढाकार घ्यावा, याबाबत चर्चा करणार. वीज कंत्राटी कामगार संघटनेवर आंदोलनाची वेळ येऊ न देता प्रशासनाने तातडीने बैठका घेऊन संवाद साधत संघटनेच्या सदस्य कामगारांच्या समस्या त्वरित सोडवल्या पाहिजे, असा आग्रह वीज कंपन्याकडे धरला.

## कॉपर आर्मड केबलची चोरी

**। महाड । प्रतिनिधी ।**

महाड एमआयडीसी परीसरात गुन्ह्यांचे प्रमाण दिवसेंदिवस वाढत असून, त्यामध्ये खून, खुनाचा प्रयत्न, महिलांवर अत्याचार, विनयभंग, चोरी, जबरी चोरी अशा घटना वारंवार घडताना दिसत आहेत. दरम्यान, सवाने गावच्या परिसरातील युनिलॅब केमिकल अँड फार्मासुटिकल्स कंपनीमधील मेजानाईन फोरम मधील जिन्याखाली ठेवण्यात आलेली कॉपर आर्मड केबल चोरीला गेली आहे. चोरट्यांनी येथील जिन्याखालील दरवाजामधून आत प्रवेश करून सुमारे २५ हजार रुपये किमतीचा कॉपर आर्मड केबल वायरचा बंडल लंपास केला आहे. महाड एमआयडीसी पोलिसांनी या चोरीच्या घटनेचा पंचनामा केला आहे. महाड एमआयडीसी पोलीस ठाण्यात चोरट्यांनविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला असून महाड एमआयडीसी पोलीस ठाण्याचे सहाय्यक पोलीस निरीक्षक जीवन माने यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस हवालदार राहुल मोहिते या संपूर्ण गुन्ह्याचा अधिक तपास करीत आहेत.



## ५५वा सुरक्षा दिन उत्साहात

**। रेवदंडा । प्रतिनिधी ।**

साळाव जेएसडब्लू कंपनीत ५५वा राष्ट्रीय सुरक्षा दिन मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. या कार्यक्रमाला साळाव जेएसडब्लू कंपनीचेव्यवस्थापकप्लॅन्टहेडपंकज मलिक यांची प्रमुख उपस्थिती होती. तसेच, साळाव अग्नीक्षामक दलाचे योगेश वासनिक, जितेंद्र आचार्य, प्रफुल्ल म्हात्रे व साळाव जेएसडब्लू कर्मचारीवर्ग यांची उपस्थिती होती. कार्यक्रमाचे नियोजन अग्नीक्षामक दलाचे योगेश वासनिक यांचे मार्गदर्शनाखाली सुरक्षा कर्मचारी यांनी केले. यादरम्यान, विविध स्पर्धेचे आयोजन कंपनी अंतर्गत घेण्यात आले होते.

## पीएनपीत राष्ट्रीय विज्ञान दिन साजरा



- विविध स्पर्धांचे आयोजन
- विद्यार्थ्यांमधील सृजनशीलतेला प्रोत्साहन

**। अलिबाग । प्रतिनिधी ।**

पीएनपी महाविद्यालयात दि.२८ फेब्रुवारी रोजी राष्ट्रीय विज्ञान दिवस साजरा करण्यात आला. कार्यक्रमाचे प्रास्ताविक विज्ञान विभाग प्रमुख प्रा. पूजा म्हात्रे यांनी केले. त्यांनी वैज्ञानिक स्पर्धांद्वारे विद्यार्थ्यांमधील सृजनशीलतेला प्रोत्साहन देत वैज्ञानिक दृष्टिकोन जोपासण्याचे आवाहन केले.

या कार्यक्रमासाठी प्रमुख पाहुणे म्हणून कनिष्ठ महाविद्यालयाचे प्रा. रविंद्र पाटील उपस्थित होते. तसेच, महाविद्यालयाचे प्र. प्राचार्य डॉ. ओमकार पोटे, कनिष्ठ महाविद्यालयाचे भूगोल विभागाचे प्रा. दिनेश पाटील, कला आणि मराठी विभाग प्रमुख डॉ. नम्रता पाटील आणि वाणिज्य विभाग प्रमुख डॉ. रसिका म्हात्रे आदी मान्यवर उपस्थित होते.

यावेळी प्रा. रवींद्र पाटील यांनी राष्ट्रीय विज्ञान दिनानिमित्त रामन इफेक्टच्या ऐतिहासिक शोधाचे महत्त्व विशद करत सी. व्ही. रामन यांच्या योगदानाबद्दल माहिती दिली. डॉ. नम्रता पाटील यांनी, विज्ञान साहित्यातील प्रगती व एआय तंत्रज्ञानावर भाष्य केले. तर, प्रा. दिनेश पाटील यांनी विद्यार्थ्यांना चिकित्सक वृत्ती जोपासण्याचे आवाहन केले. कार्यक्रमाचे अध्यक्षीय वक्तव्य महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. ओमकार पोटे यांनी केले. त्यांनी आपल्या भाषणात राष्ट्रीय विज्ञान दिनानिमित्त सी. व्ही. रामन यांच्या कार्याचे स्मरण केले. त्यांनी विद्यार्थ्यांना केवळ पुस्तकी ज्ञान न घेता वैज्ञानिक दृष्टिकोन जोपासण्याचे आणि नवनवीन प्रयोगाद्वारे स्वतःची प्रगती करण्याचे आवाहन केले.

राष्ट्रीय विज्ञान दिनानिमित्त आयोजित विविध स्पर्धांमध्ये विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवला. जैव-रांगोळी स्पर्धेत वेदिका म्हात्रे हिने प्रथम, सुजल पाटील व नयन गायकवाड यांनी द्वितीय, तर गौरी पुरोहित हिने तृतीय क्रमांक मिळवला. वर्किंग मॉडेल स्पर्धेत वैभव ठाकूर व श्रवण पाटील यांनी प्रथम, दीप कवळे व स्मित पाटील यांनी द्वितीय, तर ओम देशमुख व हर्षल कनोजे यांनी तृतीय क्रमांक प्राप्त केला. पोस्टर प्रेझेंटेशनमध्ये अलीना औसेकर व पलक कराणी यांनी प्रथम, शर्वरी पाटील हिने द्वितीय, तर नियती पाटील व मानसी वार्गे यांनी तृतीय क्रमांक पटकावला.विजेत्या विद्यार्थ्यांना मान्यवरांच्या हस्ते प्रमाणपत्र व पदक देऊन गौरविण्यात आले.

याकार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. पूजा पाटील व प्रा. कैलास सिंग राजपूत यांनी केले. तर, प्रा. करण वाडकर यांनी सर्वांचे आभार मानले.

## गतिरोधकांवर पट्ट्या नसल्यामुळे नुकसान

**। सुतारवाडी । प्रतिनिधी ।**


● (छायाचित्रः हरिश्चंद्र महाडिक)

भिरा फाटा ते विळे दरम्यान बारा गतिरोधक आहेत. मात्र, अनेक महिन्यांपासून या गतिरोधकांवर गतिरोधक दर्शक पट्ट्या नाहीत. त्यामुळे सर्व प्रकारच्या वाहनांची या ठिकाणावरून जाताना मोठ्या प्रमाणात आदळा आपट होत असून वाहनांचे प्रचंड नुकसान होत आहे. विशेषतः दुचाकी चालकांना त्याचा मोठा त्रास सहन करावा लागत आहे.

सुतारवाडी येथून पुणे केवळ शंभर किलोमीटर अंतरावर आहे. त्यामुळे या मार्गावरून मोठ्या प्रमाणात वाहनांची वर्दळ असते. सुतारवाडी आणि परिसरामध्ये मोठ्या प्रमाणावर फार्म हाऊस असल्यामुळे वर्षभर पर्यटक या मार्गावरून प्रवास करत असतात. तसेच, या परिसरात मोठं मोठ्या कंपन्या असल्यामुळे या मार्गावरून अवजड सामान घेऊन जाणाऱ्या ट्रेलरची सातत्याने ये-जा असते. त्यामुळे काही ठिकाणचे गतिरोधक सपाट झालेले आहेत. पावसाळ्यामध्ये हे गतिरोधक दिसत नसल्यामुळे दुचाकी चालकांचे अपघात देखील झालेले आहेत. त्यामुळे भिरा फाटा ते विळे दरम्यानच्या मार्गावर लवकरात लवकर गतिरोधक दर्शक पट्ट्या बसवण्याची मागणी स्थानिकांसह प्रवासी वर्गातून करण्यात येत आहे.

## लाखांची फसवणूक

**। पनवेल । ग्रामीण प्रतिनिधी ।**

खारघर येथील भूपेंदर कौर मोहिंदर सिंह यांच्या मोबाईलवर महानगर गॅस संदर्भात एक मेसेज आला. त्यात 'आपले गॅस कनेक्शन बंद होणार असून तात्काळ महिन्याचे बिल अपडेट करा', असा संदेश देण्यात आला. त्यानंतर स्वतःला वरिष्ठ अधिकारी म्हणवणाऱ्या व्यक्तीने व्हॉट्सअॅप कॉल करून मार्गदर्शन केले. बोलता बोलता त्यांनी मोबाईलवरील लिंकवर क्लिक करण्यास सांगितले. त्यानंतर काही मिनिटांतच त्यांच्या बँक खात्यातून टप्प्याटप्प्याने एकूण ४ लाख ६४ हजार रुपये वळते करण्यात आले. त्यानंतर सिंह यांना आपली फसवणूक झाल्याचे लक्षात आले.




रायगड जिल्हा व अलिबाग बार असोसिएशन आणि जिल्हा सार्वजनिक वाचनालय व ग्रंथालय यांच्यावतीने ॲड. दत्ता पाटील यांच्या प्रतिमेला अभिवादन करण्यात आले.

## जेएनपीटी कामगारांच्या लढ्याला यश

**। उरण । प्रतिनिधी ।**

जेएनपीटी बंदरातील तीन निवृत्त कामगारांना दीर्घ कायदेशीर लढ्यानंतर ग्रॅच्युइटीची रक्कम मिळण्याचा मार्ग मोकळा झाला आहे. विधिज्ञ विनायक कोळी यांच्या प्रभावी युक्तीवादामुळे केंद्रीय कामगार आयुक्तांनी कामगारांच्या बाजूने निर्णय दिला आहे.

१९८९ मध्ये स्थापन झालेल्या जेएनपीटीमध्ये कंत्राटी स्वरूपात कार्यरत असलेले इलेक्ट्रिक विभागातील कर्मचारी रमेश घरत, ज्ञानेश्वर घरत आणि नारायण पाडवे हे २०१५-१६ मध्ये निवृत्त झाले. मात्र, संबंधित ठेकेदारामार्फत त्यांना ग्रॅच्युइटीची रक्कम देण्यात आली नव्हती. ऑक्टोबर २०२४ मध्ये सहाय्यककामगारआयुक्तकार्यालयाने नियुक्तीपासून सेवानिवृत्तीपर्यंतची ग्रॅच्युइटी तसेच निवृत्ती दिनांकापासून प्रत्यक्ष रक्कम मिळेपर्यंत १० टक्के वार्षिक व्याज देण्याचे आदेश दिले होते. या आदेशाविरोधात जेएनपीएने २०२५ मध्ये अपील दाखल केले. या प्रकरणात विधिज्ञ विनायक कोळी यांनी कामगारांचे प्रतिनिधीत्व करत केंद्रीय कामगार आयुक्तांसमोर ठोस मांडणी केली. अखेरीस जेएनपीटीने नमते घेत तिन्ही कामगारांना मंजूर पूर्ण ग्रॅच्युइटी रक्कम तसेच निवृत्तीच्या तारखेपासून ३० जानेवारी पर्यंत ६ टक्के व्याज देण्यास मान्यता दिली. २०१९ पासून सुरू असलेल्या या लढ्यात कामगारांना न्याय मिळवून देण्यात विनायक कोळी यांनी मोलाची भूमिका बजावली. या निर्णयामुळे कामगारांच्या लढ्याला खऱ्या अर्थाने यश मिळाले असून सत्याचा नेहमी विजय होतो याचा प्रत्यय या निकालातून सर्वांना आला आहे.

### गोरगरिबांची होळी झाली गोड | अंनिस, समाजसेवी संस्थेचा उपक्रम

# 'होळी करा लहान, पोळी करा दान'

**। पाली/बेणसे । प्रतिनिधी ।**

जिल्ह्यात होळी सण विधायक पद्धतीने साजरा करण्यात आला. अनेक सामाजिक व स्वयंसेवी संस्था तसेच दानशूर व सुज्ञ नागरिक आणि महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समिती यांच्या माध्यमातून होळीमध्ये जाणाऱ्या शेकडो पुरणपोळ्या आदिवासी वाडी, झोपडपट्टी आणि वृद्धाश्रमात वाटण्यात आल्या. त्यामुळे गोरगरींबांची होळी गोड झाली. या माध्यमातून गोरगरिबांप्रती असलेली भावना आणि समाजसेवेची ओढ अतिशय प्रेरणादायी आहे.





पालीत एक संघर्ष समाजसेवेचा व महा. अंनिस तर्फे मागील अकरा वर्षांपासून 'होळी करा लहान, पोळी करा दान' हा उपक्रम सातत्याने सुरु आहे. यावेळी पालीतील लहान मोठ्या होळ्या येथून जवळपास १ हजार पेक्षा जास्त पुरणपोळ्या जमा करण्यात आल्या. येथील तळई व दापोडे आदिवासीवाडी आणि टेंभी वसाहत येथे त्याचे वाटप करण्यात आले. हा उपक्रम मयूर थळे, श्रीकांत ठोंबरे, संदेश सोनकर, संदीप महाडिक, किशोर चौधरी, रोशन रुईकर व अमित निंबाळकर आदींनी यशस्वी केला. तर, रोहा महा. अंनिस शाखेच्यावतीने माळखंड वाडी येथील श्री काळकाई प्रसन्न वृद्धाश्रमामध्ये पुरणपोळ्या आणि फळांचे वाटप केले. यावेळी शाखा अध्यक्ष डॉ. फरीद चिमावकर, दत्तात्रेय शेडगे, दिनेश शिर्के, अनिकेत पाडसे, मुमताज मुलानी, धनाजी जाधव, प्रमोद खांडेकर आदी उपस्थित होते. या बरोबरच पेण महा. अंनिस शाखेतर्फे देखील पेण रेल्वे लाईनला लागून असलेल्या झोपडपट्टीत पुरणपोळ्यांचे वाटप करण्यात आले. यावेळी रमाकांत घरत आणि संदेश गायकवाड उपस्थित होते.

> **'होळी करा लहान, पोळी करा दान' हा उपक्रम अनेकांनी उत्स्फूर्तपणे अवलंबला आहे. बहुतांश होळी मंडळे आणि रोटरी क्लब सारख्या संस्था स्वत: पुरणपोळ्या वाटप करू लागल्या आहेत. ही एक चांगली आणि स्वागतार्ह बाब आहे. जो विचार फक्त आमचा होता तो आता आपल्या सर्वांचा झाला आहे. होळी सणाच्या या विशेष प्रसंगी, समाजातील सर्व घटकांनी एकत्र येऊन गरिबांना आनंद आणि आशेचा संदेश दिला आहे. हा उपक्रम समाजातील सर्व घटकांच्या सहभागाने यशस्वी झाला आहे.**
> **- संदेश गायकवाड, कार्याध्यक्ष, महा. अंनिस, रायगड**

## नाट्यकलाकृतीतून साकारणार उंबरखिंडीचा रणसंग्राम

**। पाली/गोमाशी । प्रतिनिधी ।**

२ फेब्रुवारी १६६१ रोजी छत्रपती शिवाजी महाराजांनी मुघल सरदार कारतलब खान आणि राईबाघण यांच्या सुमारे २०-३० हजार सैन्याचा रायगड जिल्ह्यातील उंबरखिंड (खोपोली-पाली रस्ता) येथे गनिमी काव्याने पराभव केला. अवघ्या १००० पेक्षा कमी मराठा सैन्यासह महाराजांनी सह्याद्रीच्या दाट जंगलात अतिशय कौशल्याने मुघल फौजेला अडवून शरण येण्यास भाग पाडले. ही लढाई शास्ता खानाच्या सैन्याला धडा शिकवण्यासाठी महत्त्वाची ठरली आणिस्वराज्यासाठीमुघलांचेअफाट सैन्य पराभूत करून आत्मविश्वास वाढवणारी ठरली. या लढाईच्या स्मरणासाठी शिवजयंतीनिमित्त सॅम मित्र मंडळातर्फे पेडली येथे गुरूवारी (दि.५) रात्री ठीक ९.०० वाजता नाट्यकलाकृतीतून 'उंबरखिंडीचा रणसंग्राम' सादर करण्यात येणार आहे. आज सोशियल मीडियाच्या जमान्यात पेडली सारख्या ग्रामीण भागात नाट्यकलाकृती जिवंत ठेवण्याचाप्रयत्नपेडलीपंचक्रोशीतील नाट्य कलाकार करत आहेत. सुधागड वाशियाना उंबरखिंडीचा रणसंग्राम ही नाट्यकलाकृती याची देही याची डोळा बघण्याची संधी उपलब्ध करत आहेत.

कृषीवल
। रायगड, नवी मुंबई, ठाणे, रत्नागिरी, सिंधुदुर्ग
। आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७
। RGD/016/2026-28



# युद्ध बराच काळ चालेल

आखातातील युध्द लवकर संपणार नाही याची कबुली आता खुद्द डोनाल्ड ट्रम्प यांनी दिली आहे. हे युध्द तीन-चार आठवडे तरी चालू राहील असे ते म्हणाले आहेत. शिवाय, त्याहून अधिक चालले तर अमेरिका पूर्ण ताकदीनिशी ते लढेल अशी पुस्तीही त्यांनी जोडली आहे. याचा स्पष्ट अर्थ असा आहे की, ट्रम्प यांचे मनसुबे इराणने साफ उधळून लावले आहेत. खामेनींना मारले की इराण एका दिवसात शरण येईल अशी ट्रम्प यांची कल्पना होती. ट्रम्प यांचा बालिश उतावीळपणा, स्वतःला जास्त अक्कल असल्याचे समजण्याची वृत्ती वगैरे पाहता त्यांनी असे समजणे हे अपेक्षित असले तरी अमेरिका नावाच्या महासत्तेच्या अध्यक्षाला इतका मूर्ख घायकुतेपणा शोभून दिसत नाही. ट्रम्प यांनी इराणच्या जनतेला अनेकदा आवाहन करून झाले आहे. इराणी जनतेमध्ये खामेनी यांच्याविरुध्द असंतोष होता ही बाब खरी आहे. पण म्हणून देशप्रेम नावाची काही चीज असते. अमेरिका आणि इस्रायलवाले बाहेरून हल्ला करतील आणि इराणचे लोक त्यांना पाठिंबा देतील हे संभवतच नव्हते. तसेच झाले आहे. खामेनी यांच्यासह सुमारे ५० अधिकारी व नेते मारले जाऊनही इराणमध्ये अस्थिरता निर्माण झालेली नाही. इराणचे सरकार स्थितीवर पकड ठेवून आहे. तेहरान किंवा बाकीच्या शहरात अमेरिकेला पाठिंबा देणारे एकही प्रदर्शन झालेले नाही. उलट खामेनींच्या हत्येचा निषेध करण्यासाठी मात्र रोज हजारोंच्या संख्येने लोक जमत आहेत. खामेनी हे हुकुमशहा असले तरी त्या देशात नियमित निवडणुका होत असतात. यामध्ये खामेनींना मान्य नसलेले नेते सर्रास निवडून येत होते. १९९७ नंतर खातेमी नावाचे नेते पुढे आले. त्यांचा खामेनींना विरोध होता. अमेरिका व इतर देशांसोबत संबंध सुधारावेत अशी त्यांची भूमिका होती. नंतर अहमदेनिजाद हेही खामेनींना विरोध करणारे होते. गेल्या वीस वर्षात किमान पाच वेळी खामेनी यांच्या विरोधात देशभर आंदोलने झाली होती. याचा अर्थ असा की इराण म्हणजे कोण्या जुलुमी शहेनशहाच्या बुटाखालचे राष्ट्र असा प्रकार नव्हता. तेथे किमान काही प्रमाणात लोकशाही अस्तित्वात होती.

## इराण म्हणजे अफगाणिस्तान नव्हे

खामेनींच्या काळात कडवी इस्लामी तत्वे प्रस्थापित करण्याचा प्रयत्न झाला. पण इराण म्हणजे अफगाणिस्तान किंवा सौदी अरेबिया नव्हे हे कायम लक्षात ठेवायला हवे. इराणमध्ये किमान काही प्रकारचे न्यायालय अस्तित्वात आहे. तिथे महिला वगैरे आपल्यावरच्या अन्यायाबद्दल दाद मागू शकतात. किंबहुना, तेथील महिलांची दडपणूक होते हे खरे असले तरी त्यांचे शिक्षण रोखण्यात आलेले नाही. इराणमध्ये अनेक महिला डॉक्टर, इंजिनिअर इत्यादी आहेत. भारतातील अनेक मुले इराणमध्ये वैद्यकीय शिक्षण घेण्यासाठी जात असतात याचे कारणही तेथील शिक्षण प्रगत आहे हेच आहे. महिलांना बुरखा किंवा हिजाब घालणे सक्तीचे असले तरी त्यांना घरांमध्ये तसेच अनेक सार्वजनिक व्यवहारामध्ये सन्मानाचे स्थान असते. आपल्या हक्कांसाठी त्या आंदोलनेही करीत असतात. ही मुभा सौदी किंवा अफगाण महिलांना अजिबात नसते. दुसरे म्हणजे साहित्य, कला, समाजशास्त्रे, विज्ञान इत्यादी क्षेत्रांमध्ये इराणी लोकांनी उल्लेखनीय काम केलेले आहे. इराणी सिनेमाची तर जगात ख्याती आहे. अशा या देशावर सरसकट हुकुमशाही असल्याचा शिक्का मारून बाद करणे ट्रम्प यांच्या सोईचे असले तरी वस्तुस्थिती त्याहून वेगळी आहे. त्यामुळेच खामेनींची हत्या झाल्यानंतरही देशाची सूत्रे कोणाकडे जावीत याचा लोकशाहीला शोभेल असा विचारविनिमय चालू आहे. तेहरानमधून बाहेर पडण्यासाठी लोकांना शिस्तशीर वाहनांची व्यवस्था केली गेली आहे. तेथे गोंधळ उडालेला नाही. तेहरानवर हल्ले होऊनही घबराट माजलेली नाही. ही शांतता किती काळ टिकेल हा वेगळा मुद्दा आहे. आर्थिक कोंडी म्हणाल तर अमेरिकेने गेली पाच वर्षे ती केलीच आहे. इराणचे तेल कोणीही खरेदी करू नये असे निर्बंध घालण्यात आले आहेत. भारतासारख्या जुन्या मित्रांनीही त्यामुळे इराणला दगा दिला आहे. चीन हा इराणचा मोठा खरेदीदार आहे. पण युध्दामुळे त्याच्यापर्यंत तेल पोचलेच नाही तर काय होणार असा प्रश्न आहे. इराणमधील महागाई यापूर्वीच प्रचंड वाढली होती. ती आणखी वाढली की कदाचित नागरिक अस्वस्थ होतील. आपल्याच सरकारविरुध्द अधिक प्रमाणात बोलू लागतील. तरीही ट्रम्प यांना जे हवे आहे ते घडेलच याची शाश्वती देता येणार नाही.

## अमेरिकेला जड जाईल

नेतान्याहू आणि ट्रम्प या दोघांनाही आपापल्या देशामध्ये कमालीचा विरोध आहे. गाझाचे युद्ध झाले नसते तर नेतान्याहू कधीच हाकलले गेले असते. ऐन गाझा युद्धाच्या वेळीही नेतान्याहू यांच्या राजीनाम्यासाठी इस्रायलमध्ये मोठे मोर्चे निघाले होते. अलिकडेच मोदी इस्रायलला गेले असता विरोधकांनी संसदेतील भाषणावर बहिष्कार घातला होता. आता पुन्हा एकदा युध्द छेडून ते आपले स्थान बळकट करू पाहत आहेत. ट्रम्प यांच्याविरुध्द एपस्टीन फाईल्समध्ये स्फोटक मसाला असावा असा संशय आहे. त्यांचे आयातकराचे धोरण सर्वोच्च न्यायालयाने फेटाळले आहे. या भानगडींकडून लक्ष वळवण्यासाठीच ट्रम्प यांनी युध्द सुरु केले आहे. त्यांच्या इराणवर हल्ला करण्याच्या निर्णयाला केवळ २७ टक्के अमेरिकी लोकांनी पाठिंबा दर्शवला आहे. याचा अर्थ बहुसंख्य अमेरिका ट्रम्प यांच्या विरोधात आहे. विशेष म्हणजे एकेकाळी याच ट्रम्प यांनी ओबामांच्या इराकमधील हल्ल्याला विरोध केला होता. अमेरिकेने बाहेर युध्दाच्या भानगडीत पडू नये असे म्हणणारा मी पहिला अध्यक्ष आहे असे ते २०१५ मध्ये म्हणाले होते. आता मात्र त्यांचा पवित्रा बदलला आहे. गेल्या वर्षी जूनमध्ये त्यांनी इराणच्या अणुभट्ट्यांवर हल्ले केले होते. यावेळीही असेच हल्ले करून आपण इराणला निपटून टाकू असे त्यांना वाटत होते. पण आता इराणने आखाती देशांवर ज्या आक्रमकपणे हल्ले केले आहेत ते पाहता तो देश सहजासहजी हार मानेल असे वाटत नाही. माझे नुकसान झाले तरी चालेल, पण तुलाही खलास करीन असे धोरण युध्दात अनेकदा आखले जाते. त्याला दग्धभू असे म्हणतात. तेच आता इराण अवलंबत आहे. खामेनींचा एक मानसपुत्र आणि रेव्होल्युशनरी गार्डचा नेता गेल्या वर्षीच्या हल्ल्यांमध्ये मारला गेला होता. इराणच्या गुप्तचर यंत्रणांचे महत्वाचे अधिकारीही इस्रायलने मारले होते. ते पाहता आपलीदेखील कधीही हत्या होऊ शकेल अशी तयारी खामेनी यांनी केली होतीच. त्यामुळे त्यांनी वारस ठरवला नसला तरी त्यांची संघटना सक्षम होती. आता तर त्यांचा मुलगा मोज्तबा याची सर्वोच्च नेतेपदी निवड झाल्याचे वृत्त आहे. त्यामुळे सत्तापरिवर्तनात फार बाधा येणार नाही. इराणकडे गेल्या पाच वर्षात जमा केलेली हजारो क्षेपणास्त्रे आहेत. त्याची आर्थिक स्थिती बिकट असली तरी आता खामेनीच्या हत्येनंतर हा देशाच्या इभ्रतीचा सवाल आहे. त्यामुळे जनता वाटेल ते हाल सोसण्यास तयार राहील. अमेरिकेला हे युद्ध जड जाईल. नेतान्याहू व ट्रम्प यांनी युद्ध सुरु केले असले तरी त्यांना त्यांच्या इच्छेने ते संपवता येणार नाही.

विचार

# आकाराला येतेय मुंबई वॉटर मेट्रो

***मुंबई वॉटर मेट्रो ही कल्पना शहराची वाहतूक कोंडी कमी करणारी, पर्यावरणासाठी चांगली आणि आधुनिक मानली जाते. केंद्र आणि राज्य सरकारांचा पाठिंबा असला तरी प्रत्यक्षात काम सुरू होण्यास उशीर, वाढता खर्च, पर्यावरणाबद्दलची चिंता आणि राजकीय वाद हे सगळे मुद्दे पुढे येत आहेत. त्यामुळे हा प्रकल्प एकाच वेळी आशाही दाखवतो आणि अनेक महत्त्वाचे प्रश्नही उभे करतो.***



अश्विनी पारकर-शेजव

मुंबईची वाहतूक कोंडी ही आता केवळ गैरसोय राहिलेली नाही, तर शहराच्या रोजच्या जगण्याचा भाग बनली आहे. त्यामुळे सकाळ-संध्याकाळच्या गर्दीच्या वेळी रस्ते, लोकल गाड्या आणि बससेवा यांच्यावर प्रचंड ताण येतो. वाढती लोकसंख्या, मर्यादित रस्ते आणि वाहनांची झपाट्याने वाढलेली संख्या यामुळे मुंबईची वाहतूक व्यवस्था अनेकदा गुदमरलेली दिसते. याबाबत सागरी मार्गावर चालणारा वॉटर मेट्रो हा एक पर्याय म्हणून पुढे येत आहे. या प्रकल्पाचा उद्देश फक्त नवे वाहतूक साधन सुरू करणे नाही, तर शहरातील रस्त्यांची कोंडी कमी करणे, प्रवासाचा वेळ वाचवणे आणि प्रदूषण कमी करणे हा आहे. या कल्पनेला केंद्र आणि राज्य सरकारांचा पाठिंबा मिळत असून केंद्राने यासाठी दहा वर्षांची मोठी योजना जाहीर केली आहे. वॉटर मेट्रो म्हणजे समुद्रकिनारी किंवा नद्यांमधून ठराविक वेळापत्रकानुसार चालणारी प्रवासी बोट सेवा. सुरुवातीला या प्रकल्पात बॅटरीवर चालणाऱ्या इलेक्ट्रिक बोटी, आधुनिक जेट्टी, तिकीट काढण्याची सोपी व्यवस्था आणि लोकल ट्रेन, बस आणि मेट्रोशी जोडणी दिली जाणार आहे. या सेवेने नरिमन पॉइंट, वर्सोवा, जूहू, बांद्रा असे काही भाग जोडले जातील आणि पुढे नवी मुंबई व ठाणे यांचाही समावेश होऊ शकतो. केंद्राच्या योजनेमुळे हा प्रकल्प पुढे जाऊन संपूर्ण मुंबई महानगर परिसरापर्यंत वाढवण्याची शक्यता आहे. या प्रकल्पात वापरले जाणारे तंत्रज्ञानही महत्त्वाचे आहे. बॅटरीवर चालणाऱ्या इलेक्ट्रिक बोटी, जलद चार्जिंगची सोय, जास्त क्षमतेच्या बॅटऱ्या आणि प्रवाशांसाठी सोयीस्कर केबिन वापरण्याचा विचार आहे. प्रवाशांना सहज चढता-उतरता यावे म्हणून आधुनिक जेट्टी आणि आवश्यक सुविधा उभारल्या जातील.

या उपक्रमामध्ये बोटींची सुरक्षित आणि अचूक गती पाहण्यासाठी जीपीएससारख्या यंत्रणांद्वारे थेट मागोवा घेतला जाईल. तिकीट काढण्यासाठी 'मुंबई वन' किंवा 'एनसीएमसी'सारखी कार्डे आणि डिजिटल पेमेंट वापरता येईल. या सेवेचे भाडे सामान्य माणसाला परवडेल का, हा प्रश्न अनेकांच्या मनात आहे. तिकिटाचे दर डीपीआरनंतर ठरतील, पण सुरुवातीचा अंदाज असा आहे की शहरातील छोट्या प्रवाशांसाठी हे भाडे लोकल ट्रेन किंवा बसच्या भाड्याच्या आसपास ठेवले जाईल. सेवा चालवण्याचा खर्च, बोटींची क्षमता आणि सरकारकडून मिळणारा निधी या बाबी लक्षात घेऊन अंतिम दर ठरवले जातील. केंद्र आणि राज्य सरकार मदत करणार असल्यामुळे भाडे फार जास्त राहणार नाही आणि रोज प्रवास करणाऱ्यांसाठी काही सवलती मिळण्याचीही शक्यता आहे. या प्रकल्पाचा डीपीआर अहवाल लवकरच सादर होण्याची शक्यता आहे. डीपीआरला मंजुरी मिळाल्यानंतर टप्प्याटप्प्याने सेवा सुरू करण्याचा विचार आहे आणि पहिला टप्पा डिसेंबर २०२६ पर्यंत सुरू होऊ शकतो. मात्र हे सर्व नियोजन स्थानिक प्रशासनाची तयारी, तांत्रिक कामे आणि उपलब्ध निधी यावर अवलंबून असेल. खर्चाबाबत सध्या अंदाजे बाराशे कोटी रुपयांच्या गुंतवणुकीचा आकडा सांगितला जात आहे, पण केंद्र आणि राज्य सरकारांच्या धोरणानुसार हा खर्च बदलू शकतो. निधी उभारण्यासाठी केंद्र आणि राज्य मिळून खर्च उचलतील. काही कामांसाठी खासगी सहभागही असू शकतो आणि सेवा चालवण्यासाठी जादा मदत लागली तर ती जबाबदारी राज्य सरकारकडे राहू शकते. देशभरासाठी जाहीर केलेली मोठी योजना या प्रकल्पाला आर्थिक आधार देण्यासाठी उपयोगी ठरणार आहे. हा प्रकल्प सुरू झाला तर रस्ते, रेल्वे आणि इतर वाहतूक साधनांवरील गर्दी किती कमी होईल, हा महत्त्वाचा प्रश्न आहे. जलमार्ग सुरक्षित, सोयीचे आणि जलद असतील तर काही प्रवासी, विशेषतः किनारपट्टीवर मध्यम अंतर प्रवास करणारे लोक, बस, लोकल किंवा रिक्षाऐवजी बोटीने प्रवास करण्याचा पर्याय निवडू शकतात. त्यामुळे गर्दीच्या वेळेत रस्त्यांवरील ताण थोडा कमी होऊ शकतो. पण हा फायदा प्रत्यक्षात किती होईल, हे मार्गांची आखणी, सेवा किती वेळा मिळते, भाडे किती आहे आणि प्रवाशांना किती सोयी मिळतात यावर अवलंबून राहील. या प्रकल्पाकडून सकारात्मक अपेक्षा असल्या तरी या प्रकल्पात काही अडचणी आहेत. पावसाळ्यात मोठ्या लाटा, जोरदार पाऊस आणि प्रवाहामुळे सेवा खंडीत होऊ शकते किंवा थांबवावीही लागू शकते. काही ठिकाणी मार्ग खोल करण्यासाठी वारंवार माती आणि वाळू काढावी लागेल. पर्यावरणाच्या दृष्टीने पाहता समुद्री जीवसृष्टी आणि किनारपट्टीला धोका पोहोचू शकतो. जिथे सांडपाणी सोडले जाते तिथे प्रदूषण आणि गंज वाढू शकतो. मुंबईच्या समुद्रकिनाऱ्यांची आधीच असलेली प्रदूषणाची अवस्था पाहता हा प्रश्न अधिक गंभीर आहे. काही ठिकाणी जेट्टीसाठी सार्वजनिक किंवा पर्यावरणासाठी राखीव जागा वापरावी लागू शकते. शिवाय सेवा चालवण्याचा आणि देखभालीचा खर्च वाढला तर बॅटरी, चार्जिंगची सोय आणि सरकारी मदत यावर परिणाम होऊन भविष्यात भाडे वाढण्याची शक्यताही आहे. या प्रकल्पात सुरक्षेला खूप महत्त्व द्यावे लागेल. बोटींच्या हालचालीवर लक्ष ठेवण्यासाठी जीपीएससारखी यंत्रणा, सीसीटीव्ही कॅमेरे, सुरक्षा तपासणी आणि प्रशिक्षित कर्मचारी असणे गरजेचे आहे. पाण्यावर प्रवास करताना आग लागणे, इंजिन बंद पडणे, धडक होणे किंवा खराब हवामानामुळे अपघात होण्याचा धोका असतो. अशा वेळी लगेच मदत पोहोचण्यासाठी कोस्ट गार्डसोबत समन्वय आणि नियमित सराव आवश्यक ठरेल. रेल्वे किंवा मेट्रोपेक्षा जलवाहतुकीसाठी वेगळ्या प्रकारची सुरक्षा व्यवस्था उभारावी लागेल, तसेच मुंबईसाठी मजबूत आपत्कालीन मदत यंत्रणा तयार करणेही गरजेचे आहे. पर्यावरणाच्या दृष्टीने पाहिले तर बॅटरीवर चालणाऱ्या बोटी आणि कमी धूर सोडणारे तंत्रज्ञान यामुळे प्रदूषण कमी होऊ शकते. पण हा फायदा किती होईल, हे बॅटरी तयार करताना आणि चार्जिंगसाठी वापरली जाणारी वीज किती स्वच्छ आहे यावर अवलंबून आहे. हरित ऊर्जा वापरली नाही तर अपेक्षित फायदा कमी असू शकतो. तसेच मार्ग खोल करण्यासाठी होणारे खोदकाम आणि त्याचा समुद्री जीवसृष्टीवर होणारा परिणाम लक्षात घेता, पर्यावरणावर होणाऱ्या परिणामांचा सखोल अभ्यास करणे गरजेचे आहे आणि त्यासाठी ठोस योजना असावी लागेल. 'वॉटरवे' संदर्भातील रोजच्या कामकाजाचे आणि कायदेशीर मुद्देही तितकेच महत्त्वाचे आहेत. पाणी खोल नाही तिथे वारंवार खोदकाम करावे लागेल; जे खर्चिक आणि पर्यावरणासाठी संवेदनशील असते. याची जबाबदारी केंद्र आणि राज्य सरकारांनी आपापसात ठरवावी लागेल. काही किनारी भाग बंदर विभागाच्या हद्दीत येतात. त्यामुळे परवानग्या घेणे आणि वेगवेगळ्या यंत्रणांमध्ये समन्वय साधणे गरजेचे ठरेल. याशिवाय बोट चालक, इंजिनिअर, तंत्रज्ञ आणि बचाव पथकांना योग्य प्रशिक्षण देणे आवश्यक आहे, तसेच किनारी सुरक्षा नियम, समुद्री कामगारांचे कायदे आणि पर्यावरणाचे नियम काटेकोरपणे पाळावे लागतील. मुंबई वॉटर मेट्रोची घोषणा झाल्यापासून या प्रकल्पावर राजकीय पातळीवर वेगवेगळ्या प्रतिक्रिया उमटत आहेत. सत्ताधारी पक्ष हा प्रकल्प शहरातील वाहतूक कोंडी कमी करणारा, पर्यावरणासाठी उपयुक्त आणि भविष्यातील विकासासाठी महत्त्वाचा असल्याचे सांगत आहेत. मात्र विरोधकांचा आरोप आहे की सरकार घाईघाईत निर्णय घेत आहे. डीपीआर आणि पर्यावरणाच्या अभ्यासाबाबत पुरेशी माहिती दिलेली नाही आणि संपूर्ण प्रक्रियेत पारदर्शकता नाही.

जेट्टी आणि मार्ग तयार करण्यासाठी होणाऱ्या खोदकामामुळे समुद्रातील नैसर्गिक रचना आणि जलचर जीवांना धोका पोहोचू शकतो, अशी चिंता व्यक्त केली जात आहे. स्थानिक नागरी संघटना आणि पर्यावरणप्रेमी मॅन्ग्रोव्ह, किनारी वन आणि पाणथळ जागा वाचवण्याची मागणी करत आहेत आणि अशा संवेदनशील भागांमध्ये काम करताना विशेष काळजी घ्यावी, असे सांगत आहेत. तसेच बंदराच्या हद्दीत येणारी जागा वापरल्यास जमीन वापर, किनारी नियम आणि सार्वजनिक हित यांमध्ये वाद निर्माण होऊ शकतो, अशी भीतीही आहे. याशिवाय या प्रकल्पाचा स्थानिक मच्छीमार, कामगार, पारंपरिक बोटव्यवसाय करणारे आणि लहान व्यापारी यांच्यावर काय परिणाम होईल, याबाबतही प्रश्न उपस्थित होत असून, त्यांच्या पुनर्वसनाचा आणि रोजगाराच्या संधींचा स्पष्ट आराखडा द्यावा, अशी मागणी केली जात आहे. त्यामुळे हा प्रकल्प केवळ विकासाचा विषय न राहता राजकीय वाद आणि जनहिताच्या चर्चेचा मुद्दा बनला आहे. एकूण पाहता, वॉटर मेट्रो नीट नियोजन करूनच राबवला गेला पाहिजे. तांत्रिक तपासणी, पर्यावरणाचा अभ्यास, खर्चाबाबत स्पष्टता आणि लोकांचा सहभाग महत्त्वाचा आहे. हे सगळे लक्षात घेतल्यासच हा प्रकल्प मुंबईच्या भविष्यातील वाहतुकीसाठी खरोखर उपयोगी ठरू शकतो.

चर्चा आजची

# वनविभागाच्या दुर्लक्षामुळे 'निसर्गाची होळी'

संतोष राऊळ

नुकताच होळी सण साजरा झाला. पूर्वीच्या काळी होळी सण संपला की थंडी जाऊन उन्हाळ्याला सुरूवात होते. आणि त्याची जाणीव यंदा होळी संपल्यावर दुसऱ्याच दिवशी जाणवू लागली आहे. होळीच्या दिवशी जिल्ह्यात हजारो वृक्षांचे दहन करण्यात आले. त्यातच जिल्ह्याला पुन्हा 'वणवा' नावाचे संकट ग्रासू लागले आहे. त्यामुळे वन्य जिवांसह मानवाचे अस्तित्व देखील धोक्यात आले आहे. हा वन विभाच्या जाणिवपुर्वक दुर्लक्षाचा परिणाम असल्याचे निसर्गप्रेमींकडून बोलले जात आहे. पुढेही अशीच परिस्थिती राहिल्यास निसर्गाची होळी होण्यास विलंब लागणार नाही, अशी संतप्त प्रतिक्रीया देखील त्यांच्यातून उमटत आहे.


जिल्ह्यात नुकताच होळी सण मोठ्या उत्साहात साजरा झाला. पूर्वी होळी संपली की काही दिवसांत हळूहळू थंडी गायब होऊन उष्णता वाढत असे. मात्र, आता होळीच्या दुसऱ्याच दिवशी एकदमच उष्णता वाढली आहे. याला निसर्गाशी केलेली छेडछाड कारणीभूत ठरत आहे. विकासाच्या नावाखाली मोठ्या प्रमाणात होणारी झाडांची कत्तल निसर्गाचा समतोल बिघडवत आहे. जिल्ह्यात सर्वत्र रस्त्याच्या रूंदीकरणाची कामे सुरू आहेत. त्यामुळे रस्त्याच्या दुतर्फा असलेली झाडे देखील मोठ्या प्रमाणात तोडली जात आहे. नुकताच होळी सण साजरा झाला. यावेळी देखील जिल्ह्यात मोठ्या प्रमाणात झाडे तोडून त्यांचे दहन करण्यात आले. आपले पारंपारिक सण साजरे करणे आणि ते टिकवणे गरजेचे आहेच, परंतु त्याहीपेक्षा निसर्गाचे संवर्धन करणे गरजेचे आहे. एखादे झाड तोडायला काही तासांचा वेळ लागतो. मात्र, तेच झाड पौढ व्हायला कितीतरी वर्षांचा कालावधी लागतो. त्यामुळे ते झाड तोडताना विचार करणं गरजेचं आहे. परंपरा जपायची असेलच तर त्यावर उपाय म्हणून जी झाडे कमी कालावधीत वाढतात किंवा एखाद्या मोठ्या झाडाची फांदी दहन करून देखील जपता येईल. तसेच, यावर वनविभागाचा काही प्रमाणात वचक असणे अत्यंत गरजेचे आहे, असे निसर्ग प्रेमिंकडून बोलले जात आहे.

त्यातच पुन्हा आता जिल्ह्याला 'वणवा' नावाचे संकट ग्रासत आहे. गतवर्षी नोव्हेंबर महिन्यापासून मोठ्या प्रमाणात वणवे लागण्याच्या घटना घडल्या होत्या. थंडीच्या दिवसांत काही प्रमाणात वणवा लागण्याचे प्रकार कमी झाले होते. मात्र, आता पुन्हा वणवे लागण्याच्या घटना सातत्याने घडत आहेत. हे वणवे वाढत्या उष्णतेमुळे किंवा जाणिवपुर्वक लावले जात असल्याची शक्यता जाणकारांमधून वर्तविली जात आहे. या वाढत्या वणव्यांमुळे निसर्गप्रेमींकडून नाराजी व्यक्त केली जात आहे. वन विभागाला देखील वणवा भडकल्यावर जाग येत असून त्यांचे आग विझविण्याचे प्रयत्न देखील फोल ठरत असल्याचे निसर्गप्रेमींकडून बोलले जात आहे. रायगड जिल्हा हा कोकण किनारपट्टीवरील निसर्गरम्य असा जिल्हा आहे. येथे समुद्रकिनाऱ्यासह मोठ्या प्रमाणात डोंगर रांगा आहेत. नुकताचा होळी सण साजरा झाल्याने हिवाळा संपुष्टात आला असून दुपारच्या वेळेला उन्हाची तिव्रता देखील प्रचंड प्रमाणात वाढली आहे. परिणामी डोंगरावरील हिरवेगार गवत सुकू लागले आहेत. जिल्ह्यात दरवर्षी रस्ते, वाढते शहरीकरण, औद्योगिक विकास आणि खाणींच्या नावाखाली डोंगर फोडली जातात, हजारो वृक्षांची तोड केली जाते. त्यातच वणव्यांचे प्रमाण वाढल्याने उरली सुरलेली वनसंपदा देखील धोक्यात येत आहे. मानव आपल्या फायद्यासाठी सर्रासपणे या सर्व गोष्टी मुद्दामुन घडवून आणत आहे. त्यामुळे हे कुठेतरी थांबणे गरजेचे असल्याचे निसर्गप्रेमींकडून बोलले जात आहे. खरंतर देशात प्रत्येक गोष्टीसाठी सरकारने यंत्रणा स्थापन केलेली आहे. माणसांच्या सुरक्षिततेसाठी पोलीस तसे वन्य जिवांच्या सुरक्षीततेसाठी वन विभागाची स्थापना केलेली आहे. परंतु, त्यांच्याकडून वणवे लागू नयेत म्हणून कोणतीही उपाययोजना राबविली जात नसल्याचे निसर्गप्रेमींकडून बोलले जात आहे. मानवाने आपल्या फायद्यासाठी डोंगर पायथ्याशी लावलेल्या आगीचा जोरात सुटलेल्या वाऱ्यामुळे मोठा भडका उठतो आणि ती सुकलेल्या गवतात जाऊन पेट घेते. याकडे देखील वनविभागाचे लक्ष नसल्याचे बोलले जात आहे. परिणामी हळूहळू ती आग रुद्रावतार धारण करते आणि संपूर्ण डोंगर किंवा जंगले गिळंकृत करते. त्यामुळे डोंगरांवरील किंवा जंगलांतील वनसंपदा नष्ट होते. त्यामुळे येथील औषधी वनस्पती, हंगामी फळे, फुले आणि भाज्या यांसह पशु-पक्षी, वन्य प्राणी, सरपटणारे प्राणी व किटक यांचे अस्तित्व धोक्यात आले आहे. हे सर्व निसर्ग चक्र सुरळीत सुरू ठेवण्याचे काम करत असतात. परंतु, त्यांचेच अस्तित्व धोक्यात येत असेल तर निसर्गाचा समतोल राखला जाणार कसा, असा प्रश्न सध्या सर्वसामान्यांसमोर उभा राहत आहे. भविष्यातही असेच चालु राहिले तर मोठ्या नैसर्गिक संकटांना सामोरे जाण्याची चिंता निसर्गप्रेमींकडून व्यक्त केली जात आहे.

एखाद्या डोंगराला वणवा लागल्याचे समजले की वन विभागाकडून काही प्रमाणात ती आग विझविण्यासाठी प्रयत्न केले जातात. काही ठिकाणी तर फिरकत देखील नाही. जास्तीकरून हे वणवे सायंकाळच्या सुमारासाच दिसतात. आधिच वन विभागाकडे अपुरे मनुष्यबळ असून पुरेसी यंत्रणा नाही. त्यामुळे सायंकाळी लागलेली आग वन विभाग विझवणार तरी कशी? असा प्रश्न निसर्गप्रेमींकडून उपस्थित केला जात आहे. पुढेही अशीच परिस्थिती कायम राहिल्यास डोंगरावरील मानवी वस्तींसह वन्य जीव आणि वृक्षांचे अस्तित्व धोक्यात येत आहे. त्यामुळे वन विभागाने या 'वणवा' नावाच्या संकटाला दुर फेकण्यासाठी ठोस उपाययोजना करणे गरजे आहे. नाहितर निसर्गाची होळी होण्यास वेळ लागणार नाही, अशी संतप्त प्रतिक्रीय निसर्गप्रेमींमधून व्यक्त होत आहे.

लोकसंसद

## महागाईची झळ जाणवणार



इराणविरोधातील इस्रायलचे हवाई युद्ध अधिक तीव्र झाले आहे. इस्रायलने लेबनॉनवर हल्ला केल्यानंतर इराणने आखाती देशांमधील ऊर्जा व पायाभूत सुविधा तसेच होर्मुझ सामुद्रधुनीतील तेल टँकरवर हल्ले करून प्रत्युत्तर दिले. आता होर्मुझ सामुद्रधुनी बंद करण्यात आली आहे.

इराणमधील वाढत्या लष्करी संघर्षामुळे होर्मुझ सामुद्रधुनीतून होणारी वाहतूक थांबली असून, पश्चिम आशियातून इतर देशांना होणारा तेल व नैसर्गिक वायूंचा पुरवठा खंडित होण्याची भीती वाढली आहे. त्यामुळे युद्धाच्या तिसऱ्याच दिवशी जागतिक इंधनाच्या किमतींमध्ये वाढ झाली आहे. आंतरराष्ट्रीय स्तरावर कच्च्या तेलाच्या किमती सुमारे नऊ टक्क्यांनी वाढल्या आहेत. पर्शियन आखात आणि ओमानचा आखात यांना जोडणारी ही चिंचोळी होर्मुझ सामुद्रधुनी आहे. येथून जगातील सुमारे २० टक्के तेलाची वाहतूक होते. दररोज जवळपास दीड कोटी बॅरल तेलाची वाहतूक या मार्गाने होते. भारताच्या एकूण तेलपुरवठ्यापैकी सुमारे ४० टक्के तेल होर्मुझ सामुद्रधुनीतून येते. त्यामुळे ही समस्या भारतीयांसाठीही गंभीर ठरण्याची शक्यता आहे. आगामी काळात इंधनाचे दर वाढणार असून, त्याबरोबरच महागाईची झळही सर्वसामान्यांना बसणार आहे.

**- दत्तप्रसाद शिरोडकर, मुंबई**

दिनविशेष

# राष्ट्रीय बालहक्क संरक्षण आयोग

राष्ट्रीय बालहक्क संरक्षण आयोगाची स्थापना बालहक्क संरक्षण आयोग अधिनियम, २००५ अंतर्गत ५ मार्च २००७ रोजी करण्यात आली. ही एक भारतीय वैधानिक संस्था आहे. हे भारत सरकारच्या महिला आणि बाल विकास मंत्रालयाच्या प्रशासकीय नियंत्रणाखाली कार्य करते. आयोगाचे कार्य म्हणजे सर्व कायदे, धोरणे, कार्यक्रम आणि प्रशासकीय व्यवस्था भारतीय संविधानात तसेच संयुक्त राष्ट्रांच्या बाल हक्कांवरील अधिवेशनात नमूद केलेल्या बालकांच्या हक्कांच्या दृष्टिकोनाशी सुसंगत आहेत याची खात्री करणे. आयोगानेपरिभाषित केल्याप्रमाणे, बालकांमध्ये १८ वर्षांपर्यंतच्या व्यक्तींचा समावेश होतो. राष्ट्रीय बाल हक्क संरक्षण आयोग ही




देशातील बाल हक्कांचे समर्थन, देखरेख आणि सुविधा देणारी सर्वोच्च संस्था आहे. बाल संरक्षण म्हणजे युनिसेफच्या किंवा युनिसेफच्या भागीदारांच्या कामामुळे उद्भवणाऱ्यामुलांना होणाऱ्या प्रत्यक्ष आणि अप्रत्यक्ष जोखीम मर्यादित करण्यासाठी घेतलेल्या सक्रिय उपाययोजना. यामध्ये हे समाविष्ट असू शकते: शारीरिक हिंसाचार (शारीरिक शिक्षेसह) लैंगिक हिंसाचार, शोषण किंवा गैरवापर. कोणत्याही समाजाच्या भविष्यातील कल्याणासाठी मुलांचा निरोगी विकास महत्त्वाचा असतो. गरिबी, अपुरी आरोग्य सेवा, पोषण, सुरक्षित पाणी, गृहनिर्माण आणि पर्यावरणीय प्रदूषण यासारख्या वाईट राहणीमान परिस्थितींना मुले विशेषतः असुरक्षित असतात. त्यामुळे बाळ हक्क महत्वाचे समझले जातात. १९५९ मध्ये, संयुक्त राष्ट्रांच्या महासभेने बाल हक्कांची घोषणापत्र स्वीकारले, ज्यामध्ये संरक्षण, शिक्षण, आरोग्य सेवा, निवारा आणि चांगले पोषण या मुलांच्या हक्कांची व्याख्या केली गेली. भारतात बालकांचे १० मूलभूत हक्क आहेत - जगण्याचा अधिकार, शिक्षण, संरक्षण, सहभाग, विकास, आरोग्य आणि कल्याण, ओळख, अभिव्यक्ती, भेदभाव न करणे आणि सुरक्षित वातावरण. मुलांसाठी मूलभूत बाल संरक्षण कायदा चार मुख्य कायद्यांमध्ये अंतर्भूत आहे: बाल न्याय (काळजी आणि संरक्षण) कायदा (२०००, २०१५ मध्ये सुधारित); बालविवाह प्रतिबंध कायदा (२००६); लैंगिक गुन्ह्यांपासून मुलांचे संरक्षण कायदा (२०१२), आणि बालकामगार (प्रतिबंध आणि नियमन) कायदा (१९८६) याशिवाय, आयोगाकडे इतर दोन कायद्यांअंतर्गत जबाबदाऱ्या आहेतलैंगिक गुन्ह्यांपासून मुलांचे संरक्षण कायदा, २०१२ च्या अंमलबजावणीवर लक्ष ठेवणे आणि माहिती अधिकार कायदा, २००५ अंतर्गत प्रदान केलेल्या सुरक्षा उपायांचे परीक्षण आणि पुनरावलोकन करणे तसेच, मुलांच्या मोफत आणि सक्तीच्या शिक्षणाच्या अधिकाराशी संबंधित तक्रारींची चौकशी करणे. मात्र, साथीच्या आजारामुळे बाल कुपोषण, बालमजुरी, बाल शोषण, बालविवाह आणि मानसिक आजार यासारख्या विद्यमान समस्यांमध्ये वाढ झाली आहे. ही परिस्थिती देशातील सर्व बाल-संबंधित संस्थांना बळकटी देण्याची गरज पुन्हा एकदा अधोरेखित करते. त्यामुळे ही गरज पूर्ण करण्यासाठी आणि मुलांच्या कल्याणासाठी आपली दृढ आणि निष्पक्ष वचनबद्धता कायम ठेवण्यासाठी, राष्ट्रीय बाल हक्क संरक्षण आयोगाला सुधारणांची आवश्यकता आहे.

# ‘लालपरी’ देणार महसूलवाढीला वेग

| मुंबई | प्रतिनिधी |

महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यात धावणारी ‘लालपरी’ आता केवळ प्रवाशांनाच नव्हे, तर महसूलवाढीलाही वेग देणार आहे. पुढील पाच वर्षांत केवळ जाहिरातींच्या माध्यमातून एसटी महामंडळाला तब्बल २५० कोटी रुपयांपेक्षा अधिक महसूल मिळणार आहे. अशी माहिती परिवहन मंत्री तथा एसटी महामंडळाचे अध्यक्ष प्रताप सरनाईक यांनी दिली. एसटी महामंडळाच्या मुख्यालयात पार पडलेल्या ३१० व्या संचालक मंडळाच्या बैठकीत ते बोलत होते.

या बैठकीस परिवहन आयुक्त राजेश नार्वेकर, एसटी महामंडळाचे उपाध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक डॉ. माधव कुसेकर, सहा.कामगार आयुक्त पल्लवी सहारे, तसेच सर्व खातेप्रमुख उपस्थित होते.



- जाहिरातीतून एसटी कमविणार २५० कोटी
- परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांची माहिती

यावेळी मंत्री सरनाईक म्हणाले की, एसटी महामंडळाची २५१ आगारे आणि ६१० पेक्षा अधिक लहान-मोठी बसस्थानके राज्यभर आहेत. सुमारे १२ हजार बसेसच्या ताफ्याद्वारे दररोज ५० ते ५५ लाख प्रवाशांची ने-आण केली जाते. भविष्यात बससंख्या वाढल्यानंतर ही दैनंदिन प्रवासी संख्या १ कोटींपर्यंत जाईल. अशा व्यापक पोहोच असलेल्या माध्यमावर जाहिरात देणे म्हणजे उत्पादकांसाठी सुवर्णसंधीच आहे.

चांद्यापासून बांद्यापर्यंत, गावखेड्यांपासून महानगरांपर्यंत पोहोचणाऱ्या एसटीच्या प्रत्येक चाकासोबत आता महसुलाची नवी चक्रेही फिरणार आहेत. बसस्थानके, त्यांचा परिसर, बसेसच्या आतील व बाहेरील भाग तसेच उपलब्ध सर्व संसाधनांचा पुरेपुर वापर करून जाहिरात महसूल वाढविण्याचा महत्त्वाकांक्षी आराखडा तयार करण्यात आला आहे. यासाठी स्पर्धात्मक निविदा प्रक्रिया राबविण्यात आली असून, पुढील पाच वर्षांसाठी २५० कोटी रुपयांहून अधिक महसूल देणारी निविदा स्वीकारण्यात आल्याचे त्यांनी सांगितले. सद्यस्थितीत कार्यरत असलेले जाहिरात परवानाधारकांचा परवाना कालावधी समाप्त झाल्यानंतर जाहिरातीचे अधिकार नवीन परवानाधारकांकडे जाणार आहेत.

> “सध्या जाहिरातींद्वारे दरवर्षी सुमारे २२ कोटी रुपयांचे उत्पन्न मिळते. नव्या निविदेमुळे या उत्पन्नात तब्बल दुपटीपेक्षा जास्त वाढ होणार आहे. अशाप्रकारे तिकीट विक्रीव्यतिरिक्त विविध पर्यायी स्रोतांमधून उत्पन्न निर्माण झाले, तर एसटीला भविष्यात तोट्याच्या गर्तेत जाण्याची वेळ येणार नाही.”
> – प्रताप सरनाईक, एसटी महामंडळाचे अध्यक्ष

## अभिष्टचिंतन ज्येष्ठ नागरिकांचे

५ मार्च

१) श्री.लक्ष्मण नारायण पाटील श्रीबाग-२, अलिबाग दि.०५-०३-१९४१
२)श्री.आत्माराम शांताराम गोळे मु.वेश्वी, ता.अलिबाग दि.०५-०३-१९४४
३)श्री.मोरेश्वर परशुराम बंदरी मेटपाडा, अलिबाग दि.०५-०३-१९४४
४)श्रीम.वर्षा रमेश दिवेकर अलिबाग दि.०५-०३-१९५७
५)श्रीमती अमिता अमर म्हात्रे मु.गुंजीस, अलिबाग दि. ०५-०३-१९५८

## कृषीवलच्या वाचकांना आवाहन




अलिबाग येथील श्री कच्छी जैन भवन चॅरिटेबल ट्रस्टच्या वतीने अन्नदानासाठी एक अभिनव योजना आखली आहे.जिल्हा रुग्णालयात दाखल असलेल्या रुग्णांच्या एका नातेवाईकाला जेवणाची सोय करण्यात आली आहे. या योजनेत दररोज किमान ७०/८० लोक जेवत असतात. या जेवणाचा खर्च प्रति दिवस रु. ३००० असून ही देणगी देणाऱ्याचा फोटो कृषीवलमध्ये छापला जाईल. तरी जास्तीत जास्त लोकांनी अन्नदान सेवेचा लाभ घेऊन या सामाजिक उपक्रमात सहभागी व्हावे असे आवाहन कृषीवल करीत आहे.

**संपर्क- ८०५५३२५६७८ (बीपीन राठवा) ९२२६०५५१५५ (अमित शहानंद)**

**- मुख्य संपादक, कृषीवल**

**आजचे अन्नदाते**



**कै. बाळाराम शंकर पाटील, स्मरणार्थ अलिबाग**



**कै.स्मिता सुधाकर कुलकर्णी स्मरणार्थ अलिबाग**

## दौलत सानप यांचे निधन

| खांब | प्रतिनिधी |



रोहा तालुक्यातील संभे गावचे रहिवासी दौलत सहादेव सानप यांचे बुधवार दि.२५ फेब्रुवारी रोजी रोहा येथील निवासस्थानी अल्पशा आजाराने निधन झाले. त्यांनी सुदर्शन कंपनीमध्ये अत्यंत प्रामाणिकपणे व निष्ठेने नोकरी करून एक आदर्श कामगार म्हणून नावलौकिक मिळविले होते. तसेच सामाजिक बांधिलकीच्या भावनेतून ते सामाजिक क्षेत्रातही नेहमीच कार्यरत असायचे. त्यांच्या निधनाने सानप परिवारासह संभे गावावर शोककळा पसरली आहे. त्यांच्या पश्चात दोन भाऊ, पुतणे असा परिवार आहे. त्यांचे दशक्रियाविधी शुक्रवार दि.६ मार्च रोजी, तर अंतिम धार्मिकविधी रविवार दि.८ मार्च रोजी संभे येथील निवासस्थानी होणार आहे.

# चोंढी पंचक्रोशीत होळीचा उत्साह

| चोंढी | प्रतिनिधी |

अलिबाग तालुक्यातील चोंढी येथील पंचक्रोशीत होळी व धुलीवंदनाचा एक वेगळाच उत्साह पाहायला मिळाला. गणेशोत्सवानंतर होळीनिमित्त गावं पुन्हा एकदा गजबजलेली दिसून आली. चोंढी पंचक्रोशीतील किहीम, कामथ, चोंढी, बामणसुरे आदी भागात होळी व धुलिवंदन मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली.



धुलीवंदनाच्या दिवशी लहानांपासून ते मोठ्यांपर्यंत सर्वांनीच सकाळपासूनच रंगीबेरंगी रंगात रंगत आनंदाने पारंपरिक वाद्यासह वाजतगाजत गल्लोगल्ली जाऊन पोस्त घेतली. यावेळी लहान मुलांनी विविध वेशभूषा व सोंगे परिधान करून पिचकारी, रंगांचे फुगे, रंगांच्या बालद्या, डबे आदींच्या साहाय्याने एकमेकांनावर रंग उडवत आपला व इतरांचा आनंद द्विगुणित केला, यामध्ये लहान मुली, मुले व महिला देखील तेवढ्याच उत्साहात सहभागी झाल्या होत्या. किहीम समुद्रकिनारी संध्याकाळपर्यंत परिसरातील लहान मुले, मुली, महिला व पुरुषांनी गर्दी करत पोहण्याचा आनंद लुटला, यावेळी समुद्रकिनारी सुरक्षेच्या दृष्टीने विशेष पोलीस बंदोबस्त तैनात करण्यात आला होता. धुलिवंदनाच्या दिवशी पहाटेपासूनच चिकन -मटणाच्या सर्व दुकानांवर नागरिकांनी तोबा गर्दी केली होती. होळी व धुलीवंदनाच्या निमित्ताने कोणताही अनुचित प्रकार घडू नये, यासाठी मांडवा सागरी पोलीस ठाणेतर्फे जागोजागी विशेष बंदोबस्त ठेवण्यात आला होता.

# म्हसळा तालुक्यात होळी उत्साहात

| म्हसळा | प्रतिनिधी |

म्हसळा तालुक्यात सर्वत्र होळी सण मोठ्या उत्साहात साजरा झाला. या काळात सर्व मुंबईकर आणि इतरत्र असणारी मंडळी आपल्या गावी येऊन होळीची परंपरा राखत शिमगा सण आनंदात साजरा केला. ग्रामदेवतेच्या मुख्य मंदिरासमोर पहिला होम लावण्याची पूर्वापार प्रथा असल्याने रात्री सव्वाबारा वाजण्याच्या सुमारास म्हसळा शहरातील मुख्य होळी विधीव्रत पूजा करून लावण्यात आली. येथील ग्रामस्थ मंडळाची मुख्य होळी लावल्यानंतर शहरातील गौलवाडी, चिराठी, दुर्गवाडी, श्रीराम पेठकर समाज, सोनार-कासार समाज, बेलदार वाडी, लवासा कॉलनी, सावर, आदिवासी वाडी इत्यादी ठिकाणच्या होळ्या लावण्यात आल्या.



(छायाचित्र: उदय कळस)

## अखंड हरिनाम सप्ताहाचे आयोजन

**खांब** : रोहा तालुक्यातील नामवंत अशा श्रीसंत सेवा मंडळ खांब पंचक्रोशीचा ६९ वे अखंड हरिनाम सप्ताह व श्री ग्रंथराज ज्ञानेश्वरीचे पारायण श्री क्षेत्र चिल्हे येथे ९ मार्च ते १६ मार्च या कालावधीत होणार आहे. या सप्ताहात दररोज पहाटे काकड आरती, सकाळी श्री ग्रंथराज ज्ञानेश्वरीचे पारायण, दुपारी संत तुकाराम महाराज यांच्या भजनावर आधारित गाथा भजन, महाप्रसाद, सायं. प्रवचनरूपी सेवा, सामुदायिक हरिपाठ, रात्री हरिकिर्तन तद्नंतर सामुदायिक जागर भजन आदी धार्मिक कार्यक्रम होणार आहेत.

# धारवली गावात शिमगोत्सव जल्लोषात साजरा

| श्रीवर्धन | प्रतिनिधी |

रायगड जिल्ह्यातील धारवली या निसर्गरम्य गावात यंदाचा होळी उत्सव अभूतपूर्व उत्साहात आणि पारंपरिक जल्लोषात साजरा करण्यात आला. संपूर्ण गाव ‘होळी रे होळी, पुरणाची पोळी’च्या जयघोषाने दुमदुमून गेले होते.

धारवली गावातील होळीचे प्रमुख वैशिष्ट्य म्हणजे तिची शिस्तबद्ध आणि पारंपरिक मांडणी. ग्रामस्थांनी रानातून नैसर्गिक लाकूड, वाळलेल्या झाडांच्या फांद्या आणि काडीकचरा गोळा करून भव्य होळी उभारली. कोणताही कृत्रिम किंवा पर्यावरणाला हानी पोहोचवणारा साहित्य न वापरता पर्यावरणपूरक पद्धतीने होळी सजवण्यात आली. होळीच्या ठिकाणी रंगीबेरंगी पताका, फुलांची आरास आणि आकर्षक सजावट करण्यात आली होती. सायंकाळी सूर्यास्तानंतर मंत्रोच्चार आणि पारंपरिक विधी करून होळी प्रज्वलित करण्यात आली.



### परंपरा, श्रद्धा आणि एकोप्याचे दर्शन

या वर्षीच्या उत्सवात गावातील तरुणांनी विशेष पुढाकार घेतला. उत्सवाच्या नियोजनापासून ते सजावटीपर्यंत सर्व कामांमध्ये तरुण मंडळ सक्रिय होते. ढोल-ताशांच्या गजरात आणि पारंपरिक कोकणी गाण्यांच्या तालावर ग्रामस्थांनी फेर धरत जल्लोष केला.

लहान मुलांपासून ज्येष्ठ नागरिकांपर्यंत सर्वांनी उत्सवात सहभाग घेतला. महिलांनी पारंपरिक वेशभूषेत उपस्थिती लावत सणाची शोभा वाढवली. काही ठिकाणी पारंपरिक खेळ, फुगडी आणि नृत्यांचे सादरीकरण करण्यात आले.

मुंबई, ठाणे, वसई-विरार आदी शहरांमध्ये नोकरी-व्यवसायानिमित्त स्थायिक झालेले गावकरी विशेषतः या सणासाठी धारवलीत दाखल झाले होते. या उत्सवाच्या माध्यमातून धारवलीत सामाजिक एकोप्याचे चित्र पाहायला मिळाले.

# राज्यस्तरीय खरेदीदार-विक्रेता संमेलन

- ५.५० कोटींची उलाढाल; ७० महिला शेतकरी उत्पादक कंपन्यांचा सहभाग

| मुंबई | प्रतिनिधी |

महाराष्ट्र शासनाच्या ग्रामविकास विभागांतर्गत राबविण्यात येणाऱ्या उमेद -महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियानाच्या वतीने वाशी येथील सिडको प्रदर्शन केंद्रात राज्यस्तरीय खरेदीदार-विक्रेता संमेलन आयोजित करण्यात आले होते. या एकदिवसीय संमेलनात सुमारे ५.५० कोटी रुपयांची विक्रमी उलाढाल झाली असून, महिला शेतकरी कंपन्यांना हक्काची बाजारपेठ मिळवून देण्यात उमेदला उल्लेखनीय यश आले आहे.

या खरेदीदार-विक्रेता संमेलनामुळे महिला शेतकरी उत्पादक कंपन्यांमधील परस्पर खरेदी-विक्रीलाही मोठे प्रोत्साहन मिळाले आहे. उमेदच्या या उपक्रमामुळे ग्रामीण भागातील महिलांच्या आर्थिक सक्षमीकरणाला मोठी चालना मिळत आहे.

राज्यातील महिला शेतकरी उत्पादक कंपन्यांनी पिकवलेल्या मालाला मध्यस्थांशिवाय थेट बाजारपेठ मिळावी आणि महिला शेतकऱ्यांना त्यांच्या उत्पादनाचा योग्य भाव व अधिक नफा मिळावा, हा या संमेलनाचा मुख्य उद्देश होता. या व्यासपीठामुळे पहिल्यांदाच ७० महिला शेतकरी उत्पादक कंपन्या आणि नामांकित खरेदीदार समोरासमोर आले. दिवसभरात २६७ टन उत्पादनांच्या विक्रीतून २.१५ कोटी रुपयांची थेट उलाढाल झाली.

### राज्यभरातील ३५ उत्पादनांची विक्री

या प्रदर्शनात महाराष्ट्राच्या विविध भागांतील भौगोलिक मानांकन प्राप्त आणि वैशिष्ट्यपूर्ण ३५ उत्पादने विक्रीसाठी उपलब्ध होती. यामध्ये प्रामुख्याने: कोकणातून काजू, कोकम, मँगो पल्प आणि नाचणी हा शेतमाल होता. पश्चिम महाराष्ट्रातून पुण्याचा इंद्रायणी तांदूळ, जुन्नरची द्राक्षे-कांदा, सोलापूरची मालदांडी ज्वारी आणि कोल्हापूरचा गुळ व मिरची या प्रकारचा शेतमाल होता. विदर्भ व मराठवाड्यातून वर्ध्याची वायगाव हळद, नागपूरची भिवापुरी मिरची, लातूरची पांढरी तूरडाळ, नांदेडची अर्धापूर हळद आणि भंडारा-गडचिरोलीचा चिनूर व कालीमुछ तांदूळ असा शेतमाल ग्रामीण महिलांनी उपलब्ध करून दिला होता.

## क्षुल्लक वादातून तरुणाची हत्या

**मुंबई** : वडाळ्यातील कोकरीपाडा येथे मंगळवारी (दि.३) दुपारी ४.३० वाजण्याच्या सुमारास क्षुल्लक कारणातून एका तरुणाची हत्या करण्यात आली. तुषार उज्जैनवाला (२२) असे मृत तरुणाचे नाव आहे. होळी साजरी केल्यानंतर आरोपी बिअर पित बसले होते. यादरम्यान, तुषार तेथून जात असताना त्याचा पाय चुकून एका आरोपीला लागला. यावरून पीडित आरोपीमध्ये वाद झाला. यानंतर तुषारने घरी मोठ्या भावाला घटनेबाबत माहिती दिली. यानंतर दोघे भाऊ पुन्हा आरोपींना जाब विचारण्यास गेले असता आरोपींनी त्याला गंभीर मारहाण केली. यात तुषारचा मृत्यू झाला.

**पर्यावरणपूरक उपक्रमातून होळी साजरी | फ्रेंड्स ऑफ नेचरचा पुढाकार**

# मृतप्राय झालेल्या झऱ्यांना नवसंजीवनी

| उरण | प्रतिनिधी |

दरवर्षीप्रमाणे यावर्षीही फ्रेंड्स ऑफ नेचर या पर्यावरणप्रेमी व निसर्गप्रेमी संस्थेतर्फे आगळीवेगळी धुळवड साजरी केली. फ्रेंड्स ऑफ नेचर (फॉन) सर्पमित्र निसर्गसंवर्धन संस्था, चिरनेर-उरणचे सदस्यांच्या सहकार्याने वन्यजीव अधिवासातील मृतप्राय झालेल्या झऱ्यांना नवसंजीवनी देण्याचा उपक्रम राबविण्यात येतो. चिरनेर येथील फॉन संस्थेच्या श्री बापूजी देव देवराई प्रकल्पातील केलेल्या वृक्षारोपणाची मशागत, साफसफाई तसेच परिसरातील पेरीचे पाणी या पारंपरिक पाणवठ्यावर धुळवडीच्या दिवशी श्रमदान करून झऱ्याचे पुनरुज्जीवन करण्यात आले.



अनेक वर्षांपूर्वी या पाणवठ्याचा उपयोग स्थानिक आदिवासी कातकरी समाज पिण्याच्या पाण्यासाठी करीत होता; परंतु वापर बंद झाल्याने ते गाळाने पूर्णपणे बुजले जातात. दरवर्षीप्रमाणे या वर्षीही संस्थेने सातत्याने गाळ काढून पाण्याचा नैसर्गिक प्रवाह पुनर्संचयित केला व वन्यजीवांसाठी पिण्याच्या पाण्याची सोय उपलब्ध करून दिली होती. मागील सहा वर्षांपासून धुलिवंदनाच्या दिवशी संस्था निसर्गनिर्मित पण सुप्तावस्थेत गेलेल्या पाणवठ्यांचे पुनरुज्जीवन करण्याचा उपक्रम सातत्याने राबवत आहे.

वाढत्या उष्णतेमुळे पाण्याचे बाष्पीभवन वेगाने होत असल्याने जलसाठे लवकर आटतात आणि पाण्याचे दुर्भिक्ष निर्माण होते. मानव आपल्या गरजेसाठी एका ठिकाणावरून दुसऱ्या ठिकाणी जाऊ शकतो; परंतु जंगलातील वन्यजीवांसाठी हे शक्य नसते. पाण्याच्या शोधात ते मानववस्तीच्या जवळ आले, तर अपघात, मानव-वन्यजीव संघर्ष किंवा शिकार, इ. धोका संभवतो. या संभाव्य धोक्यांची तीव्रता कमी करण्यासाठी आणि नैसर्गिक अधिवासातच जलस्रोत उपलब्ध करून देण्यासाठी फॉन संस्था हा उपक्रम गेली ६ वर्षे राबवत आहे. आजतागायत फॉन संस्थेतर्फे कडापे डोंगर, साई डोंगर, चिरनेर पोंडा, पेरीचे पाणी (चांदायले वाडी), श्री बापूजी देव देवराई, चिरनेर ठिकाणी पाणवठ्यांचे पुनरुज्जीवन करण्यात आले आहे.

उरण पूर्व विभाग परिसरातील अधिवासांमध्ये जलसंवर्धनाचे प्रयत्न करणे गरजेचे आहे. विकासाच्या नावाखाली होणारी अमर्याद वृक्षतोड, डोंगरांचे सपाटीकरण आणि मानव निर्मित वणव्यांची समस्या लक्षात घेता, अशा उपक्रमांची गरज अधिक प्रकर्षाने जाणवते.

## निवडक

### शिमगा मोठ्या उत्साहात साजरा



**रसायनी** : कोयना जांब्रुक वावंढळ या गावचा शिमगा मोठ्या उत्साहात आणि परंपरेनुसार साजरा झाला. कोयना जांब्रुक वावंढळ हे गाव कोयना धरणामुळे बाधित होऊन रायगड जिल्हा, खालापूर तालुक्यातील वावंढळ या ठिकाणी वसले आहे. ६६ वर्षांपूर्वी जुन्या गावात असलेली रूढी परंपरा आजही नवीन गावात अबाधित आहे. पहाटे पाच वाजता होळीला फेऱ्या मारून होळी मानकरी यांच्या हस्ते पेटविण्यात आली. त्यानंतर तरुण पिढीने पालखी नाचवली, सकाळी पालखी सानेवार बसल्यावर पालखीत श्री जानाई व श्री इंजाई यांच्या मूर्तींची प्रतिष्ठापना केली. त्यानंतर ग्रामस्थानी दोन्ही देवींची ओटी भरली आणि ग्रामस्थ यांची वार्षिक सभा पार पडली. कोयना प्रकल्पामुळे विस्थापित झालेल्या या गावाने आजही आपली रूढी परंपरा राखल्याने गावच्या परिसरातील अनेक गावांतील भाविक येथे देवीची ओटी भरण्यासाठी येतात.

### होळीचा सण पारंपारिक पद्धतीने साजरा



**कोर्लई** : मुरुड तालुक्यासह नांदगाव, मजगांव, आदाड बोर्ली-मांडला येथे होळी पौर्णिमा व धुळवडीचा सण पारंपारिक पद्धतीने साजरा करण्यात आला. मजगांवमधील नवापाडा कोळी समाजाच्यावतीने होळीला आकर्षक रंग, रांगोळी व विद्युत रोषणाई करण्यात आली होती. बोर्ली गावातील होळी पूर्वपरंपार सुरू आहे. बोर्ली गावामध्ये स्वातंत्र्यपूर्व काळापासून ‘एक गाव, एक होळी’ ही संकल्पना जपण्यात आली आहे. महाशिवरात्रीनंतर छोट्या होळ्यांची सुरुवात होते. यंदाही सर्व बाळ गोपाळांनी अखंड गावभर फिरून लाकडे गोळा करत छोट्या होळ्या साजऱ्या केल्या आणि शेवटच्या दिवशी म्हणजेच फाल्गुन पौर्णिमेच्या दिवशी प्रत्येक घरामागे एक लाकूड व एक नारळ होळीमध्ये अर्पण करण्यात आला. होळीच्या दिवशी सकाळी सर्व कोळी बांधवांनी आपल्या मासेमारी होड्या सजवून बंदरात वाजत गाजत मिरवणूक काढली. त्यानंतर संध्याकाळी प्रत्येक होडीवर असणारा नाखवा-खलाशी यांनी वाजत गाजत होळीची आरती केली. रात्रीच्या मुहूर्तावर गाव पाटील याने समस्त गावकऱ्यांच्या साथीने होळीला चुड देऊन दहन केले.

### उरणमध्ये होळी-धुळवड जल्लोषात




**उरण :** उरणमध्ये होळी व धुळवड सण मोठ्या उत्साहात आणि शांततेत साजरा करण्यात आला. कुठलाही अनुचित प्रकार न घडता नागरिकांनी पारंपरिक पद्धतीने सणाचा आनंद लुटला. फाल्गुन पौर्णिमेच्या सायंकाळी शहरासह ग्रामीण भागात होलिका दहन करण्यात आले. ‘वाईट प्रवृत्तींचे दहन’ हा संदेश देत नागरिकांनी होळीभोवती प्रदक्षिणा घालत सामाजिक ऐक्याची प्रार्थना केली. होलिका दहनाच्या ज्वाळांनी अन्याय, अहंकार आणि नकारात्मकतेवर मात करण्याचा संदेश दिला. दुसऱ्या दिवशी धुळवडीत रंगांची उधळण झाली. तरुणाईने ढोल-ताशांच्या गजरात जल्लोष केला. गालावर लावलेला गुलाल हा समतेचा आणि बंधुभावाचा प्रतीक ठरला. जाती-धर्म, श्रीमंत-गरीब या सर्व भेदांपलीकडे जाऊन नागरिकांनी एकमेकांना रंग लावत सण साजरा केला. शहरात पोलीस बंदोबस्त ठेवण्यात आला होता. प्रशासनाच्या सतर्कतेमुळे कोणतीही अप्रिय घटना घडली नाही.

### सुतारवाडीत होळी, धुळीवंदन उत्साहात



**सुतारवाडी :** सुतारवाडी आणि अन्य परिसरांमध्ये होळी आणि धुलीवंदन सण उत्साही वातावरणात, ग्रामस्थांच्या उपस्थितीत पार पाडला. या दिवशी सुरत, पुणे, ठाणे, मुंबई, तसेच अन्य शहरांमध्ये नोकरीनिमित्त गेलेले ग्रामस्थ मोठ्या संख्येने या सणासाठी उपस्थित होते. रात्री सुतारवाडी ग्रामस्थांनी होळीच्या मैदानात पारंपारिक पद्धतीने होळीला अग्नी देऊन नारळ अर्पण केला. दुसऱ्या दिवशी धुळीवंदनाच्या दिवशी सकाळपासूनच लहानांपासून मोठ्यांनी रंगाची उधळण करून धुलीवंदन रंगपंचमी जल्लोषात साजरी केली.

### धनंजय पाटील यांना सन्मानपूर्वक निरोप



**उरण :** महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळात तब्बल ३२ वर्षे १० महिने प्रामाणिक सेवा बजावणारे धनंजय मंगलदास पाटील यांचा सेवानिवृत्तीनिमित्त उरण आगारात सन्मानपूर्वक निरोप देण्यात आला. धनंजय पाटील यांनी १ एप्रिल १९९३ रोजी कर्जत डेपोमध्ये एसटी सेवेत प्रवेश केला. त्यांनी १२ वर्षे १० महिने कर्जत डेपोमध्ये कार्यरत राहून सेवा बजावली. त्यानंतर मागील २० वर्षे उरण डेपोमध्ये वाहक पदावर कार्य करत प्रवाशांची निष्ठेने सेवा केली. उरण आगाराचे व्यवस्थापक गद्रे यांच्या मार्गदर्शनाखाली त्यांनी आगारातील विविध उपक्रमांमध्ये पुढाकार घेतला. महाराष्ट्र एसटी कर्मचारी काँग्रेसचे डेपो सचिव म्हणूनही त्यांनी जबाबदारी सांभाळली. उरण आगाराच्या विकासासाठी त्यांनी डेपोची रंगरंगोटी करून परिसर सुशोभित केला, रूट बोर्ड (नामफलक) बसवून प्रवाशांना सुविधा उपलब्ध करून दिली. तसेच सुमारे १०० झाडांची लागवड केली. कर्मचाऱ्यांच्या सोयीसाठी कुलरची व्यवस्था करण्यातही त्यांनी पुढाकार घेतला. सेवानिवृत्तीच्या निमित्ताने आगारातील सुमारे १२५ चालकांचा सन्मान केला. त्यांच्या या उपक्रमाचे सहकाऱ्यांकडून विशेष कौतुक करण्यात आले.

# ग्रामीण भागात डोंगरांना वणवे

- वनविभागाने जागृत होणे गरजेचे
- वन्यजीवसृष्टी धोक्यात

। महाड । प्रतिनिधी ।

**सध्या डोंगर दऱ्यामध्ये वणवे लागल्याच्या घटना मोठ्या प्रमाणात घडत आहेत. आज्ञातांकडून खोडसाळ पणे वणवे लावण्याचे प्रकार दिवसेंदिवस वाढत आहेत. याला चाप बसण्यासाठी शासनस्तरावर कायद्याची कडक अंमलबजावणी होणे गरजेचे आहे. होळी सणाच्या दरम्यान वणवे लावण्याचे प्रकार सतत घडत असतात.**



वणवे टाळण्यासाठी शासनस्तरावर जनजागृती बरोबरच ठोस उपाययोजनांची गरज निर्माण झाली आहे. त्यामुळे जंगलात निर्माण झालेले शुष्क वातावरण हे आगीच्या तीव्रतेला हातभार लावण्यास कारणीभूत ठरत आहे. त्याचबरोबर विविध ठिकाणी विकृत मानसिकते पोटी लावले जाणारे वणवे ही पर्यावरणा समोरील खूप मोठी समस्या बनली आहे. रोज कुठे ना कुठे वणवा लागल्याच्या घटना घडताना दिसत आहेत.

वणव्यामुळे अनेक पक्षी त्यांची घरटी, सरपटणारे प्राणी, सूक्ष्म जीव यांची मोठ्या प्रमाणात होणारी जीवितहानी फळझाडे, बहुगुणी वनौषधी जळून खाक होते ही मोठी चिंतेची बाब आहे. याशिवाय जंगलातील नैसर्गिक व अनैसर्गिक वणव्याला निसर्गातील असमतोल यासाठी मानव अप्रत्यक्षपणे जबाबदार आहे. ज्या परिसरामध्ये वणवा लागतो तेथील जमीन जैवविविधतेच्या दृष्टीने पुनर्स्थापित होण्यासाठी बराच कालावधी जावा लागतो त्यामुळे जंगले विरळ होत चालली आहेत.

मानवनिर्मित वणवे बेकायदेशीर व अनैतिक सुद्धा आहेत याचा गांभीर्याने विचार करणे आवश्यक आहे. नैसर्गिक व अनैसर्गिक वणव्याच्या दाहकतेतून जंगलांना, निसर्गाला, पर्यावरणाला वाचवायचे असेल तर सरकारने वणवा मुक्त गाव योजना, आमचा गाव वणवा मुक्त गाव, प्रत्येक गावामध्ये ग्रामसभा घेऊन वृक्षवली अभियान, वृक्षसंवर्धन मार्गदर्शन, स्थानिक युवकांना वणवा विझवण्याचे प्रशिक्षण देऊन वणवा विरोधी सशस्त्र पथक आदी पर्याया बरोबरच निसर्ग प्रेमी, वन्यजीव प्रेमी, पर्यावरणप्रेमी यांनी पुढे येऊन लोकांच्यामध्ये जनजागृती करणे गरजेचे आहे, तरच वर्तमानातील प्रदूषित वातावरणात सर्वांनाच मोकळा श्वास घेता येईल. जंगलातील होणारी हानी थांबली जाईल वणवा मुक्त गाव संकल्पना शासनामार्फत राबवावी. निसर्ग दूत तयार करून कोकणातील निसर्ग संपन्नतेचा अमोल ठेवा जतन करावा यासाठी वनविभागाने एक पाऊल पुढे टाकावे. सोबत आपत्ती व्यवस्थापन यांनी ही सहकार्य करावे. या संकल्पनासाठी सामाजिक संस्था, सामाजिक कार्यकर्ते, तरुण मित्र मंडळांनी वसुंधरेला वाचविण्यासाठी सहभागी व्हावे अशी मागणी नागरिकांतून केली जात आहे.

> “जंगलातील आग एकाच वेळी वातावरणात कार्बन डाय ऑक्साईड, कार्बन मोनॉक्साईड आणि सूक्ष्म कण पदार्थ मोठ्या प्रमाणात सोडून हवामानावर परिणाम करते. परिणामी वायू प्रदूषणामुळे श्वसन आणि हृदय व रक्तवाहिन्यासंबंधी समस्यांसह अनेक आरोग्य समस्या उद्भवू शकतात. मानसिक आरोग्यावर परिणाम होतो. श्वास रोखल्यामुळे अनेकांचा मृत्यूही संभवतो.”
>
> शेखर कांदळेकर, पर्यावरण प्रेमी

### शेतकऱ्यांचे मोठ्या प्रमाणात नुकसान

सुके गवत बागायतदारांची औषधी झाडे पिके आणि गुरांचा चारा आगीत होरपळून निघत असून शेतकरी हवालदिल झाले आहेत. वणवे विझविण्याचे कष्ट काही मोजकेच जण घेत असल्याचे पहावयास मिळत आहे. परिणामी वणवा ही आजची डोकेदुखी ठरत आहे. यावरती ठोस पाऊल उचलणे गरजेचे असल्याचे निसर्गप्रेमींकडून बोलेले जात आहे.

## सार्वजनिक पाणपोईची मागणी

**रसायनी :** रसायनी पाताळगंगा हा परिसरात होळीनंतर गरमी वाढत असल्याने उष्माघाताने हैराण झालेल्या नागरिकांना आपली तहान शमविण्यासाठी बाटलीतले विकतचे पाणी घेवून प्यावे लागत आहे. परिसरातील काही गावांना पाणीटंचाईची समस्या सतावत आहे. परिसरात जीवनावश्यक पिण्याच्या पाण्याबाबतच्या समस्येचे निराकरणही होत नाही. दरम्यान परिसराचा केंद्रबिंदु व मुख्य बाजारपेठेचे ठिकाण असणाऱ्या मोहोपाडा शहरात खरेदीसाठी आसपासच्या गावातील नागरिक येत असतात. यावेळी बाजारात खरेदी झाल्यानंतर पिण्याचे पाणी शोधण्याकडे त्यांचा कल असतो. अशावेळी तहान भागविण्यासाठी बाटलीतले पाणी विकत घ्यावे लागत असल्याचे नागरिकांचे म्हणणे आहे. तरी मोहोपाडा गावाच्या प्रवेशद्वाराजवळ सार्वजनिक पाणपोईची मागणी नागरिकांतून होत आहे.

## निवडक



### आंचल दलाल यांची श्रीवर्धनला भेट

**श्रीवर्धन :** रायगड जिल्ह्याच्या पोलीस अधीक्षक आंचल दलाल यांनी रविवार (दि.१) मार्च रोजी श्रीवर्धन शहराला भेट दिली. श्रीवर्धन तालुक्यात पर्यटकांकडून झालेले अनेक अपघात व पर्यटकांकडून वारंवार स्थानिकांना होणारा उपद्रव याबाबतीत ही भेट महत्त्वाची मानली जात आहे. आंचल दलाल यांनी रायगडच्या पोलीस अधीक्षक पदाचा पदभार स्वीकारल्यापासून श्रीवर्धनला भेट दिली नव्हती. त्या अनुषंगाने त्यांनी श्रीवर्धन शहराला व तालुक्याला भेट दिली. याप्रसंगी पतंगे रिसॉर्ट श्रीवर्धन येथे सर्व व्यापारी, पर्यटन व्यावसायिकांची बैठक आयोजित करण्यात आली होती. यावेळी व्यापारी व पर्यटन व्यवसायिकांनी आपल्याला येत असलेल्या समस्या पोलीस अधीक्षकांसमोर मांडल्या. यावेळी व्यापारी असोसिएशनचे अध्यक्ष नितीन पतंगे, श्रीवर्धनचे पोलीस निरीक्षक सुरेंद्र गरड उपस्थित होते.

### मोहोर काळा पडल्याने नुकसान

**कोलाड :** हवामानातील अनपेक्षित बदल, ढगाळ वातावरण व दाट धुके या हवामानाच्या सततच्या बदलामुळे आंब्याचे मोहोर गळून पडणे फळधारणा न होणे,आणि महागड्या फवारण्यांचा खर्च करूनही उत्पादनात घट होत असल्यामुळे आंबा बागायतदार आर्थिक संकटात सापडला आहे. जिल्ह्यासह संपूर्ण कोकणात हापूस आंबा हे बागायतदारांच्या उदरनिर्वाहाचे साधन आहे. हापूस आंब्याला साधारण ऑक्टोबर महिन्यात मोहोर येण्यास सुरुवात होते. परंतु यंदा पाऊस लांबणीवर गेल्यामुळे मोहोर प्रक्रिया उशिरा झाली. तरी थंडीच्या अनुकूल वातावरणामुळे आंब्याला मोहोर चांगल्या प्रकारे बहरला यामुळे शेतकरी आनंदित होते कारण यामुळे हापूस आंब्याचे पिक चांगल्या प्रकारे येईल व उत्पन्न चांगले मिळेल. परंतु हा आनंद फार काळ टिकून राहिला नाही. कारण जानेवारी ते फेब्रुवारी महिन्यात हवामानाच्या अनपेक्षित बदल, दाट धुके, व ढगाळ वातावरणात यामुळे उत्तम प्रकारे आलेला मोहोर काळा पडून जळून गेला या बदलत्या वातावरणामुळे तुडतुडे व बुरशीजन्य रोगांचा प्रादुर्भाव वाढला असुन मोहोर व लहान फळे गळून पडत आहेत. मोहोर टिकवण्यासाठी शेतकऱ्यांना ५ ते ६ वेळा महागड्या औषधांची फवारणी करावी लागत असुन यामुळे उत्पादन खर्च भरमसाठ वाढला अनेक ठिकाणी मोहोर येऊनही फळधारणा प्रक्रिया पूर्णपणे ठप्प झाली असुन उत्पादनात मोठी घट निर्माण होऊन १० टक्के ही उत्पादन मिळणार नसल्याने आंबा बागायतदार पूर्णपणे हवालदिल झाला असुन आर्थिक संकटात सापडला आहे.





### कोकण ज्ञानपीठ महाविद्यालयाचा सन्मान

**उरण :** महाराष्ट्र राज्य उच्च व तंत्र शिक्षण विभाग माहिती तंत्रज्ञान केंद्र आणि कोकण ज्ञानपीठ उरण वाणिज्य व कला महाविद्यालय उरण, जिल्हा रायगड, यांच्या संयुक्त विद्यमाने विविध उपक्रम आयोजित करण्यात आले होते. या कार्यक्रमांमध्ये महाविद्यालयाने उत्तुंग यश मिळवले आहे. त्यामुळे महाविद्यालयाला विविध पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आलेले आहे. यशवंतराव चव्हाण सभागृह मुंबई येथे मंत्री उदय सावंत, रवींद्र साठे यांच्या उपस्थितीत पुरस्कार वितरण करण्यात आले. सदर कार्यक्रमातस महाविद्यालयास उत्कृष्ट जिल्हास्तरीय महाविद्यालय द्वितीय क्रमांक, उत्कृष्ट करिअर संसद जिल्हास्तरीय तृतीय क्रमांक देऊन सन्मानित करण्यात आले. करियर कट्टा अंतर्गत ए.डब्ल्यू. एस. करिअर टूर या विशेष प्रशिक्षण कार्यक्रमात महाविद्यालयास द्वितीय पारितोषिक देऊन सन्मानित करण्यात आले. डॉ. ए. आर. चव्हाण, व्ही. एस. इंदुलकर, डॉ. डी. पी. हिंगमिरे, डॉ. पी आर कारुळकर, डॉ. प्रा. आनंद गायकवाड, श्याम धारासुरकर या सर्वांचे मोलाचे सहकार्य लाभले.

### एनएमएमएम परीक्षेत मुलींची बाजी

**चिरनेर :** केंद्र शासनाच्या विद्यालयातील आर्थिक दुर्बल घटकामध्ये मोडणाऱ्या शालेय विद्यार्थ्यांसाठी एन.एम.एम.एस परीक्षांचे नियोजन केले जाते. उरण पूर्व विभागातील कर्मवीर भाऊराव पाटील माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयातील १० विद्यार्थी उत्तीर्ण झाले. यात १० पैकी ९ मुलींनी बाजी मारली तर मुलांपैकी एकच विध्यार्थी उत्तीर्ण झाल्याने विद्यालयात मुलींनीच बाजी मारली.विद्यालयाच्या प्राचार्या ए. ए. पाटील, एम.एस.पाटील, प्रा. डाढाळे बी. बी., एस. सी. पाटील, एस.आर.म्हात्रे, डी.आर.पाटील, सी. ए. घरत, वर्षा पाटील, कल्याणकर एन.बी, पाटील पी.एम या सर्व शिक्षकांचे मार्गदर्शन लाभले.

# रोटरी क्लबतर्फे शाळेसाठी सोलर पॅनल

। नेरळ । प्रतिनिधी ।

कर्जत तालुक्यातील शैक्षणिक क्षेत्रात कार्य करणाऱ्या रोटरी क्लब देवनार यांच्याकडून मानिवली येथील जिल्हा परिषद शाळेसाठी सोलर पॅनल देण्यात आले.त्या सोलर पॅनेलमुळे ही शाळा विजेचे दृष्टीने स्वयंपूर्ण झाली आहे. रोटरी क्लब देवनार आणि रोटरी ग्रामीण मंडळ यांच्याकडून कर्जत तालुक्यात शैक्षणिक क्षेत्रात कार्य केले जाते. त्यात प्राथमिक आणि माध्यमिक शाळांसाठी सार्वजनिक स्वच्छता गृह,विद्यार्थिनी यांच्यासाठी सायकली तसेच आरोग्य शिबीरे आयोजित करून सामाजिक कार्य केले जात आहे.



हुतात्मा हिराजी पाटील यांचे जन्मगाव असलेल्या मानीवली येथील शाळेसाठी सोलर पॅनल देण्यात यावी अशी मागणी शाळा व्यवस्थापन समिती अध्यक्ष जितेंद्र गवळी यांनी कर्जत तालुका रोटरी ग्रामीण मंडळ समन्वयक अर्जुन तरे यांच्याकडे केली. त्यानंतर तरे यांनी ही मागणी देवनार रोटरीकडे केल्यानंतर मानिवली शाळेसाठी सोलर पॅनल भेट देण्यात आले. या सोलर पॅनलमुळे डिजिटल शाळेचे वीज पुरवठा बंद झाल्यानंतर थांबणारे व्यवहार पूर्ववत सुरू राहणार आहेत.

सोलर पॅनलचे लोकार्पण देवनार रोटरी क्लब अध्यक्षा अलका मुरली यांचे हस्ते झाले. यावेळी देवनार रोटरीचे कन्नन, अर्जुन तरे, अरविंद पाटील, प्रवीण डायरे, जितेंद्र गवळी, लहुदास डायरे, मुख्याध्यापक राठोड, भरत खडेकर, दिनेश धुळे, सुदाम मसणे, विजय बदे, संतोष बदे, सीताराम बदे, पांडुरंग म्हसे आदी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## चेन स्नॅचिंग करणाऱ्याचा धुमाकूळ

**पनवेल :** चेन स्नॅचिंग करणाऱ्या मोटारसायकलस्वार लुटारुंनी पनवेल आणि कामोठे परिसरात धुमाकूळ घातला आहे. लुटारुंनी तीन महिलांच्या अंगावरील तब्बल ११ लाख २० हजार रुपयांहून अधिक किमतीचे सोन्याचे दागिने व मंगळसूत्रे हिसकावून नेल्याच्या घटना घडल्या आहेत. छाया महाडकर सदाबहार नर्सरीजवळ फेरफटका मारत असताना मोटारसायकलवरून आलेल्या दोघा लुटारुंनी त्यांना पत्ता विचारण्याचा बहाणा केला. लुटारुंनी छायाच्या गळ्यातील २० ग्रॅम वजनाचे, १ लाख २० हजार रुपये किमतीचे सोन्याचे मंगळसूत्र खेचून पलायन केले.



# पक्षी विज्ञान विषयावर जनजागृती

। उरण । प्रतिनिधी ।

राष्ट्रीय विज्ञान दिवसानिमित्ताने मॉडर्न स्कूल आणि ज्यु.कॉलेज, वाशी येथे पक्षी विज्ञान आणि चिमणी संवर्धन कृती या विषयावर फ्रेंड्स ऑफ नेचर (फॉन) सर्पमित्र निसर्गसंवर्धन संस्था चिरनेर उरण रायगड महाराष्ट्रतर्फे संस्थेचे सदस्य निकेतन रमेश ठाकूर यांनी व्याख्यान आयोजित करण्यात आले होते.

चिमणी संवर्धन कृती म्हणून टाकाऊ वस्तूंच्या पासून चिमण्यांची घरटी बनविण्याचा उपक्रम घेण्यात आला. टाकाऊ रोल्स, पुठ्ठे यांचा वापर करून ७५ घरटी उपक्रमातून विद्यार्थ्यांकडून बनविण्यात आली होती. ती विद्यार्थ्यांना भेट म्हणून देण्यात आली. या कार्यक्रमासाठी सुमित्रा भोसले, तुषार म्हात्रे, विलास कुडावकर, रिया ठाकूर व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्याचे सहकार्य लाभले.

# वरसई कातकरवाडी शिक्षण परिषद उत्साहात

। खरोशी । प्रतिनिधी ।

पेण तालुक्यातील वरसई केंद्रातील शाळांची शिक्षण परिषद रायगड जिल्हा परिषद प्राथमिक शाळा वरसई कातकरवाडी येथे नुकतीच उत्साहात पार पडली. वरसई केंद्राचे केंद्रप्रमुख दत्तात्रय कोठेकर यांनी प्रास्ताविक करून परिषदेच्या उद्देशांविषयी मार्गदर्शन केले. या परिषदेमध्ये शैक्षणिक गुणवत्ता वाढ, निपुण महाराष्ट्र अभियान, शिष्यवृत्ती परीक्षा तयारी, तसेच मुख्यमंत्री माझी शाळा सुंदर शाळा या महत्त्वाच्या विषयांवर सखोल चर्चा करण्यात आली. विविध उपक्रमांची प्रभावी अंमलबजावणी, विद्यार्थ्यांचा शैक्षणिक स्तर उंचावण्यासाठी उपाययोजना आणि नवोपक्रमांची देवाणघेवाण यावर मार्गदर्शन झाले. यावेळी जयश्री पाटील यांची कन्या दिक्षिता हिने एम.बी.बी.एस. शिक्षण पूर्ण केल्याबद्दल तिचा केंद्राच्या



वतीने सत्कार करण्यात आला. या परिषदेस वरसई केंद्राच्या माजी केंद्रप्रमुख श्वेता म्हात्रे, महाराष्ट्र प्राथमिक शिक्षक परिषदेचे तालुका अध्यक्ष महेंद्र गायकवाड, काशिनाथ वाघमारे, प्राचार्या पाटील, नितीन पाटील, कृष्णा सावंत, भारती वाघमारे व इतर सदस्य मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रिया झेले यांनी प्रभावीपणे केले.

# जागतिक चिमणी दिनानिमित्त भित्तीचित्र

। पनवेल । प्रतिनिधी ।

२० मार्च रोजी होणाऱ्या जागतिक चिमणी दिनाच्या पार्श्वभूमीवर सायन-पनवेल महामार्गावरील कलंबोली पुलावर आकर्षक भित्तीचित्र साकारण्यात आले आहे. चिमणी-चिमण्यांचे पाण्यात खेळणारे सुंदर चित्र नागरिकांचे लक्ष वेधून घेत आहे. पर्यावरणातील बदल, वाढते शहरीकरण, मोबाईल टॉवरचे प्रमाण आणि झपाट्याने कमी होत चाललेली झाडे यामुळे चिमण्यांची संख्या दिवसेंदिवस घटत आहे. एकेकाळी प्रत्येक घरट्यात, अंगणात दिसणारी चिमणी आता



दुर्मिळ होत चालली आहे. या पार्श्वभूमीवर कलंबोली पुलावरील भित्तीचित्रातून पक्षी संवर्धनाचा आणि पर्यावरण संरक्षणाचा प्रभावी संदेश देण्यात आला आहे. वाहनचालक आणि पादचारी या चित्राकडे पाहून थोडा वेळ थांबत असून अनेकजण छायाचित्रेही घेत आहेत. चिमण्यांसाठी घरटी लावणे, पाण्याची भांडी ठेवणे आणि झाडे लावणे यासारख्या छोट्या उपक्रमातून त्यांचे अस्तित्व जपण्याचे आवाहन पर्यावरणप्रेमींनी केले आहे.

## गरजू महिलांना शिलाई मशीनचे वाटप

। नवीन पनवेल । प्रतिनिधी ।

पनवेल-नवी मुंबई पत्रकार संघाच्या वतीने पनवेल येथे २१ गरीब आणि गरजू महिलाना शिलाई मशीनचे वाटप करण्यात आले. यावेळी सुप्रसिद्ध डॉ. गिरीश गुणे, पंडित मोहन जोशी, भावना ग्रुपच्या अपर्णा शहा, सामाजिक कार्यकर्ते योगेश तांबोळी, हर्षला तांबोळी, डॉ. लक्ष्मीकांत निकम, शाहिद भाई यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते. यावेळी दिपक कांबळे, लालचंद यादव, मिलिंद खारपाटील, रमेश भोळे, अशोक गोरडे, दीपक जगे, समीर वेश्वीकर, पंकज तांबडे आदी उपस्थित होते.



मुरूडला होळीसाठी आलेल्या पर्यटकांमध्ये लहानमुले किनाऱ्यावर किल्ला बनवताना. (छायाचित्र : सुधीर नाझरे)

## विवाहित महिला बेपत्ता

**पनवेल :** पाणी भरण्यासाठी घरातुन एक विवाहित महिला गेली असता ती परत आली नाही म्हणुन त्यांनी तिचा सर्वत्र शोध घेतला परतु ती मिळुन न आल्याने ती बेपत्ता झाल्याची तक्रार पनवेल तालुका पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे. जयश्री जगदिश कातकरी असे या महिलेचे नाव असून वय ३० वर्षे, अंगाने सडपातळ, केस काळे, नाक बसलेले उंची ५ फुट ६ इंच रंग सावळा, डोळे काळे तिच्या डाव्या हाताच्या मनगटावर इंग्रजीमध्ये जयश्री जगदिश असे गोंदलेले आहे. सदर महिलेबाबत कोणास अधिक माहिती असल्यास त्यांनी पनवेल तालुका पोलीस ठाणे किंवा पोलीस नाईक प्रदीप पोपेटे यांच्याशी संपर्क साधावा.

## क्लासिफाईड
जाहिरात छोटी, उपयुक्तता मोठी

- **सहारा ट्रॅव्हल्स अलिबागमध्ये स्थानिक ड्रायव्हर पाहिजे.** वय २५ ते ४५ ९२७०५६०४५६
- **सुवर्णसंधी** (WORK FROM HOME) **वाढत्या महागाईमध्ये एक्स्ट्रा** इन्कम कसे घेऊ शकतो? घरबसल्या कामाची सुवर्णसंधी नोकरदार, गृहिणी, विद्यार्थी इतर सर्वांसाठी घरातून मोबाईलवरून किंवा ऑफिसमधून काम करा. Income- 12000 To 15000 Age 18+ Contact Number- 8421396233
- **जाहिरात : 'विहीर' आपल्या शेती, वाडी, बंगला सोसायटीत पाण्याच्या** सोयीसाठी RCC रिंगाची विहीर बनवून घेण्यासाठी संपर्क करा. रणजित पाटील. फोन : ९८३४३०३९४१, ९८८१६३७०४७ अलिबाग
- **नागावमधील हॉटेलमध्ये काम करण्यासाठी स्टाफची** आवश्यकता आहे. रिसेप्शनिस्ट, किचन हेल्पर लेडीज, कॉन्टिनेंटल कुक, ब्रेकफास्ट कुक,मेन्टेनन्स पर्सन, वेटर,हाऊसकीपर, हाऊसकिपिंग सुपरवायझर,रिसॉर्ट मॅनेजर (क्वालिटी कंट्रोल), इच्छुक उमेदवारांनी सकाळी १० ते ५ या वेळेत संपर्क साधावा अथवा व्हॉटसअॅप वर मेसेज करावा. मोबाईल - ७५५९१८४६१२
- **ब्लॉक विकणे आहे.** चेंढरे ग्रामपंचायत हद्दीतील ६६० स्क्वे फूट संपर्क : ९०२८५६५९१७, ९८२२०३१०१७

जाहिरातीसाठी संपर्क : (०२१४१) २२२२९०/ २२२७६१

सीईआयआरच्या मदतीने माणगाव पोलिसांची कारवाई | सायबर गुन्ह्याबाबत जागरूक राहण्याचे आवाहन

# हरवलेले मोबाईल मुळमालकांस सुपूर्द

। माणगाव । प्रतिनिधी ।

माणगाव पोलीस ठाण्याने तंत्रज्ञानाच्या साहाय्याने हरवलेले व गहाळ झालेले एकूण पाच मोबाईल फोन हस्तगत करून संबंधित तक्रारदारांना परत दिले आहेत. अंदाजे एक लाख रुपयांच्या किमतीचे मोबाईल 'सीईआयआर' पोर्टलच्या माध्यमातून शोधण्यात पोलिसांना यश आले. अलीकडील काळात मोबाईल हरवणे, चोरी जाणे किंवा गहाळ होण्याच्या घटनांमध्ये वाढ होत असल्याचे दिसून येत आहे. अशा घटनांमध्ये अनेक नागरिक आर्थिक नुकसानासोबतच वैयक्तिक



माहितीच्या गैरवापराच्या भीतीनेही त्रस्त होतात. याच पार्श्वभूमीवर माणगाव पोलीस ठाण्याने हरवलेल्या मोबाईल संदर्भातील तक्रारींची दखल घेत तांत्रिक पद्धतीने शोधमोहीम राबवली होती.

सीईआयआर पोर्टलच्या सहाय्याने संबंधित मोबाईलचे आयएमईआय क्रमांक ट्रॅक करून त्यांचा मागोवा घेण्यात आला. सखोल तपासानंतर पाचही मोबाईल हस्तगत करण्यात आले. सोमवारी (दि.२) मार्च रोजी माणगाव पोलीस ठाण्यात तक्रारदारांना बोलावून कायदेशीर प्रक्रिया पूर्ण करून मोबाईल त्यांच्या ताब्यात देण्यात आले. आपले हरवलेले मोबाईल परत मिळाल्याने तक्रारदारांच्या चेहऱ्यावर आनंद वाहू लागला. त्यामुळे या तक्रारदारांनी समाधान व्यक्त करत माणगाव पोलिसांचे आभार मानले.

माणगाव पोलीस ठाण्यामार्फत नागरिकांना सायबर गुन्हे आणि सायबर सुरक्षेबाबत जागरूक राहण्याचे आवाहन करण्यात आले. मोबाईल हरवल्यास तात्काळ पोलीस ठाण्यात तक्रार नोंदवावी तसेच सीईआयआर पोर्टलवर नोंदणी करून संबंधित मोबाईल ब्लॉक करण्याची प्रक्रिया पूर्ण करावी, असेही आवर्जून सांगण्यात आले. माणगाव पोलीस ठाण्याच्या या कारवाईमुळे नागरिकांमध्ये अधिकच विश्वास निर्माण झाला याचा प्रत्यय पुन्हा एकदा आला आहे.

### पोलिसांकडून आवाहन

अनोळखी लिंकवर क्लिक करू नये, संशयास्पद कॉल्स किंवा मेसेजेसला प्रतिसाद देऊ नये, ओटीपी अथवा वैयक्तिक माहिती कोणालाही देऊ नये, अशा सूचना नागरिकांना देण्यात आल्या. सायबर गुन्ह्यांपासून बचावासाठी सजगता आणि तत्परता अत्यावश्यक असल्याचेही पोलिसांनी यावेळी स्पष्ट केले.

# लावण्याला चित्रकला स्पर्धेत यश



। खांब । प्रतिनिधी ।
रोहा तालुक्यातील एम. बी. पाटील स्कूल वरसे येथील लावण्या मरवडे हिने महाराष्ट्र राज्य बाल चित्रकला स्पर्धेत प्रथम येण्याचा बहुमान पटकावला आहे.

महाराष्ट्र राज्य बाल चित्रकला स्पर्धा २०२५ या स्पर्धेत तिसऱ्या गटात सहभागी होऊन प्रथम येण्याचा बहुमान पटकावला आहे. तिच्या या यशाबद्दल राज्यस्तरावर आयोजित करण्यात आलेल्या कार्यक्रमात तिला उच्च व तंत्रशिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील, इंद्रनील नाईक यांच्यासह अन्य मान्यवरांच्या हस्ते तिला सन्मानित करण्यात आले आहे. कला शिक्षक कमलेश महाजन यांचे वेळोवेळी मोलाचे मार्गदर्शन लाभलेले होते. संस्थेचे चेअरमन मधुकर पाटील व सर्व संचालक मंडळ तसेच मुख्याध्यापिका पुनम देसाई यांच्यासह स्कूलमधील सर्व शिक्षक तथा शिक्षकेतर कर्मचारी वर्गांनी तसेच समाजातील विविध क्षेत्रातील मान्यवर मंडळांनी अभिनंदन करून शुभेच्छा दिल्या आहेत.

## जाहीर नोटीस

मे. तालुका कार्यकारी दंडाधिकारी सो., माणगाव यांचे न्यायालयात
ज.नों. प्रस्ताव क्र. १३/२०२६

१. राजाराम शांताराम ढाकवळ,
रा. नाईटणे, ता. माणगाव, जि. रायगड — अर्जदार
विरुद्ध
१. निबंधक, जन्म मृत्यू नोंदणी अधिकारी
गोरेगाव, ग्रामपंचायत मोर्बा,
ता. माणगाव, जि. रायगड
२. गटविकास अधिकारी, पंचायत समिती, माणगाव — सामनेवाले
जि. रायगड

तमाम लोकांस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की,

उपरोक्त संदर्भिय विषयान्वये कळविण्यात येते की, निबंधक जन्म-मृत्यू-विवाह नोंदणी अधिकारी, ग्रुप ग्रामपंचायत मोर्बा, ता. माणगाव यांचेकडील जन्म मृत्यू अधिनियम, १९६९ चे कलम १३ (३) व सुधारित अधिनियम, २०२३ अन्वये या कार्यालयाकडे विलंबाने जन्म नोंद होणेकामी प्रस्ताव दाखल झाला आहे. त्यान्वये त्यांनी राजाराम शांताराम ढाकवळ, रा. नाईटणे, ता. माणगाव, जि. रायगड यांचा जन्म दि. ०७/०९/१९७८ रोजी मौजे नाईटणे, ता. माणगाव, जि. रायगड येथे झाला असल्याचे नमूद केले आहे.

राजाराम शांताराम ढाकवळ, रा. नाईटणे, ता. माणगाव, जि. रायगड यांचा जन्म दि. ०७/०९/१९७८ रोजी मौजे नाईटणे, ता. माणगाव, जि. रायगड येथे झाला असून त्यांना जन्म प्रमाणपत्र आवश्यक होते. परंतु सदर नोंद ग्रुप ग्रामपंचायत मोर्बा, ता. माणगाव, जि. रायगड यांचे अभिलेखामध्ये आढळून आलेली नाही. त्यामुळे निबंधक जन्म- मृत्यू-विवाह नोंदणी अधिकारी, ग्रुप ग्रामपंचायत मोर्बा, ता. माणगाव यांनी त्यांच्या जन्माची विलंबाने नोंद होणेकामी आदेश मिळणेबाबत प्रस्ताव दाखल केला आहे.

तसेच राजाराम शांताराम ढाकवळ, रा. नाईटणे, ता. माणगाव, जि. रायगड यांच्या जन्माची विलंबाने नोंद होणेकामी निबंधक जन्म-मृत्यू नोंदणी, ग्रामपंचायत गोरेगाव यांचेकडील प्रस्तावही या कार्यालयास प्राप्त झाला आहे. तरी सदर दाखला देणेस कोणाची कोणत्याही प्रकारची हरकत आहे किंवा कसे? हे तपासण्याकरिता सदरची जाहीर नोटीस अर्जदार यांचेमार्फत दिली आहे. तरी सदर अर्जास कोणाचीही कोणत्याही प्रकारची हरकत असल्यास त्याकरिता पंधरा दिवसांचे मुदतीपर्यंत कागदोपत्री पुराव्यासह मे. न्यायालयात हजर रहावे व आपली हरकत कळवावी.

विहित मुदतीत कोणाचीही हरकत न आल्यास राजाराम शांताराम ढाकवळ, रा. नाईटणे, ता. माणगाव, जि. रायगड यांचा जन्म दि. ०७/०९/१९७८ रोजी मौजे नाईटणे, ता. माणगाव, जि. रायगड येथे झाला असे गृहीत धरून त्यांच्या जन्माची नोंद होणेबाबत आदेश देण्यात येईल.

ठिकाण : माणगाव — सही/-
दिनांक : ०४/०३/२०२६ — **(विपीन लोकरे)**
कार्यकारी दंडाधिकारी,
माणगाव, जि. रायगड

## जाहीर नोटीस

सर्व नागरीकांना या जाहीर नोटीसीद्वारे सुचित करण्यात येते की, आमचे आशिलांनी खालील वर्णन केलेली जमीन मिळकतीचे मालक श्री. मोहन आत्माराम पाटील यांज कडून प्लॉटिंग स्वरुपात खरेदीने घेण्याचे ठरविले आहे. व त्याप्रमाणे मिळकतीचे मालक यांचे सोबत समजुतीचा करारनामा लिहून ठेवला आहे.

मौजे बेलकडे तलाठी सजा बेलकडे, तालुका अलिबाग जि. रायगड यांचे हद्दीतील खालील प्रमाणे वर्णनाची मिळकत जिचे वर्णन खालील प्रमाणे.

**मिळकतीचे वर्णन**

| गावाचे नाव | भूमापन क्र. व उपविभाग | हिस्सा नंबर | क्षेत्र (हे.आर.) | आकार (रु.पै.) |
|---|---|---|---|---|
| मौजे बेलकडे तलाठी सजा बेलकडे, ता.अलिबाग जि.रायगड | ४२० | .... | २.०५.९० पो.ख ०.१४.२० एकुण २.२०.१० | २९.१९ |

वर नमूद मिळकती पैकी क्षेत्र १-२४-१७ हे. आर, पो.ख. ०-१४-२० हे. आर, एकुण क्षेत्र १-३८-३७ हे.आर आकार रु.पै. १७-६० श्री मोहन आत्माराम पाटील यांच्या मालकीची व ताबे, कब्जा, वहिवाटीतील क्षेत्र.

तरी वर वर्णन केलेल्या मिळकतीबाबत इतर दुसरे कोणाचा साठेकरार, खरेदीखत, ताबा, कब्जा, वहिवाट, गहाण, दान, बक्षिसपत्र, लिज, वगैरे अथवा अन्य इतर कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध असल्यास ही जाहीर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून चौदा दिवसांचे आत खालील सही करणार वकील यांजकडे प्रथम दर्शनी कागदोपत्री पुराव्यासह लेखी हरकत कळवावी. मुदतीत कोणाचीही हरकत न आल्यास सदर मिळकत हि निर्वेध व बोजारहित आहे असे गृहीत धरून आमचे अशिल खरेदीखताचा व्यवहार पूर्ण करतील. मागाहून येणारी हरकत आमचे अशिलावर बंधनकारक राहणार नाही याची सर्वांनी नोंद घ्यावी.

अलिबाग. — अशिलांतर्फे
दिनांक : ०५/०३/२०२६ — **ॲड. जी. जी. गोंधळी**
गोंधळी निवास, बाजारपेठ
ता. अलिबाग जि. रायगड.

## पनवेल महानगरपालिका

ता. पनवेल, जि. रायगड, पिन नं. ४१० २०६
कार्यालय : २७४५८०४०/४१/४२ फॅक्स नं.: ०२२-२७४५२२३३
Email: panvelcorporation.maharashtra.gov.in
कार्यालय जा.क्र.पमपा/मालमत्ता कर/२५५८/२०२६ — दिनांक : ०४/०३/२०२६

**जाहीर सूचना**

पनवेल महानगरपालिका हद्दीतील सर्व मालमत्ता धारकांना जाहिर सूचना देण्यात येते की, महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमांर्गत सर्व मालमत्तांना मालमत्ता कराची आकारणी करण्यात आलेली आहे.

सन २०२५-२०२६ या आर्थिक वर्षासाठी महानगरपालिका क्षेत्रासाठी सर्व मालमत्ता धारकांस महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम प्रकरण ८ कराधान नियम ५५ अन्वये प्रत्यक्ष व ऑनलाईन पद्धतीने मालमत्ता कराची देयके बजावणेत आलेली आहेत.

तथापि, ज्या मालमत्ता धारकांना अद्यापपर्यंत मालमत्ता कराची देयके प्राप्त झालेली नाहीत, त्या मालमत्ता धारकांनी panvelmc.org किंवा KARMITRA PMC-APP वर नोंदणी करुन ऑनलाईन पद्धतीने मालमत्ता कराची देयके प्राप्त करुन घ्यावीत. तसेच, ज्या मालमत्ता धारकांना ऑनलाईन पद्धतीचा वापर करुन मालमत्ता कराची देयके प्राप्त करुन घेणे शक्य नाही अशा मालमत्ता धारकांनी मुख्यालयात किंवा संबंधित प्रभाग कार्यालयामधून देयके उपलब्ध करुन घ्यावीत.

पनवेल महानगरपालिकेच्या विकास कामासाठी व नागरी सुविधा सुरळीत पुरविणेकामी कर वसुली अत्यंत आवश्यक आहे. ज्या मालमत्ता कर धारकांचा सन २०२५-२६ पर्यंतचा मालमत्ता कर थकीत आहे त्यांनी तात्काळ संबधित रक्कम महानगरपालिकेच्या कर संकलन केंद्रात किंवा ऑनलाईन पद्धतीने भरावी. मालमत्ता कराचा ऑनलाईन पद्धतीने भरणा केल्यास अतिरिक्त २% सुट देण्यात येते.

सर्व थकबाकीदारांना याद्वारे आवाहन करण्यात येते की, मालमत्ता कराच्या थकीत रकमेचा संपूर्ण भरणा दिनांक १०/०३/२०२६ अखेर करावा, असे न केल्यास थकबाकीदारांची नावे स्थानिक वृत्तपत्रांत जाहिररित्या प्रसिद्ध करण्यात येईल व यामुळे होणाऱ्या बदनामीस महानगरपालिका जबाबदार राहणार नाही. नागरिकांच्या सुविधेसाठी मालमत्ता कराचा भरणा करणेकामी माहे मार्च २०२६ मधील सर्व शनिवार, रविवार व सार्वजनिक सुट्टीच्या दिवशी कार्यालय पूर्णवेळ सुरू असेल.

तसेच याउपरही थकीत रकमेचा भरणा न केल्यास महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम १२८,१२९ कराधान नियम प्रकरण ८ मधील नियम ३०, ४१, ४२, ४३, ५२,५४ अन्वये दंड, जप्ती, अटकावणी व इतर अनुषंगिक कायदेशीर कारवाई प्रस्तावित करण्यात येईल याची नोंद घ्यावी. त्यामुळे मालमत्ता धारकांनी थकीत मालमत्ता कर तात्काळ भरून पनवेल महानगरपालिकेच्या विकास कामांस हातभार लावावा ही नम्र विनंती.

सही/-
**उपायुक्त (कर)**
**पनवेल महानगरपालिका**

## कोकण रेल्वे कॉर्पोरेशन लिमिटेड
(भारत सरकारचा उपक्रम)
सादर सेवा

**निविदा अधिसूचना**

उप मुख्य अभियंता (कार्य), कोकण रेल्वे कॉर्पोरेशन लिमिटेड, रत्नागिरी, पात्र कंत्राटदारांकडून खालील कामासाठी आयआरईपीएस पोर्टलवर ई-निविदा प्रणालीद्वारे एकल लिफाफा बोली पद्धतीने खुल्या निविदा मागवित आहे: **कामाचे नाव:** महाराष्ट्र राज्यातील कोकण रेल्वेच्या रत्नागिरी विभागातील लोटे एमआयडीसी येथील रोलिंग स्टॉक कॉम्पोनंट फॅक्टरी येथे विंडो ग्रिल्स, ग्रेटिंग, फेन्सिंग, रूफ कव्हर व इतर विविध कामांची तरतूद करणे. **निविदा सूचना क्र.: केआर-आरएन-डिव्हायसीईडब्ल्यू-आरएससीएफ-50-2025 दिनांक: 20/02/2026, एकूण अंदाजित खर्च:** ₹ 1,18,51,386.41/- (जीएसटी वगळून) **निविदा सुरू होण्याची तारीख:** 07/03/2026, **निविदा बंद होण्याची तारीख व वेळ:** 22/03/2026 रोजी दुपारी 15:00 वाजेपर्यंत ऑनलाईन बोली/ऑफर सादर करता येतील. **काम पूर्ण करण्याची मुदत:** 7 महिने. हस्तलिखित प्रस्ताव स्वीकारले जाणार नाहीत. तपशील व सहभागासाठी कृपया https://www.ireps.gov.in या संकेतस्थळास भेट द्या. सर्व सुधारणा/परिशिष्टे याच संकेतस्थळावर प्रसिद्ध केली जातील.

## जाहीर नोटीस

या जाहीर नोटीसीने तमाम जनतेस कळविण्यात येते की, आमचे अशिलांनी मौजे पाझर ता. अलिबाग जि. रायगड येथील खालील वर्णनाची मिळकत त्यांच्या विद्यमान मालकांकडून सर्व हक्कांसहीत कायम खरेदीखताने विकत घेण्याचे ठरविले आहे व सदर मिळकत निर्वेध असल्याची खात्री मालकांनी दिलेली आहे.

**मिळकतींचे वर्णन**

| गट क्र. | क्षेत्र (हे.आर) | आकार (रू.पै.) | विद्यमान मालकाचे नाव |
|---|---|---|---|
| ११० | ०-८६-४० + पो.ख. ०-०२-६० एकुण क्षेत्र ०-८९-०० | ४.२५ | श्री.वामन काशिनाथ पाटील सौ.शोभा वसंत घरत, सौ.अनिता अनंत घरत, |

वरील मिळकती पैकी ०-५९-०० हे.आर. ही मिळकत सदरच्या जाहीर नोटीसीचा विषय आहे.

वरील मिळकतीत कोणाचाही कसलाही हक्क अधिकार अगर खरेदी, साठेकरार, दान, पोटगी, वाटप, मृत्युपत्र, कुळहक्क, दावा, वहिवाट, अगर इतर कोणताही बोजा अगर हक्क असल्यास त्यानेही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ७ दिवसांच्या आत खाली सही करणार यांचेकडे कागदपत्रांसह लेखी हरकत नोंदवावी.

वरील मुदतीत कोणाचीही तक्रार, हरकत न आल्यास सदरची मिळकत निर्वेध मालकीची व बोजारहीत आहे असे समजून खरेदीचा व्यवहार पुर्ण केला जाईल व नंतर येणाऱ्या हरकती आमच्यावर बंधनकारक राहाणार नाहीत ही नोंद घ्यावी.

अलिबाग
दिनांक ०४/०३/२०२६ — **ॲड. महेश एस म्हात्रे**
ऑफीस नं.१, शिवराम भास्कर बिल्डींग,
बाजारपेठ रोड, केळकर नाका, अलिबाग
मो.नं.- ९२२६८४७०७७

## जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, खाली नमुद केलेल्या शेत जमीन मिळकती या खाली लिहिलेल्या जमीन मालक यांचे नावावर ७/१२ उताऱ्या सदरी महसूल दप्तरी नांवे असून ती त्यांचे खुद्द ताबा, कबजा, मालकी, वहीवाटीतील आहे त्या शेत जमीन मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणे-

**मौजे खवली, ता. सुधागड जि. रायगड येथील खालील वर्णनाची मिळकत**

| मालकाचे नाव | गट/भूमापन क्रं | एकूण क्षेत्र हे. आर | आकार रू.पै. | भोगवटा वर्ग |
|---|---|---|---|---|
| प्रकाश महादू कासार | १२५ | ०.५७.७० | ५.३८ | १ |
| प्रकाश महादू कासार | १२३ | ०.३७ | ७.९९ | १ |

वरील मिळकतीसंबंधात आमचे अशिल यांनी जमीन मालक यांचेशी खरेदी व्यवहार ठरविला आहे, यास्तव वरील मिळकतींवर अन्य कोणाचा दान गहाण, बक्षीस, फरोक्त, साठेकरार, अखत्यार, लिएन चार्ज, ॲटॅचमेंट, अन्न, वस्त्र निवारा, कुळवहिवाट ताबा, कबजा, वहिवाट, वचनचिठ्ठी, दावा, दरखास्त, जप्ती मॉर्टगेज, संपादन, रिझर्व्हेशन रेक्वीझेशन अगर अन्य प्रकारचा बोजा, हक्क, हितसंबंध तसेच एकत्र कुटूंब मिळकत असल्याने ही जाहीर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून (१५) पंधरा दिवसाचे आत खालील सही करणार ॲडव्होकेट यांजकडे प्रत्यक्ष भेटून मुदतीमध्ये हरकत प्रथमदर्शनी पुराव्यासह दाखल कराव्यात, तशा प्रकारच्या हरकती मुदतीत दाखल न केल्या गेल्यास सदरच्या वरील मिळकती पूर्णपणे निर्वेध असल्याचे गृहीत धरून आमचे अशिल वरील जमीन मालकांशी खरेदीखताचा व्यवहार पूर्ण करतील व मागाहून येणाऱ्या हरकती आमचे अशिलावर बंधनकारक राहणार नाहीत याची नोंद घ्यावी.
हे कळावे,

दिनांक : ०५/०३/२०२६ — **ॲड. सागर हिराकांत भगत**
ॲडव्होकेट
मु.उन्हेरे कुमारशेत पो. पाली,
ता. सुधागड, जि.रायगड
मोबा.नं. ८९८३४५६८४७

## जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येत आहे की, आमचे अशिलांनी खालील वर्णन केलेली जमिन मिळकत त्यांच्या मालकांकडून कायमची खरेदी करण्याचे ठरविलेले आहे.

**मौजे-हुमगाव, तालुका-कर्जत, जि.रायगड येथील जमिन मिळकत**

| मालकाचे नाव | सर्वे नं. | हिस्सा नं. | क्षेत्र हे.आर.पॉ. | आकार रू.पै. |
|---|---|---|---|---|
| श्री. पंढरीनाथ हिरू सोनावळे | ४ | ४ | ०-४४-०० पो.ख ०-१२-०० एकूण ०-५६-०० या मिळकती पैकी खरेदी देणार यांचे मालकीचे ०-२९-०० गुंठे क्षेत्र मिळकत | ०-४५ |

वर वर्णन केलेली जमिन मिळकतीच्या कोणत्याही व्यक्तींचा अगर संस्थांचा कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध असल्यास आणि किंवा कोणत्याही व्यक्तींची अगर संस्थांची आमच्या अशिलांच्या वर वर्णन केलेल्या जमिन मिळकतीच्या खरेदीच्या व्यवहारास हरकत असल्यास खाली सही करणार यांचेकडे ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ०७ (सात) दिवसांत पुराव्यासोबत लेखी स्वरूपात हरकत कळवावी, वरील मूदतीत कोणीही हरकत न घेतल्यास वरील जमिन मिळकतीशी कोणत्याही व्यक्तींचा अगर संस्थांचा कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध नाही, तसेच कोणत्याही व्यक्तीची अगर संस्थांची आमचे अशिलांच्या वर वर्णन केलेल्या जमिन मिळकतीच्या खरेदीच्या व्यवहारास हरकत नाही किंवा असल्यास ती हरकत त्यांनी आमचे अशिलांच्या लाभात सोडून दिलेली आहे असे समजण्यात येऊन आमचे अशिल खरेदीचा व्यवहार पुर्ण करतील मागाहून कोणीही हरकत घेतल्यास ती आमच्या अशिलांवर बंधनकारक राहणार नाही, याची नोंद घ्यावी.

दि. ०४/०३/२०२६ — अधिवक्ता
**शैलेश दत्तात्रेय पवार**
पत्ता. घर क्र. ३, नेमीनाथ हाईट्स शेजारी,
मुद्रे बु. कर्जत, ता. कर्जत, जि. रायगड,
मो. ९५९५२११८६७

## जाहीर नोटिस

सर्व जनतेस कळवण्यास येते की, आमचे आशिलांनी मौजे सासवणे, ता.अलिबाग येथील खालील वर्णनाच्या जमीन मिळकतींचे विद्यमान मालक शिशीर शशिकांत संसारे वगैरे यांचेकडून खाली नमुद केलेल्या जमीन मिळकती विकत घेण्याचे ठरवून तसा लिखीत साठेकरार विद्यमान मालकांबरोबर केलेला आहे.

परंतु सदरहू मिळकतींच्या झालेल्या साठेकराराप्रमाणे मिळकतीचे विद्यमान मालक आमचे अशिलांस करारातील अटी व शर्तीची पुर्तता करुन व्यवहार पुर्ण करुन देत नाहीत. याकरीता आमचे अशिलांनी अलिबाग येथील सिव्हिल जज सिनिअर डिव्हिजन रायगड यांचे कोर्टात सदरहू मिळकतीचा व्यवहार पुर्णकरुन घेण्याकरीता स्पेशल दिवाणी दावा दाखल केलेला आहे.

**मिळकतींचे वर्णन**

| क्र. | भूमापन क्रमांक व उपविभाग | क्षेत्र (हे. आर.) | आकार |
|---|---|---|---|
| १. | ४५५ | वरकस क्षेत्र ०-०४-१० त्यास पो.ख.०-०१-४० एकूण क्षेत्र ०-०५-५० | ०.१० |
| २. | ४८० | जिरायत क्षेत्र ०-८०-६० त्यास पो.ख. ०-०८-१० एकूण क्षेत्र ०-८८-७० | ५.४० |
| ३. | ४८१ | जिरायत क्षेत्र २-६५-०० | १५.४० |

आमचे अशिलांस असे समजले आहे की, वर वर्णन केलेल्या जमीन मिळकतींचे विद्यमान मालक आमचे अशिलांस डावलून सदरहू मिळकतींचा व्यवहार अन्य त्रयस्त्र व्यक्तींबरोबर आमचे अशिलांचे अपरोक्ष बेकायदेशीररित्या करण्याचा प्रयत्न करीत आहेत. सदरहू मिळकतींचा व्यवहार आमचे अशिलांचे बरोबर करुन तसा लिखीत साठेकरार करुन सदरच्या साठेकरारापोटी बयाणाची रक्कम सुद्धा स्विकारली आहे. ठरलेल्या व्यवहाराप्रमाणे आमचे अशिल कायम सदरहू मिळकतींचा व्यवहार पुर्ण करणेस तयार आहेत. परंतु व्यवहारामध्ये ठरलेल्या अटी व शर्तीची पुर्तता विद्यमान मालक आजपर्यंत करणेस चालढकल करीत आहेत.

तरी सर्व लोकांस कळविणेत येते की, वर नमुद केलेल्या मिळकतींच्या विद्यमान मालकांबरोबर कोणीही कसलाही करार, साठेकरार, खरेदीखत, ठराव वगैरे कुठल्याही परिस्थितीत करु नये. केल्यास ते आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही व आमचे अशिल असे काही झाल्यास त्याबाबत योग्य ती कायदेशीर कारवाई करतील याची नोंद घ्यावी.

अलिबाग
दि. ०५.०३.२०२६ — **ॲड. मिलिंद चव्हाण**
**८, आनंद अपार्टमेंट, श्रीबाग-३, अलिबाग**

## तहसिलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी सुधागड यांचे न्यायालयात

क्र. फौजदारी/कात-९/आवक क्र.१४२३/२०२६

श्रीम. लता सिताराम सावंत, रा.पाली सावंतआळी — अर्जदार
ता. सुधागड. जि. रायगड
विरुद्ध
मुख्याधिकारी, नगरपंचायत पाली — सामनेवाले
ता. सुधागड.जि.रायगड

**जन्म मृत्यु नोंदणी अधिनियम १९६९ मधील कलम १३ (३) प्रमाणे जन्म-मृत्युबाबत**

तमाम जनतेस या जाहीर नोटीसीद्वारे कळविणेत येते की, श्रीम. लता सिताराम सावंत, रा. पाली सावंतआळी ता.सुधागड जि.रायगड यांनी त्यांचे वडील सिताराम अर्जुन सावंत यांचा मृत्यू दिनांक २९/१२/१९८८ रोजी मौजे पाली ता.सुधागड जि.रायगड येथे झाला आहे. परंतु त्याची नोंद अद्यापपर्यंत नगरपंचायत कार्यालयात केली नाही असे प्रतिज्ञापत्रात नमुद करून त्यांच्या मृत्यू नोंदीचा आदेश मिळणेबाबत अर्ज तहसिल कार्यालय सुधागड येथे सादर केला आहे.

सदर सिताराम अर्जुन सावंत यांच्या मृत्यू नोंदीच्या तारखेबाबत कोणाची हरकत असल्यास ही जाहीर नोटीस प्रसिद्ध झालेच्या दिनांकापासून पंधरा दिवसाच्या आत तहसिल कार्यालय, सुधागड पाली येथे स्वतः अथवा आपल्या प्रतिनिधीमार्फत लेखी स्वरूपात हरकत दाखल करावी. जर सदर मुदतीत हरकत न आल्यास अर्जदार यांनी सादर केलेल्या पुराव्याच्या आधारे मृत्यू नोंद करण्याचे आदेश पारीत करणेत येईल. असे या जाहीर नोटीसीद्वारे प्रसिद्ध करणेत येत आहे.

ठिकाण :- सुधागड पाली — सही/-
दिनांक :- ०४/०३/२०२६ — **(उत्तम कुंभार)**
**तहसिलदार तथा कार्यकारी**
**दंडाधिकारी सुधागड**

## जाहिर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की मौजे सावळे, ता. कर्जत, जि. रायगड येथील हक्कनोंदीस वर्णन असलेली जमिन मिळकत आमचे अशिलांनी सदर मिळकतीचे विद्यमान मालक उषा अशोक जोहरी व परशुन अशोक जोहरी यांचेकडुन विकत घेण्याचे ठरविले सदर जमिन मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणे.

**मौजे सावळे, ता. कर्जत, जि. रायगड येथील जमिन मिळकतीचे वर्णन**

| सर्व्हे नंबर | हिस्सा नंबर | क्षेत्र हे.आर.पॉ | आकार रू.पै |
|---|---|---|---|
| ८१ | २२ | ०-१०-०० | ०-१२ |
| १०१ | १२ | ०-३६-०० | ०-५० |

तरी सदर मिळकतींमध्ये इतर कोणाचा कोणत्याही प्रकारे हक्कहितसंबंध असल्यास व सदर व्यवहारास कोणाचीही हरकत असल्यास सदर व्यक्तीने आपली लेखी हरकत पुराव्यानिशी खालील सही करणार यांचेकडे ही नोटीस प्रसिद्ध झालेपासुन १५ (पंधरा) दिवसांत नोंदवावी. सदर मुदतीत कोणाचीही हरकत न आल्यास व्यवहार पूर्ण केला जाईल व त्यानंतर येणारी कोणतीही हरकत आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही याची नोंद घ्यावी.

ता.०५/०३/२०२६ — खरेदीदारातर्फे ॲडव्होकेट
मो. ९९२१७२२२०० — **समीर हरिश्चंद्र लाड**
फ्लॅट नं ३०१, राजलक्ष्मी अपार्टमेंट,
अभिनव ज्ञान मंदीर शाळेजवळ, विठ्ठल नगर,
कर्जत, रायगड

## जाहीर नोटीस

तमाम जनतेस या नोटीसद्वारे कळविण्यात येते की, मौजे आक्षी, ता. अलिबाग, जि. रायगड खालील नमुद वर्णनाची बागायत जमिन मिळकत १.श्री. सुर्यकांत विष्णू जोगळेकर, २. सौ. अपर्णा सूर्यकांत जोगळेकर ३.श्री. अभिजीत सुर्यकांत जोगळेकर, सर्वजण रा. मु. शिंत्रे गल्ली पो. आक्षी, ता. अलिबाग, जि. रायगड यांच्या सामाईक मालकीची असून सदरील बागायत जमिन मिळकत सदर मिळकतीच्या विद्यमान मालकांकडून माझे अशिलांनी कायमस्वरूपी खरेदी करण्याचे मान्य व कबुल केले आहे. सदर जमिन मिळकत पूर्णतः निर्वेध व बिनजोखमी असल्याबाबतचा हवाला सदर मिळकतीच्या विद्यमान मालकांनी माझे अशिलांस दिला आहे.

**मिळकतीचे वर्णन**

| मौजे | भूमापन क्रमांक व उपविभाग | क्षेत्र (हे.आर.चौ.मी) | आकार (रु.पै.) |
|---|---|---|---|
| आक्षी, ता. अलिबाग | ५१६/२ | बागायत ०-७८-०० पो.ख. ०-०२-०० एकूण क्षेत्र ०-८०-०० | १६.०५ |

वर नमूद १. श्री. सुर्यकांत विष्णू जोगळेकर, २.सौ. अपर्णा सुर्यकांत जोगळेकर ३.श्री. अभिजीत सुर्यकांत जोगळेकर यांच्या सामाईक मालकीचे एकूण क्षेत्र ०२८-४८ हे. आर., आकार ५.४५ रू. पै. या जमिन मिळकतीपैकी प्लॉट नं. ४, क्षेत्र ०-०५-५७ हे. आर. ही बागायत मिळकत या नोटीसचा विषय आहे.

वर नमुद मिळकतीबाबत अन्य कुणाचाही कसलाही हक्क, हितसंबंध, बोजा, अथवा गहाणखत, दान, लीज, पोटगी, हवाला, साठेकरार, खरेदी, मेन्टेनन्स, मेहेर, कर्ज, मृत्यूपत्र वगैरे बाबत हरकत असल्यास अशा व्यक्तींनी ही सूचना प्रसिद्ध झाल्या दिनांकापासून पंधरा (१५) दिवसांचे अवधीत माझ्याकडे लेखी पुराव्यानिशी देऊन माझी खात्री पटवून द्यावी. विहित मुदतीत अशी कोणतीही लेखी हरकत न आल्यास माझे अशिल त्यांचा सदर मिळकतीचा खरेदी व्यवहार पूर्ण करतील व मागाहून येणारी कोणतीही हरकत माझे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही, याची कृपया सर्वांनी नोंद घ्यावी.

अलिबाग — सही/-
दिनांक : ०४/०३/२०२६ — **ॲड. प्रविण कृष्णा झेंडेकर**
मु. शिंत्रे गल्ली, पो. आक्षी,
ता. अलिबाग, जि. रायगड
खरेदीदाराचे वकील

## जाहीर नोटीस

दि. ०५/०३/२०२६

तमाम जनतेस कळविण्यात येते की, आमचे अशिल यांनी खालील नमुद केलेली मिळकत कायम खरेदी करण्याचे ठरविले आहे. तशा सदरच्या व्यवहाराची बोलणी व बयाणा पावती विद्यमान मालक यांचेसोबत झालेली आहे. सदरची मिळकत ही निर्वेध व बोजा विरहित असल्याचा भरवंसा आमचे अशिलांस विद्यमान मालक यांनी दिला असून सदर मिळकतीचे विक्री व्यवहारास कोणाचीही कसलीही हरकत असल्यास त्याची खातरजमा करणेकामी जाहिर नोटीस प्रसिद्ध करण्याचे काम आमचेकडे दिलेले आहे. त्या मिळकतींचे वर्णन खालीलप्रमाणे,

**-: मिळकतीचे वर्णन :-**

| मौजे | गट क्र. व उपविभाग | क्षेत्र (हे.आर.) | आकार (रू. पैसे) |
|---|---|---|---|
| चौल ता. अलिबाग | ८७५ | ०-२५-४० पो. ख ०-०१-३० एकुण ०-२६-७० | ६.३१ |

वरील मिळकत ही या जाहिर नोटीसीचा विषय आहे.

तरी वरील मिळकतीचे संदर्भात कोणाचाही गहाण, दान, बक्षीस, लिज, फरोक्त, पोटगी, साठेकरार, वहिवाटीचे जाण्यायेण्याचे मार्ग, वारसा हक्क आदी कोणत्याही प्रकारे हक्क व हितसंबंध असल्यास व त्यांची वरील मिळकतीच्या विक्री व्यवहारास हरकत असल्यास त्यांनी त्यांची हरकत योग्य त्या मुळ सही शिक्याची कागदोपत्री पुराव्यानिशी ही नोटीस प्रसिद्ध झालेपासून होणाऱ्या १५ दिवसांचे मुदतीत खालील सही करणार याजकडे कळवावी. येणेप्रमाणे विहित मुदतीत कोणाचीही कसल्याही प्रकारची हरकत न आल्यास सदरची मिळकत निर्वेध व बिनजोखमी आहे असे समजून आमचे अशिल सदरचे मिळकतीचा विक्री व्यवहार पूर्ण करतील व मागाहून येणारी कोणतीही हरकत आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही. याची तमाम जनतेने नोंद घ्यावी हे कळावे.

**ॲड. भक्ती दिलीप पाटील**
रा. मु. पो. मोठे शहापुर,
ता. अलिबाग, जि. रायगड.
मोबा. नं. ८३८०८९३५५१

## जाहीर नोटीस

सर्व तमाम लोकांस या जाहीर नोटिसीद्वारे कळविण्यात येते की, आमचे अशिलांनी खालील वर्णनाची मिळकत कायम फरोक्त खरेदी करणे करिता मिळकतीचे विद्यमान मालक श्री. दिलीप शंकर चव्हाण व श्री. दिनेश शंकर चव्हाण दोघे रा. बेलवडे बुद्रुक पेण यांजकडून नोटराइज्ड साठेकरार लिहून घेवून टोकन मनी अदा केलेले आहे.

व्यवहाराची मिळकत ७/१२ उताऱ्याप्रमाणे जि. रायगड ता.पेण, मौजे बेलवडे बुद्रुक येथील खालीलप्रमाणे....

| गाव | मालक नाव | गट नं./ हि.नं | क्षेत्र हे.आर.पॉ | आकार (रु.पै.) |
|---|---|---|---|---|
| बेलवडे बुद्रुक | दिलीप शंकर चव्हाण<br>दिनेश शंकर चव्हाण | २६१ | १-३०-०० पोटखराबा ०-१२-०० एकुण क्षेत्र १-४२-०० | २.३१ |

पैकी ०-८०-०० हे.आर क्षेत्र (८० गुंठे क्षेत्र)

सदरहू मिळकतीची मोजणी करुन ०-८०-०० क्षेत्राचा आमचे अशिलाचे संमत्तीने पोट हिस्सा ठरल्याप्रमाणे व चतु:सीमा निश्चित करुन व्यवहार पूर्ण करणेचा आहे.

सबब आमचे अशिलांचा सदरहू व्यवहार पूर्ण झाल्याशिवाय अन्य कोणीही सदरहू मिळकतीचे (१-४२-०० हे.आर.पॉ) या संपूर्ण क्षेत्र क्षेत्राबाबत कोणताही मिळकत हस्तांतर होणे बाबत तसेच खरेदी विक्रीचा व्यवहार किंवा कोणताही व्यवहार करु नये अगर केल्यास सदरहू व्यवहार हा बेकायदेशीर ठरणारा असून त्याबाबत आमचे अशिल खरेदीदार व मालक यांचे विरुद्ध फौजदारी स्वरुपाचा वा दिवाणी स्वरुपाचा वा योग्य तो गुन्हा दाखल करतील.

तरी सदरहू मिळकती बाबत कोणीही कुठल्याही प्रकारचा व्यवहार करु नये व असे न वागल्यास त्यामुळे इतर कोणाचेही कोणत्याही प्रकारचे नुकसान झाल्यास त्यास आमचे अशिल जबाबदार राहणार नाहीत हे कळावे.

टिप : दिनांक २८ फेब्रुवारी रोजी प्रसिद्ध झालेल्या जाहीर नोटीसमध्ये बदल करुन ही नव्याने जाहीर नोटीस दिली आहे.

पेण — सही /-
दिनांक- ०५/०३/२०२६ — **ॲड. सुरेश ह.देशमुख**
देशमुख व्हिला, भारत गॅस एजन्सी शेजारी,
पेण, रायगड.

## जाहिर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीने कळविण्यांत येते की, मौजे उमटे, ता. अलिबाग, जि. रायगड येथील खालील वर्णन केलेल्या भातशेती मिळकतीचे विद्यमान मालक श्री.अनंत नारायण पुनकर व श्री.रमेश नारायण पुनकर यांच्या नांवे असलेली भातशेती मिळकत मी खालील सही करणार यांनी कायम स्वरुपात विकत घेण्याचे ठरविले आहे. तशी बोलणी विद्यमान मालकांबरोबर झालेली आहे.

**मिळकतीचे वर्णन**

| मौजे | भूमापन क्र. व उपविभाग | क्षेत्र (हे.आर.) | आकार (रु.पै.) |
|---|---|---|---|
| उमटे ता.अलिबाग | १२८/४ | ०-०४-०० | ०.६९ |

सदर मिळकत निर्वेध असल्याबाबतचा निर्वाळा विद्यमान मालकांनी दिलेला आहे. सबब सदरहू मिळकतीवर अन्य कोणाचा कोणत्याही प्रकारचा हक्क, हितसंबंध, कुळ, वहिवाट, ताबा कब्जा, इजमेंट, साठेकरार, गहाण, दान, बोजा व अन्य कोणत्याही प्रकारचा हितसंबंध असल्यास त्यांनी या नोटीशीच्या तारखेपासून सात दिवसांचे आत प्रथमदर्शनी कागदोपत्री पुराव्यासह त्यांच्या लेखी हरकती खाली पत्त्यावर समक्ष वा रजिस्टर पोस्टाने दाखल कराव्यात. याप्रमाणे सदर मिळकत निर्वेध व बोजारहित आहे असे गृहीत धरुन मी वरील मिळकतीच्या संदर्भातील नियोजित व्यवहार पुर्ण करीन व विहित मुदतीच्या नंतर येणाऱ्या कोणत्याही हरकती माझेवर बंधनकारक राहणार नाही. याची कृपया संबंधितांनी नोंद घ्यावी.

दिनांक : ०४/०३/२०२६ — सही /-
**श्री.श्रेयस दिलीप पालवकर**
रा.चौल आग्राव-जान्हवी तळे, पो.चौल,
ता.अलिबाग, जि.रायगड
मो.नं.८२३७८९५४५९

## जाहीर नोटीस

दिनांक ०४/०३/२०२६

तमाम जनतेस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, आमचे अशिल यांनी मौजे पेडली ता. सुधागड जि. रायगड येथील खालील वर्णनाची मिळकत कायम खरेदीखताने विकत घेण्याचे ठरविले आहे. सदर मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणे :-

**मिळकतीचे वर्णन :-**
**मौजे पेडली ता. सुधागड जि. रायगड**

| कब्जेदाराचे नांव | स.नं. | हि.नं. | क्षेत्र. हे आर | आकार रू.पैसे |
|---|---|---|---|---|
| मजूंबाई शिवाजी छेडा | ३४ | १ | ०-४८-०० | ०-१७ |

सदर वरील वर्णन केलेली एकूण सर्व मिळकत आमचे अशिलांनी सदर मिळकतीचे कब्जेदार यांचेकडून कायम खरेदीने विकत घेण्याचे ठरविले आहे. तरी सदर होणारे खरेदी विक्री व्यवहारास कोणाचीही हरकत अथवा दावा असल्यास वा सदरहू मिळकतीचे खरेदी विक्री बाबत तसेच हक्क हितसंबंध, मालकी, वहीवाट, पोटगी, बक्षिसपत्र, मृत्युपत्र, साठेकरार अथवा कोणाचेही काही हक्क हितसंबंध वहिवाट अथवा सदर मिळकतीचे ताबे कब्जा वहिवाट असल्यास सदर नोटीस प्रसिद्ध झालेपासून संबंधित तक्रारदार याने आपली हरकत योग्य त्या कागदोपत्री पुरव्यासहीत ०७ दिवसांचे कालावधीत खालील पत्त्यावर नोंदवावे. सदर कालावधीत कोणाचीही कोणतीही हरकत न आल्यास सदर मिळकत निर्वेध व बोजारहित आहे असे समजून आमचे अशिल सदरचा खरेदी विक्री व्यवहार पूर्ण करतील व मागाहून आलेली हरकत आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही. याची नोंद घ्यावी.

ठिकाण :-पाली-सुधागड — सही /-
दिनांक : ४/०३/२०२६ — **श्री.राहुल जे.भंडारी**
ॲडव्होकेट
रा. पाली ता. सुधागड जि. रायगड
मोबा नं. ९४२३२३२८६२
मोबा नं. ८२३७१५६४६९

## जाहीर नोटीस

तमाम जनतेस या नोटीस द्वारे कळविण्यात येते की, मौजे - आक्षी, ता. अलिबाग, जि. रायगड खालील नमुद वर्णनाची बागायत जमिन मिळकत १.श्री. सुर्यकांत विष्णू जोगळेकर, २. सौ. अपर्णा सुर्यकांत जोगळेकर ३.श्री. अभिजीत सुर्यकांत जोगळेकर, सर्वजण रा. मु. शिंत्रे गल्ली पो. आक्षी, ता. अलिबाग, जि. रायगड यांच्या सामाईक मालकीची असून सदरील बागायत जमिन मिळकत सदर मिळकतीच्या विद्यमान मालकांकडून माझे अशिलांनी कायमस्वरूपी खरेदी करण्याचे मान्य व कबुल केले आहे. सदर जमिन मिळकत पूर्णतः निर्वेध व बिनजोखमी असल्याबाबतचा हवाला सदर मिळकतीच्या विद्यमान मालकांनी माझे अशिलांस दिला आहे.

**मिळकतीचे वर्णन**

| मौजे | भूमापन क्रमांक व उपविभाग | क्षेत्र (हे.आर.चौ.मी) | आकार (रु.पै.) |
|---|---|---|---|
| आक्षी, ता.अलिबाग | ५१६/२ | बागायत ०-७८-०० पो.ख. ०-०२-०० एकूण क्षेत्र ०-८०-०० | १६.०५ |

**वर नमूद १. श्री. सुर्यकांत विष्णू जोगळेकर, २. सौ. अपर्णा सुर्यकांत जोगळेकर ३.श्री. अभिजीत सुर्यकांत जोगळेकर यांच्या सामाईक मालकीचे एकूण क्षेत्र ०२८-४८ हे. आर., आकार ५.४५ रू. पै. या जमिन मिळकतीपैकी प्लॉट नं. ५, क्षेत्र ०-०९-११ हे. आर. ही बागायत मिळकत या नोटीसचा विषय आहे.**

वर नमुद मिळकतीबाबत अन्य कुणाचाही कसलाही हक्क, हितसंबंध, बोजा, अथवा गहाणखत, दान, लीज, पोटगी, हवाला, साठेकरार, खरेदी, मेन्टेनन्स, मेहेर, कर्ज, मृत्यूपत्र वगैरे बाबत हरकत असल्यास अशा व्यक्तींनीही सूचना प्रसिद्ध झाल्या दिनांकापासून पंधरा (१५) दिवसांचे अवधीत माझ्याकडे लेखी पुराव्यानिशी देऊन माझी खात्री पटवून द्यावी. विहित मुदतीत अशी कोणतीही लेखी हरकत न आल्यास माझे अशिल त्यांचा सदर मिळकतीचा खरेदी व्यवहार पूर्ण करतील व मागाहून येणारी कोणतीही हरकत माझे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही, याची कृपया सर्वांनी नोंद घ्यावी.

अलिबाग — सही/-
दिनांक : ०४/०३/२०२६ — **ॲड. प्रविण कृष्णा झेंडेकर**
मु.शिंत्रे गल्ली, पो.आक्षी,
ता.अलिबाग, जि.रायगड
खरेदीदाराचे वकील

## वाचकांसाठी निवेदन

कृषीवल वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची शहानिशा करुनच वाचकांनी संबंधितांशी व्यवहार करावेत. वर्तमानपत्रातून प्रसिद्ध जाहिरातीतील उत्पादने, सेवा किंवा त्यासंदर्भातील दावे यांची नागेश पब्लिशर्स प्रा. लि. कोणतीही हमी घेत नाही. त्या मजकुराच्या अथवा दाव्याच्या पूर्ततेसंदर्भातील कोणतीही जबाबदारी नागेश पब्लिशर्स प्रा.लि.चे मुद्रक, प्रकाशक, संपादक किंवा मालक यांच्यावर राहणार नाही, याची कृपया वाचकांनी नोंद घ्यावी.

- मुख्य संपादक

ऐश्वर्य ज्वेल कलेक्शन
१ ग्रॅम सोन्याचे प्लेटींग
दागिने- नविन डिझाइन्स

मोत्याचे दागिने- तन्मणी, चींचपेटी, बांगड्या, बाजुबंद. गॅरंटीचे दागिने- मंगळसूत्र, बांगड्या, पाटल्या, हार, माळ. डायमंड- कुंदन- पोलकी- सेट- मॅचिंग बांगड्या- कानातले. सर्व नामांकित कंपन्यांची कॉस्मेटीक्स, परफ्यूम, डीओ. वाजवी भाव आणि भरपूर व्हरायटीसाठी प्रसिद्ध दुकान.
२/१२ पी.एन.पी. नगर, अलिबाग.
मोबाईल : ९८६०६५८५६५

अरविंद सं. मोरे

# हरविलेला ‘स्क्वेअर कट’

क्रिकेटचा टी-२० विश्वचषक सध्या परमोच्च बिंदूवर पोहचलेला आहे. साखळी गटातील सर्व सामने भारताने जिंकले आणि सुपर आठमध्ये थाटात स्थान मिळविले. त्यात भारताने दक्षिण अफ्रिका विरूद्ध पराभव पत्करून वेस्ट इंडिज आणि झिम्बाब्वे संघाला हरवून अखेर उपांत्य फेरीत प्रवेश मिळवला आणि भारतीय क्रिकेट प्रेमींचा जीव भांड्यात पडला. टी-२० विश्वचषक स्पर्धेच्या सर्व सामान्यांकडे बघितल्या नंतर आपल्याला असे आढळून येते की, प्रत्येक फलंदाज हा षटकार मारण्याच्याच तयारीत असतो. जो येतो तो हवेतच बॅट फिरवीत असतो. आणि प्रेक्षकांच्या सुद्धा तश्याच अपेक्षा असतात. त्यामुळे फलंदाज जणू धावून एक-दोन धावा काढणे हे विसरलेच आहेत. जेव्हापासून जलद गतीचे टी-२० क्रिकेट प्रकार आला आहे तेव्हापासून ऑफ साईडचा चेंडू लेग साईडला मारण्याची जणू फॅशनच जडली आहे. उजव्या हाताने बॅटिंग करणारा फलंदाज लगेच डाव्या हाताने (बाजूने) फटका मारण्यात माहीर झाला आहे. त्यामुळे आता अनेक बदल फलंदाजीत झालेले आहेत. गोलंदाजाला आपल्या गोलंदाजीचा विशेष करून योग्य टप्प्याचा अंदाज येऊ नये म्हणून बरेच फलंदाज विचित्र पद्धतीने हालचाल करताना फलंदाजी करताना दिसत आहेत. या सगळ्या गदारोळात टी-२० क्रिकेट प्रकारात तंत्रशुद्ध फलंदाजी करणे विसरूनच गेले आहे. जो तो विचित्र फटके मारून जास्तीत जास्त धावा काढण्याच्या फिरकतीत असतात.या आधी क्रिकेटमध्ये एक खूपच सुंदर व तंत्रशुद्ध फटका होता, तो म्हणजे स्क्वेअर कट. या कटमध्ये सुंदर नजाकत होती. फलंदाजाने हा फटका लावल्यावर मैदानामध्ये एक सुंदर ध्वनी येतो. वास्तविक हा क्रिकेट खेळातील डोळ्याचे पारणे फिटणारा दर्शनीय फटका आहे. साधारणतः चेंडू हा आखूड टप्प्याचा ऑफ स्टम्पच्या बाहेर जाणारा असतो. त्याला फलंदाज योग्य पद्धतीने पारखतात, अंदाज घेतात आणि थोडे बॅक फूटला जाऊन आडव्या बॅटने फटका मारतात. हा फटका योग्य त्या गॅपमध्ये बसला की चेंडू कधी सीमापार होतो, हे कोणाला कळत सुद्धा नाही. जशी काही बंदुकीतून गोळी निघावी तसा हा दर्शनीय, लाजवाब फटका असतो. मात्र, तो हल्ली लोप पावलेला आहे. पूर्वी काही फलंदाज हा फटका मारण्यासाठी निष्णात होते. ते बरोबर क्षेत्ररक्षकाच्या गॅपमधून फटका मारायचे. तो फटका जितका विलोभनीय असायचा तितकाच त्याचा ध्वनी सुद्धा कानाला आनंद देऊन जायायचा. यात फूट वर्क, लवचिकता व मनगटाची विशिष्टपणाची हालचाल असायची. जो परिपुर्ण फलंदाज आहे तोच हा फटका मारत असायचा. फटका चुकला तर स्लीपमध्ये झेल जाण्याची सुद्धा शक्यता असायची. म्हणून तर तेव्हा एक-दोन नाही तर ४-५ क्षेत्ररक्षक स्लिप आणि गलीमध्ये असायचे. या मास्टर स्क्वेअर कटचे विश्वख्याती प्राप्त फलंदाज आपल्या भारत देशात होऊन गेले आहेत. त्यात गुंडाप्पा विश्वनाथ, सुनील गावस्कर, दिलीप वेंगसरकर, राहुल द्रविड, सचिन तेंडुलकर, विनोद कांबळी, व्ही.व्ही. एस. लक्ष्मण, सौरभ गांगुली, वीरेंद्र सेहवाग, मोहम्मद अझरुद्दीन, विराट कोहली आदी दिग्गजांसह आता टी-२० विश्वचषकात खेळत असलेला संजू सॅमसन या फलंदाजांचा समावेश आहे. या सर्व फलंदाजांना त्यांना त्यांचा ऑफ स्टंप कुठे आहे, हे माहित असायचे. हे सर्व फलंदाज वेल लेफ्ट करण्यात सुद्धा माहीर होते. तो काळ फक्त जमिनीवरून जमिनीवर मारा करणारा काळ होता. तर आजचा जमाना हा हवेतून मारा करणारा आहे. त्यामुळे या अति जलद टी-२० क्रिकेटमध्ये स्क्वेअर कट कधी हरवला, हे आपल्याला कळले सुद्धा नाही. शेवटी काही झाले तरी स्क्वेअर कट मारायला मनगटात दम आणि जिगर लागतो, हे खरे.

# दोन विश्व विजेत्यांमधील क्रिकेट संघर्षाची पर्वणी

विनायक दळवी

टी-२० विश्वचषक भारत आणि इंग्लंड यांच्यातील उपांत्य फेरीचा सामना. नेहमीप्रमाणे यंदाच्या स्पर्धेतील भारतीय संघ दडपणाखालीच. खरंतर दक्षिण आफ्रिका विरुद्ध सुपर ८ मधील सामना मोठ्या फरकाने गमावल्यानंतर भारतीय संघ दडपणाखाली आला होता. त्यामुळे वेस्टइंडीज विरुद्धचा सामना निर्णायक ठरला होता. तिच परिस्थिती आता उपांत्य सामन्यात असेल. कारण हा देखील नॉकआऊट सामना आहे. यंदाच्या विश्वचषक स्पर्धेत याआधीच्या सहाही सामन्यात न वापरण्यात आलेली मध्यवर्ती खेळपट्टी, या सामन्यासाठी वापरली जाणार आहे. या खेळपट्टीचे स्वरूप पाहता त्यावर भरपूर धावा फटकावल्या जातील, असा अंदाज आहे. दोन्ही संघांकडे फटकेबाज फलंदाज असल्यामुळे क्रिकेट रसिकांसाठी ती एक पर्वणीच ठरेल. २० षटकांचा सामन्यात खरं तर भविष्य वर्तमान कठीण असतं, याचा अनुभव या स्पर्धेत दक्षिण आफ्रिका वगळता सर्वच संघांना आला आहे. याच वानखेडे स्टेडियमवर इंग्लंड संघ, नवोदित नेपाळकडून पराभूत होता बाल-बाल बचावला होता. अमेरिकेसारख्या नवदीप संघाने सलामीच्या सामन्यात भारताला याच वानखेडे मैदानावर वेक अप कॉल दिला होता. त्यानंतर पुलाखालून बरच पाणी वाहून गेलं आहे. दोन्ही संघानी आपल्या उणिवा दूर करण्याचा आटोकाट प्रयत्न केला आहे. भारतीय संघाला सलामीच्या फलंदाजीच्या फळीतील अभिषेक शर्माचा फॉर्म काही अजून गवसलेला दिसत नाही. विजय संचार शक्यतो बदल करायचा नाही, या भारतीय संघाच्या भूमिकेमुळे अभिषेक शर्माला आणखी एक संधी वानखेडे वरील उपांत्य सामन्यात मिळेल असं वाटतं. संजू सॅमसनला गवसलेला फलंदाजीचा फॉर्म भारतीय संघाची दृष्टीने जमेची बाजू असेल. भारतीय संघाप्रमाणेच या स्पर्धेत इंग्लंड संघ देखील पूर्णपणे आत्मविश्वासाने गेलेला दिसत नाही. यात मैदानावर त्यांनी वेस्ट इंडिज विरुद्ध सामना गमावला होता. मात्र, त्याबाबत इंग्लंडच्या कप्तान हॅरी ब्रूक याने म्हटले की, आम्ही याआधी श्रीलंकेत सलग ६ सामने जिंकले होते. ते देखील चांगल्या फिरकी आक्रमणाविरुद्ध. या स्पर्धेत इंग्लंडने बिकट परिस्थितीतून विजय मिळविल्यामुळे संघाला आत्मविश्वास मिळाला आहे, अस ब्रूकचे म्हणणं होतं. नाणेफेकीचा कौल नेहमीप्रमाणे महत्त्वाचा ठरणार आहे. सामन्याच्या उत्तरार्धात मैदानावर पडणारे दव काही प्रमाणात निर्णयक ठरू शकते.भारताप्रमाणे इंग्लंडकडे देखील चांगले आणि अनुभवी फिरकी गोलंदाज आहे. सध्याची भारतीय फलंदाजी पाहता, बऱ्याच वेळेला फिरकी गोलंदाजांसमोर देखील भारतीय फलंदाजांनी नांगी टाकलेली दिसत होती. या स्पर्धेत भारताला चांगली सुरुवात मिळाली नाही, हे देखील सत्य आहे. मधली फळी लवकरच मैदानात उतरल्यामुळे झालेला तोटा भारताला नंतर भरून काढता आला नव्हता.यजमान आणि घरच मैदान, तसेच भारतीय प्रेक्षक, यामुळे भारतीय संघाला मानसिक पाठिंबा अधिक असेल. मात्र, भारतीय संघ अडचणीत असताना याच गोष्टीचा भारतीय संघावर आणि खेळाडूंवर अधिक दबाव पडल्याचे दिसून आलं होतं. याउलट इंग्लंडची परिस्थिती असेल. त्यांना कोणताही दडपणाशिवाय या सामन्यात उतरता येईल. भारताला जसा अभिषेक शर्माच्या फलंदाजीचा लाभ झालेला दिसला नाही, तसेच इंग्लंडच्या जोश बटलर याच्या बाबतीत बोलता येईल.आयपीएलमध्ये भारतीय खेळपट्ट्यांवर खोऱ्याने धावा काढणाऱ्या बटलरच्या बॅटमधून यंदाच्या स्पर्धेत फारशा धावा निघाल्या नाहीत. कदाचित अभिषेक शर्मा आणि बटलर या दोघांचा आजचा दिवस असेल. मात्र, त्यामुळे क्रिकेट रसिकांच मनोरंजन निश्चितच होईल. वानखेडे स्टेडियमच्या छोट्या अंतराच्या सीमारेषेमुळे उपांत्य फेरीच्या सामन्यात चौकार षटकारांची आतषबाजी निश्चितच पाहायला मिळेल. हे मैदान भारतीय कप्तान सूर्यकुमार यादव याचे घरच. त्यामुळे आज प्रेक्षकांची आणि भारतीय संघाची देखील त्याच्याकडून मोठ्या खेळीची अपेक्षा आहे. कोलकात्याचा फॉर्म संजू सॅमसन वानखेडे स्टेडियमवर देखील घेऊन आला आहे का, ते देखील आज पाहायला मिळेल. एकंदरीत दोन विश्व विजेत्यांमधील हा सामना क्रिकेट रसिकांसाठी पर्वणी ठरणार आहे.

# आद्विक-रुत्वी वॉरिअर्सचा ‘सुपर’ विजय

## ।। चौलमळा प्रिमिअर लीग उत्साहात ।। रिया टायगरचा पराभव; हॅट्ट्रिकची संधी हुकली



**। चौल । प्रतिनिधी ।**

**अलिबाग तालुक्यातील चौलमळा गावात ग्रामदेवता आई कृष्णादेवीच्या आशीर्वादाने आणि ‘‘एक दिवस एकजुटीसाठी, एक दिवस गावासाठी’’ या प्रेरणादायी संकल्पनेतून क्रिकेट स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. सलग दोन वर्षे विजेतेपद पटकावणारे संघमालक सचिन आमरे आणि कर्णधार प्रशांत आमरे यांच्या नेतृत्वाखालील रिया टायगर संघ यंदा विजयाची हॅट्ट्रिक साधण्याच्या इराद्याने मैदानात उतरला होता. मात्र, संघमालक मंदार नाईक आणि कर्णधार मनीष नाईक यांच्या अद्विक-रुत्वी वॉरिअर्सने जिद्द, संयम आणि धैर्याच्या जोरावर सुपर ओव्हरमध्ये थरारक विजय मिळवत रिया टायगरची विजयी मालिका खंडित केली आणि विजेतेपद खेचून आणले.**

अलिबाग तालुक्यातील चौलमळा क्रिकेट संघाच्यावतीने आयोजित करण्यात आलेली चौलमळा प्रिमिअर लीग-पर्व तिसरे ही क्रिकेट स्पर्धा रविवारी (दि.१) उत्साह, जल्लोष आणि एकोप्याच्या वातावरणात यशस्वीरीत्या पार पडली. या स्पर्धेचे यंदाचे तिसरे वर्ष होते. गावकऱ्यांचा स्पर्धेला उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. ही स्पर्धा गावचे प्रमुख रवींद्र घरत, उपप्रमुख जितेंद्र पाटील, युवक मंडळ अध्यक्ष महेंद्र नाईक आणि उपाध्यक्ष अल्पेश म्हात्रे यांच्या मार्गदर्शनाखाली यशस्वीरित्या पार पडली. स्पर्धा यशस्वी करण्यासाठी चौलमळा क्रिकेट संघाच्या सर्व सभासदांनी अहोरात्र मेहनत घेत नियोजन, व्यवस्था आणि समन्वयाची जबाबदारी समर्थपणे पार पाडली.

> **ही लीग केवळ क्रिकेटची स्पर्धा नसून गावाच्या एकजुटीचा, आपुलकीचा आणि सकारात्मक ऊर्जेचा उत्सव ठरली. मैदानावर स्पर्धा झाली, पण मनात मात्र सर्वांनी एकोप्याची भावना जपली. जिंकणारा संघ एकच असला तरी आनंद साजरा करणारे संपूर्ण गाव होते, हेच या स्पर्धेचे खरे यश आहे. - रवींद्र घरत, गावप्रमुख, चौलमळा**

त्यांच्या परिश्रमामुळेच हा क्रीडा सोहळा दिमाखात साकार झाला.

अंतिम सामना रिया टायगर आणि अद्विक-रुत्वी वॉरिअर्स यांच्यात अत्यंत चुरशीचा व प्रेक्षकांच्या हृदयाचा ठोका चुकवणारा ठरला. सामन्याच्या सुरुवातीलाच रिया टायगरने नाणेफक जिंकून प्रथम क्षेत्ररक्षणाचा निर्णय घेतला. त्यांच्या गोलंदाजांनी सुरुवातीपासून अचूक टप्प्यावर मारा करत अद्विक-रुत्वी वॉरिअर्सच्या फलंदाजांना पूर्णतः जखडून ठेवले. तीन षटकांच्या सामन्यात अद्विक-रुत्वी वॉरिअर्स संघाला अवघ्या २६ धावांवर रोखण्यात रिया टायगरला यश आले. २७ धावांचे माफक लक्ष्य पाहता रिया टायगर सहज विजय मिळवेल आणि हॅट्ट्रिक साजरी करेल, असे चित्र निर्माण झाले होते. मात्र, अद्विक-रुत्वी वॉरिअर्सच्या गोलंदाजांनी जबरदस्त पुनरागमन करत सामन्यात रंगत आणली. अचूक आणि नियंत्रित गोलंदाजी करत रिया टायगरच्या फलंदाजांवर दबाव निर्माण केला. निर्धारित षटकांत रिया टायगरलाही २६ धावांवर रोखण्यात आले आणि सामना बरोबरीत सुटत सुपर ओव्हरमध्ये पोहोचला.

### सुपर ओव्हरचा थरार

सुपर ओव्हरमध्ये प्रथम फलंदाजी करताना रिया टायगरने एका षटकात १४ धावांचे लक्ष्य उभे केले. अद्विक-रुत्वी वॉरिअर्ससमोर आता १५ धावांचे आव्हान होते. रिया टायगरकडून सुपर ओव्हर प्रशांत आमरे यांनी टाकली. अद्विक-रुत्वी वॉरिअर्सकडून अनिकेत म्हात्रे आणि जितेंद्र जाधव ही सलामीची जोडी मैदानात उतरली. पहिल्या पाच चेंडूंमध्ये या जोडीने धडाकेबाज फलंदाजी करत १२ धावा फटकावल्या. शेवटच्या चेंडूवर विजयासाठी तीन धावांची आवश्यकता असताना पुन्हा सामना टाय होऊन आणखी एक सुपर ओव्हर होणार का, याकडे सर्वांचे लक्ष लागले होते. मात्र दबावाच्या क्षणी अष्टपैलू अनिकेत म्हात्रेने प्रशांत आमरे यांच्या अखेरच्या चेंडूवर खणखणीत षटकार ठोकला आणि अद्विक-रुत्वी वॉरिअर्सला संस्मरणीय विजय मिळवून दिला. क्षणातच मैदानात एकच जल्लोष उसळला. सहकाऱ्यांनी अनिकेतला खांद्यावर उचलून आनंद साजरा केला. अष्टपैलू कामगिरीबद्दल अनिकेत म्हात्रेला सामनावीर पुरस्काराने गौरविण्यात आले.

### जल्लोषात ट्रॉफी उंचावली

अखेर अद्विक-रुत्वी वॉरिअर्स संघ विजेता ठरल्याने संघमालक मंदार नाईक आणि कर्णधार मनीष नाईक यांच्या हस्ते ट्रॉफी उंचावण्यात आली. टाळ्यांचा कडकडाट, जल्लोष आणि आनंदाच्या घोषणांनी संपूर्ण मैदान दणाणून गेले. रिया टायगरनेही कडवी झुंज देत अंतिम सामन्याला खरी रंगत आणली.

# तटकरे तंत्रनिकेतन संघाची बाजी



**। कोलाड । प्रतिनिधी ।**

इंटर इंजीनियरिंग डिप्लोमा स्टुडेंट स्पोर्ट्स असोसिएशन मार्फत क्रीडा स्पर्धा महाराष्ट्रातील विविध तंत्रनिकेतन येथे आयोजित करण्यात आल्या होत्या. नुकत्याच बेल्हे-पुणे येथील समर्थ पॉलिटेक्निक येथे राज्य स्तरीय कबड्डी व खो-खो स्पर्धा पार पडल्या. या विविध क्रीडा स्पर्धेत रायगड जिल्ह्यातील कोलाड गोवे येथील श्रीमती. गीता द. तटकरे तंत्रनिकेतच्या विद्यार्थ्यांनी देखील सहभाग घेतला होता. त्यांनी खो-खो स्पर्धेत धडाकेबाज कामगिरी करीत बाजी मारली आहे.

त्यांना राष्ट्रवादी (शरदचंद्र पवार) पक्षाचे खासदार अमोल कोल्हे व इतर मान्यवरांच्या हस्ते सन्मानित करण्यात आले. या विद्यार्थ्यांचे तटकरे चॅरिटेबल ट्रस्टचे विश्वस्त संदीप तटकरे, रजिस्टार अजित तेलंगे, प्राचार्य विपुल मसाल तसेच क्रीडा विभाग प्रमुख चैतन्य भगत, टिम खो-खो मॅनेजर फेकणे, कबड्डी टीम मॅनेजर विनायक पोटफोडे यांनी अभिनंदन करून पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या आहेत.




# नागोठणे संघ प्रथम क्रमांकाचा मानकरी

**। पाली/गोमाशी । प्रतिनिधी ।**

शिवशंभू इलेव्हन आंबोलेवाडीच्यावतीने श्री छत्रपती चषकानिमित्त मर्यादित षटकं आर्म क्रिकेटचे सामने शनिवार व रविवार रोजी जनरल अरुण कुमार वैद्य क्रीडांगण पाली येथे आयोजन करण्यात आले होते. या स्पर्धेत २४ संघांनी आपला प्रवेश निश्चित केला होता. या स्पर्धेचे थेट प्रेक्षेपन युट्यूबच्या माध्यमातून करण्यात आले होते. ही स्पर्धा पाहण्यासाठी प्रेक्षकांनी मोठ्या प्रमाणावर गर्दी केली होती.

या स्पर्धेतील अंतिम लढत सुमित दादा काते प्रतिष्ठान नागोठणे विरुद्ध शिव शंभू इलेव्हन आंबेलेवाडी या संघात झाली. सुमित दादा काते प्रतिष्ठान नागोठणे हा संघ प्रथम क्रमांकांचा मानकरी ठरला. या संघास रोख रक्कम ३० हजार व आकर्षक चषक, द्वितीय क्रमांकाचा मानकरी शिव शंभू इलेव्हन आंबेलेवाडी या संघास रोख रक्कम २० हजार व आकर्षक चषक, तृतीय क्रमांक अगस्त इलेव्हन वैतागवाडी या संघास १० हजार व आकर्षक चषक, चतुर्थ क्रमांक दत्तगुरुक्लब भार्जेवाडी अ या संघास रोख रक्कम ७ हजार व आकर्षक चषक देऊन गौरविण्यात आले.

तसेच, या स्पर्धेतील सामनावीर, उत्कृष्ट फलंदाज, उत्कृष्ट गोलंदाज, उत्कृष्ट क्षेत्ररक्षक यांना देखील आकर्षक बक्षीस देऊन मंडळाच्यावतीने सन्मानित करण्यात आले.

# नेरळमध्ये मोफत कराटे प्रशिक्षण



**। नेरळ । प्रतिनिधी ।**

जिल्हा महिला व बालकल्याण विभागाच्या शासकीय योजनेनुसार नेरळ येथील रेनबो इंग्लिश स्कूलमध्ये मुलींच्या स्वसंरक्षण व शारीरिक विकासासाठीचे प्रशिक्षण नुकतेच पार पडले. या प्रशिक्षणाचा अनेक मुलींनी लाभ घेतला. नेरळमधील नालंदा अकॅडमीचे मुख्य प्रशिक्षक अविनाश एम. जाधव, जीवन धाकवाल आणि अभिषेक घडशी यांनी सलग ४० दिवस आपला बहुमूल्य वेळ देऊन मुलींना स्वसंरक्षणाचे प्रशिक्षण दिले आहे. त्यामुळे प्रशिक्षण घेणाऱ्या सर्व मुलींच्या पालकांनी समाधान व्यक्त केले असून शिक्षकांचे आभार मानले. महिला सक्षमीकरणाबरोबरच त्यांना स्वसंरक्षणाचे धडे देणे हे फार महत्त्वाचे असून शासनाने ही मोहीम अधिक व्यापक करण्याची गरज आहे. तसेच, रेनबो इंग्लिश स्कूलच्या मुख्याध्यापिका मनीषा सावंत यांनी शासन आणि प्रशिक्षकांचे आभार व्यक्त करत असतानाच मुलांच्या शिक्षणाबरोबरच सर्वांगीण विकासासाठी आम्ही नेहमीच प्रयत्नशील राहणार असल्याचे अभिवचन यावेळी दिले.

# भारतीय महिलांची कसोटी

**नवी दिल्ली :** भारतीय महिला संघ सध्या ऑस्ट्रेलिया दौऱ्यावर असून हा दौरा आत्तापर्यंत त्यांच्यासाठी संमिश्र ठरला. या दौऱ्यात टी-२० मालिका जिंकल्यानंतर एकदिवसीय मालिकेत मात्र भारतीय संघाला व्हाईटवॉशचा सामना करावा लागला. आता या मर्यादीत षटकांच्या मालिकांनंतर या महिला क्रिकेट संघांमध्ये एकमेव कसोटी सामना शुक्रवारी (दि.६) सुरू होणार आहे. हा सामना दिवस-रात्र कसोटी सामना असेल.



# फिफा विश्वचषकातून इराणची माघार?

**। नवी दिल्ली । वृत्तसंस्था ।**

आखातामध्ये सुरू असलेल्या युद्धाचा मोठा परिणाम तीन महिन्यानंतर सुरू होणाऱ्या आणि सहयजमान अमेरिकेत होत असलेल्या फिफा विश्वकरंडक फुटबॉल स्पर्धेवर होण्याची शक्यता आहे. स्पर्धेसाठी पात्र ठरलेल्या इराणचा सहभागच अनिश्चित झाला आहे.

फिफा विश्वकरंडक फुटबॉल स्पर्धा १५ जूनपासून सुरू होत आहे. अमेरिका, कॅनडा आणि मेक्सिको या देशांत मिळून १०४ सामने होणार आहेत. त्यात इराण त्यांचे तीन साखळी सामने अमेरिकेत, दोन दोन सामने इंगलवूड, कॅलिफोर्निया आणि सिएटल येथे खेळणार आहेत. यादरम्यान, आमच्याविरुद्ध एवढे मोठे युद्ध सुरू केल्यानंतर आणि सर्वोच्च नेत्यांसह अनेकांची हत्या केल्यानंतर आम्ही विश्वकरंडक स्पर्धेत सहभागी होऊ, असे वाटत नाही, असे इराणच्या फुटबॉल संघटनेचे महत्त्वाचे अधिकारी मेहदी ताज यांनी सांगितले. मेहदी हे आशिया फुटबॉल महासंघाचेही अध्यक्ष आहेत. इराण हा आशिया फुटबॉलमधील सर्वात ताकदवर संघ आहे. फिफाची क्रमवारी २११ संघांची आहे, त्यात इराणचा संघ २०व्या स्थानी आहे. फुटबॉल विश्वातील या सर्वात मोठ्या स्पर्धेसाठी इराण आपला संघ पाठवणार नाही, की अमेरिका सरकार या संघावर बंदी घालून त्यांना आपल्या देशात प्रवेशबंदी करणार, हे स्पष्ट झालेले नाही. आम्ही परिस्थितीवर लक्ष ठेवून आहोत, असे सांगत फिफाचे सरचिटणीस मथाईस ग्राफस्टॉर्म यांनी कोणतेही थेट भाष्य करण्यास नकार दिला.

## आरोग्य विषयक जनजागृतीसाठी आयोजन | २ हजारहून अधिक धावपटूंचा सहभाग

# बिर्ला ओपस हाफ मॅरेथॉनला उत्स्फूर्त प्रतिसाद

**। उदय सावंत ।**

**। महाड ।**

महाडमध्ये बिर्ला ओपस या कंपनी समूहाकडून रविवारी (दि.१) हाफ मॅरेथॉनचे आयोजन करण्यात आले होते. या मॅरेथॉनमध्ये महाराष्ट्रातून विविध ठिकाणाहून सुमारे २ हजारहून अधिक लोकांनी सहभाग नोंदवला. सुरुवातीला २१ किलोमीटर अंतर असलेल्या गटाला मॅरेथॉन ॲम्बेसेडर मिलिंद सोनम यांनी हिरवा झेंडा दाखवून प्रारंभ करण्यात आला. आरोग्य विषयक जनजागृती करण्यासाठी या मॅरेथॉनचे आयोजन करण्यात आल्याचे आयोजकांकडून सांगण्यात आले.






बिर्ला ओपस या कंपनी समूहाकडून रविवारी सकाळी ६.०० वाजता महाड येथील भिलारे मैदानात हाफ मॅरेथॉनचे आयोजन करण्यात आले होते. या मॅरेथॉनमध्ये एकूण सहभागी २,२६० धावपटूंनी वर्गानुसार सहभाग नोंदवला होता. त्यामध्ये २१ किमी टाइम्ड रनमध्ये २६६, १० किमी टाइम्ड रनमध्ये ४४१, ५ किमी टाइम्ड रनमध्ये ९०३, तर ३ किमी फन रनमध्ये ६५० जण सहभागी झाले होते. यावेळी सीओओ अजित कुमार, व्ही.पी. ऑपरेशन्स आनंद सिंग, प्यार विभागाचे अरुण शिर्के, युनिट हेड महेंद्रसिंग शेखावत, महाडचे नगराध्यक्ष सुनील कविस्कर, उपनगराध्यक्ष संदीप जाधव, पोलीस निरीक्षक संदीप भोसले आदी मान्यवर उपस्थित होते. या स्पर्धेत फिटनेस आयकॉन मिलिंद सोनव, कॉम्रेड मॅरेथॉन रनर सतीश गुजरात आणि अल्ट्रा मॅरेथॉन रनर सोफिया सुफी यांची विशेष उपस्थिती आकर्षणाचा विषय ठरली.

दरम्यान, ५ किमी स्पर्धेत महिलांच्या १२ ते २५ वयोगटातून पूजा सावंत, २६ ते ४० वयोगटातून स्वाती गुजर व ४१च्या पुढील वयोगटातून माधुरी शिवदे यांनी प्रथम क्रमांक पटकावला. पुरुषांच्या १२ ते २५ वयोगटातून संदीप जोशी, २६ ते ४० वयोगटातून संदीप कुमार व ४१च्या पुढील वयोगटातून श्रीनिवास पांडे यांनी प्रथम क्रमांक पटकावला. १० किमीच्या स्पर्धेत महिलांच्या १६ ते २५ वयोगटातून संतोषी नराले, २६ ते ३५ वयोगटातून प्रिया शिंदे, ३६ ते ४५ वयोगटातून मिनाज नदाफ, ४६ ते ५५ वयोगटातून वैशाली गायकवाड व ५६च्या पुढील वयोगटातून शिल्पा भन्साळी यांनी प्रथम क्रमांक मिळवला. पुरुषांच्या २६ ते ३५ वयोगटातून अमोल ताम्हणकरे, ३६ ते २५ वयोगटातून योगेश जाधव, ४६ ते ५५ वयोगटातून जयनाथ शिंदे, ५६ ते ६५ वयोगटातून घनश्याम पद्मगिरी व ६६च्या पुढील वयोगटातून बजरंग चव्हाण यांनी विजय मिळवला. हाफ मॅरेथॉनच्या २१ किमी स्पर्धेत महिलांच्या १८ ते २५ वयोगटातील साक्षी पवार, २६ ते ३५ वयोगटातील उर्मिला बाणे, ३६ ते ४५ वयोगटातील स्मिता शिंदे, ४६ ते ५५ वयोगटातील अनिता पाटील, ५६ ते ६५ वर्ष वयोगटातील संगीता उबाळे व ६६च्या वरील वयोगटातील तुलात कामत यांनी विजय मिळवला. पुरुषांच्या १८ ते २५ वयोगटातील स्वप्निल कोचाल, २६ ते ३५ वयोगटातील रामू पारधी, ३६ ते २५ वयोगटातील सुभाष पवार, ४६ ते ५५ वयोगटातील रवींद्र जगदाळे, ५६ ते ६५ वयोगटातील उदय बोभाटे आणि ६६च्या पुढील वयोगटातील जयकुमार गोसावी यांनी प्रथम क्रमांक प्राप्त करत विजय पटकावला आहे.

कृषीवल हे पत्र नागेश पब्लिशर्स प्रा. लि.साठी मुद्रक, प्रकाशक **सौ.सुप्रिया पाटील** यांनी नागेश पब्लिशर्स, वेश्वी, अलिबाग, जि. रायगड ४०२ २०९ येथे छापून येथेच प्रसिद्ध केले. आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७ । RGD/016/2026-2028
दूरध्वनी : ०२१४१-२२२२९०/२२२७६१, संपादकीय विभाग-email : krushivalnews@gmail.com / जाहिरात विभाग- email : raigadkrushival@gmail.com मुंबई कार्यालय : ए-५ आयओनिक १८, ऑर्थर बंदर रोड, कुलाबा, मुंबई ४०० ००५. दूरध्वनी : ०२२-२२८८४५३८.
■ संस्थापक-संपादक : स्व. प्रभाकर पाटील ■ व्यवस्थापकीय संचालक : मीरा घाडीगावकर ■ कार्यकारी संपादक : माधवी माणिक सावंत* ■ सल्लागार संपादक : प्रसाद वासुदेव केरकर
(* या पत्रातील मजकुराच्या निवडीसाठी पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे.)